# माणूस

शनिवार । २१ जानेवारी १९७८
७५ पैसे

कोकण आजही
चव्हाण-काँग्रेसकडे नाही...

मराठवाड्यातील काँग्रेस
हवालदिल...

विदर्भ बहुसंख्येने काँग्रेसबाहेर...

वसंतरावदादांचे वेगळेच हिशेब...

निवडणुकांच्या तोंडावरील
काँग्रेसची स्थिती

माहितगार [ पृष्ठ....५ ]

मुंबईच्या आझाद मैदानावर झालेली त्यांची २५ हजारांची सभा या दृष्टीने पाहण्यासारखी होती. ऐतिहासिक नाटकातल्या संभाजीसारखे र. ग. कर्णिक भाषण करतात. त्यामुळे त्यात चढउतार बराच असतो. स्वगतापासून घोषणांपर्यंतचे नाना संभाषणप्रकार त्यांच्या भाषणात ऐकायला मिळतात. निवडणुकी योजण्यापुरते तरी कामावर या असे आवाहन त्याच दिवशी वसंतदादांनी केले होते. अर्थातच कर्णिकांनी ते फेटाळून लावले. वसंतदादा एकदा तरी नमल्याची ती खूण होती.

मुंबईकर. [पृष्ठ....४ ]

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे-अंक चौतीस**

**२१ जानेवारी १९७८**

**मूल्य पंचाहत्तर पैसे**



संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


# सप्रेम नमस्कार

## संप... मुख्यमंत्री... आदिवासींचा ठराव....

आपल्या १४ जानेवारीच्या अंकात राजकीय कर्मचाऱ्यांच्या संपाबद्दल बराच मजकूर आहे. संपादकीयात आपण कर्मचाऱ्यावर टीका करणाऱ्याना चांगलेच फैलावर घेतले आहे. त्या अनुषगाने मला काही मुद्दे मांडावेसे वाटतात.

मुख्यमंत्री श्री. पाटील ह्याचा गरीब जनतेबद्दलचा पुळका कांगावखोर व धादान्त खोटा आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे; पण त्यांचा हा कांगावा उघडकीस आणायला कर्मचाऱ्यांचा एकही पुढारी पुढे आला नाही! 'सगळी मलई राज्यकर्मचाऱ्यानी खाल्ल्यावर गरीब, असंघटित खेड्यातल्या मजुरांनी काय करावे?' असा सवाल पाटील विचारतात. त्या सवालाकडे कर्णिक दुर्लक्ष करतात!

'ह्या गरीब जनतेकडे सरकारदेखील दुर्लक्ष करते आहे. तुम्ही आदिवासी कल्याण योजना काय म्हणून काढून घेतलीत? गरिबांच्या तोंडचा घास व्यापाऱ्यांच्या तोंडी घालायलाच ना? सरकारने ही योजना लागू करावी. आम्ही एक वर्ष संप स्थगित करून तुम्हाला अवधी देतो आणि तेवढ्यात जर योजना यशस्वीरीत्या लागू केलीत तर आमच्या मागण्या मागे घेतो,' असं एकही हरीचा लाल म्हणालेला नाही! अर्थात असं आव्हान दिल्याने पाटील मंत्रिमंडळाचे पितळ उघडं पडलं असतं हे जितकं खरं, तितकच आव्हान चुकूनही स्वीकारले गेले असते तर कर्मचाऱ्यांची पंचाईत झाली असती हेही!

चारोटीहून (ठाणे जिल्हा) आदिवासी मेळाव्याची बुचकळ्यात टाकणारी खबर आली आहे. श्रीमती गोदावरीबाई परुळेकरानी आदिवासीचा राज्यकर्मचाऱ्यांच्या संपाला पाठिंबा असल्याचा ठराव पास करवून घेतल्याचे वृत्त आहे!

१९७५ साली देखील ह्याच कर्मचाऱ्यांच्या संपाला शहादा ग्रुपने आदिवासीचा पाठिंबा जाहीर केला होता. 'तेही कामगार (!) शिवाय त्याच्याशी रोज आपल्याला काम पडतं. त्यांची सहानुभूती आपल्याला मिळण्याचा हा एक चान्स! शिवाय सरकार खिळखिळं करण्याची एक संधी!' अशी ही सुप्त किंवा स्पष्ट भूमिका असते.

पण आदिवासीचे शोषण करणारा समाज काही अशरीरी नाही! खेड्या–पाड्यांपासून मुंबईपर्यंत खुर्च्यांवर बसून गरिबांशी मगरुरीने बेपर्वाईने वागायला, पैसे घेतल्याशिवाय कुठलेही काम करण्यास नकार द्यायला, आडगावच्या शाळातली सर्व्हिस तालुक्याच्या ठिकाणाहूनच बजावायला काय भुतं–वितं येतात की काय?

त्यांच्यासमोर तो आदिवासी बापडा हात जोडून थरथर कापत लाचारीने उभा असतो, चहा पाजत असतो, अपमान गिळत असतो. त्याने काय म्हणून कर्मचाऱ्यांच्या संपाला पाठिंबा द्यावा? हेही कामगार, तेही कामगार हे जर खरे असले तर कर्मचाऱ्यांनी आजवर एकदाही आदिवासीच्या बाजूने आवाज का उठवला नाही? ज्या लाचारीने आदिवासी आपल्या तुटपुंज्या रकमेतून लाच देतो व ज्या उद्दाम हक्काच्या भावनेने, नुसती परतफेडीचीही भावना मनात न येऊ देता कर्मचारी ती स्वीकारतो, तीच लाचारी व तीच उद्दाम कृतघ्नता ह्याही ठरावाच्या देवाणी-घेवाणीच्या सोबत राहील! ह्यातून कामगारएकी वाढते, कामगारलढा – जास्त सबळ होतो, असं ज्यांना वाटतं ते वाटो बिचारं; पण खरे तर आदिवासीची कधीच मारून टाकलेली जी अस्मिता, तिची लक्तरं फक्त वेशीवर टांगली जातात. 'फुडारी सांगत्यात, केला ठराव, आपल्याला काय कळतय् वो त्यातलं!' असंच शेवटी झालं की नाही? की काल आणि उद्या शत्रुपक्षात असणारा कर्मचारी आजचा दिवस आदिवासीना खरोखर भावासारखा वाटतो? कुठल्या जादूने ही किमया–एकतर्फीच–होते?

१२।१।७८ **वसुधा धागमवार, पुणे**

# कानपूर दंगलीची दुसरी बाजू

साप्ताहिक माणूसच्या दि. ३१।१२।७७ च्या अंकात श्री. शरद कृष्णन् यांनी कानपूर येथील गिरणी-दंगलीसंबंधी लिहिलं आहे. त्यांनी लिहिल्याप्रमाणे विचार करायचा झाला तर असं मानावं लागेल की एवढ्या मोठ्या संख्येने असणारे, इतकी वर्षे नोकरी करून पोट भरणारे हे कामगार कोणी दुष्ट गुंड होते. अनेक वर्षे शांतपणे नोकरी करून पोट भरणारे लोक एकदम औरंगजेब, चंगीज खान यासारख्यांना शोभणारी अधम कृत्यं एकाएकी करतात, हे पटत नव्हतं.

यानंतर मला कानपूरची 'फिलहाल' आणि 'मजदूर किसान नीती' ही दोन कामगाराची वृत्तपत्रे बघायला मिळाली. वरील दोन वृत्तपत्राचा एकमेकांशी संबंधही नाही, हेही पत्रे वाचताच समजून येते. त्यांना दोन स्वतंत्र वृत्तपत्रं समजण्यास काहीच प्रत्यवाय वाटला नाही. त्यात वरील वृत्तपत्रातील मजकुरास कानपूरच्या एका कार्यकर्त्याचा जो काही दिवसापूर्वी पुण्यात येऊन गेला, पाठिंबा मिळाला. अशा तीन निरनिराळ्या ठिकाणांहून आलेली माहिती मी या पत्रात वापरली आहे.

पत्र लिहिण्याचा हेतू कोणाचाही समर्थन करणे, हा नाही. हिंसेचं समर्थन मी करूही शकणार नाही. पण हिंसेचे समर्थन जरी करू शकलो नाही तरी हिंसक घटना समजून घेणे शक्य आहे व तोच प्रयत्न मी केलेला आहे. कानपूरची घटना औद्योगिक क्षेत्रातील अशांततेचे निदर्शक होतीच, परंतु या अशांततेच्या कारणाचे थोडं-फार दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न आहे.

## नेमके काय घडले ?

शंभराहून अधिक वर्षांची कारखानदारीची परंपरा असणारं कानपूर शहर. तेथील जयपुरियाशेठजीच्या मालकीची पुरातन आणि प्रचंड अशी स्वदेशी कापडगिरणी.

कारखानदारीच्या बरोबरीने जुना असणारा आणि त्याचमुळे कामगार-लढ्यांचा प्रदीर्घ अनुभव असणारा कानपूरमधील कामगार.

सुती कापडाचा जमाना संपत आला आहे. आता फायदा कृत्रिम धाग्याच्या कापडात आहे. शेठ जयपुरियानी स्वदेशीसारख्या सुती कापडगिरणीतून भरपूर नफा मिळवून घेतलेला आहे. त्यातूनच चार-पाच ठिकाणी त्यांच्या मालकीच्या गिरण्या आज उभ्या आहेत तेव्हा आता नफा नसलेल्या सुती कापडगिरणीत भाडवल गुतविण्याची त्यांना आवश्यकता नाही.

स्वदेशी मिल सरकारचे देणे लागते. वीजबोर्डाची बिले भरलेली नाहीत, टॅक्सची मोठी रक्कम बाकी आहे; पण आता हे पैसे चुकते करायची मालकाना जरुरी नाही. गिरणी बंद पडली अगर सरकारने घेतली तर त्याना तेच हवे आहे. गिरणीवर जीवन अवलंबून असणाऱ्याच्या डोक्यावर मात्र गेली काही वर्षे गिरणी बंद पडण्याची तलवार लटकत आहे.

*त्यातच आणीबाणीचे वरदान मालकाना* मिळाले. दर पंधरवड्याला होणारे पगार थकू लागले. प्रत्येक वेळी पगारदेखील भाडून घ्यावे लागतात, अशी वेळ आली. आणीबाणीचा फायदा घेऊन मालकांनी कामगारांनी मशीनवरच जेवण उरकावे, असा नवीन हुकूम काढला.

आणीबाणी संपली; परंतु परिस्थितीत काहीच बदल घडला नाही. कामगाराचे पुढारी प्रश्न सोडविण्यास असमर्थ ठरले. सरकारने देखील काहीच केले नाही.

याचा अपरिहार्य परिणाम म्हणून कामगारांचा पुढाऱ्यांवरील विश्वास उडाला. कारखान्यात पाच युनियन्स होत्या. त्या सर्व पुढाऱ्यांना कामगारानी हाकलून लावले. यानतर कामगारांनी आपल्या कुवतीप्रमाणे आपले प्रश्न धसास लावण्यास सुरुवात केली.

२६ ऑक्टोबरला सुपरवायझर लोकांना घेराओ करण्यास सुरुवात झाली. त्यांच्या ही गोष्ट लक्षात येताच ते बाहेर पळू लागले. कामगारानी त्याचा दारापर्यंत पाठलाग केला व त्यांना हाकून लावले. सुपरवायझर्सना पळताना पाहून ऑफिसस्टाफ पळू लागला. काही जणांनी खिडक्यामधून उड्या मारल्या व त्यात ते जखमी झाले. स्थूल शरीराचे मॅनेजर अग्रवाल हे त्या दुर्दैवी लोकापैकी एक होते. त्यांच्या डोक्याला मोठी जखम झाली व ते तेवढे कामगारांच्या हाती सापडले.

इकडे फॅक्टरीचा सुरक्षा विभाग देखील जाग्यावर राहिला नव्हता. फॅक्टरीवर संपूर्णपणे आपला ताबा असल्याचे कामगाराच्या *लक्षात आले. याच्या परिणामाची त्याना* कल्पना आली असावी. कारण त्यांनी त्वरित गिरणीची नाकेबंदी केली. क्लोरीनच्या टाक्या व ॲसिडच्या बाटल्या यांच्या सहाय्याने ते आपले संरक्षण करू लागले.

पन्नास तास घेराओ चालला. या काळात फॅक्टरीमधील उत्पादन चालू होते. श्री. अग्रवाल याना त्याचे डॉक्टर व कुटुंबीय यांना भेटण्याची मुभा होती. त्यांच्या खाण्यापिण्याची सोय केली गेलेली होती. याचबरोबर त्यांची टिंगल करणे अगर त्यांना भीती दाखविण्याचे प्रकार घडले *असणे शक्य* आहे. राज्य व केंद्र सरकारचा, घेराओबळाचा वापर करून मोडून काढण्याचा विचार होता; परंतु क्लोरीन व ॲसिडला तोंड देण्याची पोलिसाची तयारी नसल्याने कामगार या वेळी वाचले.

पन्नास तासांनतर कामगाराना सूडबुद्धीने वागविणार नाही आणि पगाराची थकबाकी देण्याची व्यवस्था होईल, या अटीवर श्री. अग्रवाल यांची सुटका झाली.

यानंतर वीजबोर्डाच्या एका अधिकाऱ्याची रिसीव्हर म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याची नेमणूक वीजबिलाची वसुली करण्यासाठीच झाली होती. कामगार होते तिथेच राहिले. दि. ६ ऑक्टोबरला कामगारांचे तीन पंधरवड्यांचे वेतन थकलेले होते. ६ तारखेला वेतन मिळणार अशी आशा होती. कामगार ऑफिसला चौकशी *करण्यास गेले. तेथे त्यांना* नजीकच्या भविष्यात पगाराची शक्यता नसल्याचं सांगण्यात आलं.

यावर कामगारानी परत एकदा घेराओचा निर्णय घेतला. वीजकपातीमुळे ले ऑफ सुरू होता. त्यामुळे कामगार कमी संख्येने कामावर होते. यावेळेस पहिल्या वेळेप्रमाणे संपूर्ण गिरणी कामगारांच्या हातात आली नाही. सुरक्षाखाते जाग्यावर होते. या वेळेस कामगारांच्या हातात अन्यायाचे प्रतिनिधी म्हणून दोन अधिकारी सापडले.

पोलिस-साधे व हत्यारी-मोठ्या संख्येने आणण्यात आले. आपल्या माणसांना पाठिंबा देण्यासाठी कामगारांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने बाहेर जमले. मॅजिस्ट्रेट व पोलिस अधिकारी यांना आत येण्याची कामगारांनी परवानगी दिली.

सरकारी अधिकारी आत शिरले. बाहेर जमाव पांगविण्यासाठी अश्रुधूर व लाठीमाराचा वापर करण्यास सुरुवात झाली. जमावाने दगडफेकीने *प्रत्युत्तर दिले. त्यात* एक अधिकारी जखमी झाला आणि गोळी-

बाराचा आदेश दिला गेला. पोलीस गिरणीत घुसू लागले. ती बातमी घेऊन एक कामगार आत गेला. तिथपर्यंत सरकारी अधिकारी पोहोचले होते. गोळीबाराचे आवाज आतपर्यंत पोहोचले होते. पोलिस अधिकाऱ्याने कमरेचे रिव्हॉल्वर काढून एका कामगारावर झाडले.

यानतरच्या धुमश्चक्रीत काय झाले ते ठरवणे कठीण आहे; परंतु गोळीबार होऊन कामगारांचे मुडदे पडेपर्यंत तरी गिरणीतील दोघे अधिकारी जिवंत होते.

गोळीबार अडीच तास चालला आणि त्यात दीडशे कामगार मृत्युमुखी पडले. गोळीबारापासून संरक्षण करून घेण्यासाठी गिरणीमध्ये लपून बसलेल्या कामगारांना पोलिसांनी हुडकून हुडकून बाहेर काढले, बेदम मारले आणि तिथे पडलेली कामगाराची प्रेते त्याच्याकडूनच ट्रकमध्ये भरून घेऊन रात्रीच्या अंधारात ट्रक भरधाव वेगाने नदीवर नेले.

एका दहा-बारा वर्षांच्या मुलाच्या शवामध्ये डझनांनी गोळ्या शिरल्या होत्या. एक पोलिस-अधिकारी आपल्या रिव्हॉल्वरने टिपून टिपून गोळ्या झाडीत होता.

स्वातंत्र्यानंतर एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेला व इतका परिणामकारक (?) असा हा एकमेव गोळीबार आहे.

श्री. अग्रवाल यांना दिलेल्या वागणुकीवरून त्याना इजा करण्याचा हेतू नव्हता असेच दिसते. कामगारांनी घेराओच्या काळात कारखाना चालू ठेवणे ही गोष्ट कामगारांचे हेतू खुनी होते असे दर्शवीत नाही.

याउलट शस्त्रसज्ज कामगारांबरोबर सन्मान्य तडजोड करणे आणि असहाय कामगारांवर बंदुकांनी हल्ला चढवणे हे काय दर्शवते, हे ज्याचे त्यानेच ठरवावे.

श्री. शरद कृष्णन् यांनी लिहिल्याप्रमाणे हा उद्रेक भयावह होताच; परंतु त्यानी रंगविलेले चित्र अपूर्ण वाटत होते. एवढ्या मोठ्या उद्रेकामागील कारणे ही प्रकर्षाने समोर येत नव्हती. नोकरीची शाश्वती नाही, पगार मिळत नाही, सरकार प्रश्न सोडवीत नाही आणि तीन वर्षे या परिस्थितीत हजारो कामगारांनी काढली, हे विसरून चालणार नाही. घेराओत सापडलेल्या अधिकाऱ्यांची अवस्था ही दुःखदायकच आहे; पण तेवढेच म्हणून भागणार नाही. ज्या घटनांचा ती दुःखद गोष्ट परिणाम ठरली त्या घटना तेवढ्याच प्रकर्षाने जगासमोर यायला हव्यात. प्रत्यक्ष घटना कशा घडत गेल्या हे समजावे आणि या भयावह उद्रेकाची खरीखुरी व्याप्ती केवढी प्रचंड होती हे 'माणूस'च्या वाचकांना समजावे म्हणून हा खटाटोप.

१३।१।७८ **हेमंत बाळकृष्ण गोळे**

---

# 'याचं खुल्लंखुल्लं कौतुक कोणी तरी करायला हवंय'.... मुंबईकर.

---

राज्य सरकारी, शिक्षक व अन्य कर्मचाऱ्याच्या संपाचं खुल्लंखुल्लं कौतुक कोणी तरी करायला हवंय. आठ लाख संपग्रस्त व तीस-पस्तीस लाख अवलंबित अशा सुमारे चाळीस लाखाच्या समुदायाचा एकमुखी आवाज दडपून टाकण्याचा सर्वतोपरी प्रयत्न चालू असताना, त्यांची एकजूट अभग आहे. प्राथमिक शिक्षक फार मोठं भगदाड पाडू शकलेले नाहीत आणि संपाच्या तिसाव्या दिवशी हा मजकूर लिहीत असताना संपकऱ्यांच्या प्रखर लढ्याचा व जमल्यास तो तीव्र करण्याचा निर्धार कायम आहे.

मला या संपाची तुलना मे १९७४ च्या रेल्वे संपाशीच करावीशी वाटते. त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी कठोर उपाययोजना करून प्रखरपणे तो संप मोडून काढला. आज वसंतदादांच्या हातात इंदिरा गांधीसारखी एकहाती सत्ता नाही. त्यामुळे संपकऱ्यांचा किंवा त्यांच्या पुढाऱ्यांचा ते बीमोड करू शकत नाहीत; पण या लढ्याला war of attrition चं स्वरूप देऊन अंतिमतः त्यांना तेच साधायचं आहे. त्यांच्या या डावात त्याना संपूर्ण केंद्र सरकारची साथ आहे किंवा नाही हे ठाऊक नाही; परंतु पंतप्रधानांची आहे आणि त्यांना जनता सरकारात कोणी विरोधक असतील तर ते गप्प तरी आहेत. रेल्वे-संपात इंदिरा गांधीच्या हाती रेडिओ–टी. व्ही. ही प्रभावी प्रचारसाधनं होती. या संपात ती गप्प आहेत; परंतु वसंतदादांच्या हातात सर्व वृत्तपत्रे आली आहेत.या वृत्तपत्रांची 'More loyal than the king' अशी वर्णनं संपकऱ्यांच्या सभेत केली जातात. वृत्तपत्रांकडे वस्तुनिष्ठपणे पाहिलं तर त्यात अतिशयोक्ती काही नाही. उलट कर्मचाऱ्यांच्या पुढाऱ्यांबद्दल जो कडवटपणा वृत्तपत्रांतून व्यक्त होतो तो गर्हणीय आहे.

देशाच्या राजकारणात सध्या जो गोंधळ आहे, त्याचाही फायदा वसंतदादांना मिळतो आहे, कारण ते शासनात आहेत. र. ग. कर्णिकांना त्याचा तोटा होतोय. कारण गोंधळाच्या राजकारणात लढणाऱ्याच्या बाजूला कोणी उभे राहणे जरा अवघडच असते. या war of attrition मध्ये सरकारला अपयश येण्याचा धोका नाही. कारण शासनाची ताकद अमर्याद असते. उलट कर्मचाऱ्यांना यश मिळणे जवळ जवळ अशक्यच, कारण त्याच्या सामर्थ्याला मर्यादा आहेत.

अशी सगळ्या बाजूंनी कर्मचाऱ्यांची कोंडी झालेली असताना त्यानी सरकारला कोंडीत पकडायचा प्रयत्न करायचा, हे कौतुकास्पदच नाही का? बुधवार दि. ११ जानेवारी रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर झालेली त्यांची २५ हजाराची सभा या दृष्टीने पाहण्यासारखी होती. ऐतिहासिक नाटकातल्या संभाजीसारखे र. ग. कर्णिक भाषण करतात. त्यामुळे त्यात चढ-उतार बराच असतो. स्वागतापासून घोषणापर्यंतचे नाना संभाषणप्रकार त्यांच्या भाषणात ऐकायला मिळतात. निवडणुकी योजण्यापुरते तरी काही काळ कामावर या, असे आवाहन त्याच दिवशी वसंतदादांनी केले होते. अर्थातच र. ग. कर्णिकांनी त्या पंचवीस हजारांच्या एकमुखी आवाजाने ते फेटाळून लावले. वसंतदादा एकदा तरी नमल्याची ती खूण होती.

निवडणुका हे या देशातील लोकशाही जिवंत असल्याचं लक्षण मानलं जातं. मार्च १९७७ च्या इंदिरा गांधीनीच पुकारलेल्या निवडणुकांनी तर या समजावर शिक्कामोर्तबच केले आहे. गंमत अशी की, निवडणुकांचा हा तमाशा वेळच्या वेळीच झाला पाहिजे,असे महाराष्ट्रातल्या चाळीस ते पन्नास

लाख लोकांना वाटत नाहीय. त्यांना आपल्या जीवनमानाचा प्रश्न महत्त्वाचा वाटतोय, आणि हे फार सुखद चिन्ह आहे. एवढ्या तेवढ्या गोष्टीवरून लोकशाही आणि स्वातंत्र्य यांचे नारे लगावणाऱ्यांना हा जबरदस्त जमालगोटा आहे.

निवडणुकात लोकशाही नसते; त्या नावाने आपल्याकडे जो तमाशा- मांडला जातो, त्यात तर लोकशाही निश्चितच नसते. पक्षीय राजकारणाचा व्यवसाय करणाऱ्यांना निवडणुका हे लोकशाहीचं प्रतीक असणं फार सोयीचं असतं. त्यासाठीच ते सगळे भास-आभास निर्माण करतात. मार्च १९७७ मध्ये या देशाला स्वातंत्र्य पुन्हा मिळालं की नाही, हा वादाचा मुद्दा होईल, तथापि तेव्हा झालेल्या निवडणुकांनी सार्वत्रिक मतदान म्हणजेच लोकशाही, हा भ्रम मात्र अधिक पक्का केला. राज्य दुसऱ्या काही लोकांच्या हाती आलं म्हणून त्यांना अधिक स्वतंत्रही वाटू लागलं. जे नोकर होते किंवा मित्र होते त्यांना कोणाची तरी पूजा बांधायचीच होती. त्यांनी इंडिया इज इंदिराऐवजी इंडिया व्हर्सेस इंदिराचे नवे धोरण घेतले व स्वातंत्र्याचा पुरस्कार सुरू केला.

या तथाकथित लोकशाहीत, स्वातंत्र्यात प्रारंभी जेव्हा संप सुरू झाले तेव्हा 'कोंडलेल्या भावनांचा उद्रेक' वगैरे म्हणून लोकशाही स्वातंत्र्य-पुरस्कर्त्यांनी त्यांचं कौतुक केलं; पण कोंडलेल्या भावनाचा निचरा होईना. संपाची लाट संपेना; तेव्हा मे ७४ मध्ये रेल्वे संपात इंदिरा गांधींनी घेतलेली भूमिकाच मोरारजीपासून वसंतदादापर्यंत आणि एस्. एम्. जोशींपर्यंतही सगळ्यांनी धारण केली. संप म्हणजे संघटित वर्गाची झुंडशाही, ही भाषा सुरू झाली. आपले हितसंबंध जपणारी ही भूमिका वृत्तपत्रांना हवीशीच होती. त्यांनीही संपकऱ्यांवर दुगाण्या झाडण्यास सुरुवात केली व लोकशाही, स्वातंत्र्य यांचा आवाजच या महाराष्ट्र राज्यात लोपला.

संप ही संघटित कामगार वर्गाची झुंडशाही असेल, तर निवडणुका ही संघटित राजकीय पक्षाची कुस्तीच असते; पण निवडणुकांचं अपुरेपण माहिती असूनही आपण त्यांचं स्वागत करतो. कारण त्यातून लोकांचं शिक्षण, राजकीय शिक्षण होत असतं. संपाचे तसेच आहे. त्यांचे तोटे हजार असतील; पण सर्वांहून एक मोठा फायदा आहे. तो म्हणजे राजकीय जागृतीचा. आपल्या हक्काची कामगाराला या लढ्यात जेवढी जाणीव होते तेवढी एरवी कधीही होणार नाही. मुख्यमंत्र्यांचा, पंतप्रधानांचा, वृत्तपत्र-संपादकाचा संपाला विरोध आहे, तो याच कारणासाठी. ज्याला स्वातंत्र्य हवं, लोकशाही हवी त्या प्रत्येकाने सरकारी कर्मचाऱ्यांच्या लढ्याचं स्वागतच केलं पाहिजे, कौतुकच केलं पाहिजे. □


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक

**प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे**

किंमत वीस रुपये

**प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर**

**पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

# महाराष्ट्रातही कॉंग्रेस अभेद्य राहिलेली नाही

माहितगार

'इंदिरा गांधी यांच्या भोवती पडलेलं कोंडाळं फोडलं पाहिजे!' असं यशवंतराव चव्हाण लोकसभा निवडणुकीच्या वेळी मार्च १९७७ मध्ये सांगत होते. जानेवारी १९७८ मध्ये यशवंतराव बोलू लागले 'इंदिरा गांधी यांच्या कैदेतून कॉंग्रेसला आम्ही मुक्त केले आहे!' चव्हाणांच्या या दोन्ही विधानांमुळे 'यातील खरे कोण?' परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण की विरोधी पक्षनेते यशवंतराव चव्हाण? असा प्रश्न महाराष्ट्र कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना पडला आहे. 'साहेबाना ही लाइन अडचणीची होणार आहे', असे विचार एका पदाधिकाऱ्याने कॉंग्रेसला कैदेतून मुक्त करण्याची भाषा यशवंतरावांनी काढली तेव्हा बोलून दाखविले. दिल्लीत इंदिरावाद्यांचा मेळावा भरला आणि कॉंग्रेस फुटली. १९६९ मध्ये कॉंग्रेस फुटली तेव्हा महाराष्ट्रात त्याचे परिणाम झाले नाहीत; परंतु १९७८ ला कॉंग्रेस फुटली तेव्हा परिस्थिती बदललली आहे. दिल्लीत दुफळी झाल्याबरोबर महाराष्ट्रात फूट पडली नाही; परंतु ही वादळापूर्वीची शांतता आहे. पाण्याखाली दडलेल्या बर्फासारखी कॉंग्रेसच्या भांडणाची अवस्था आहे. वसंतराव नाईक यांच्यासारखा माणूस तटस्थ आहे. ते स्वतः महाराष्ट्र कॉंग्रेसबरोबर आहेत. मात्र त्याना मानणारे विदर्भातील मंत्री व कार्यकर्ते पक्षातून बाहेर पडण्याच्या तयारीत आहेत. विदर्भातील एका ज्येष्ठ नेत्याने विदर्भात इंदिरावाद्यांचा जोर होईल, असे म्हटले आहे. वसंतराव नाईक याना पार्लमेंटरी बोर्डावर घेतले आहे. याचा अर्थ ते यशवंतराव चव्हाण व दादा यांच्याबरोबर मनापासून आहेत, असे मानण्याचे कारण नाही. नाईक मध्यस्थीचे प्रयत्न करीत होते, तेव्हापासून यशवंतराव चव्हाण व मुख्यमंत्री वसंतराव पाटील हे दोघेही नाइकांच्यावर पूर्ण विश्वास ठेवीत नव्हते. राम आवरगावकर यानी महाराष्ट्रातील कॉंग्रेस-खासदाराना खाना दिला त्या वेळी नाईकही हजर होते. त्याच खान्याच्या वेळी यशवंतरावांनी आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांपैकी (खासदार नसलेल्या) एकाजवळ नाइकाविषयी अविश्वास व्यक्त केला होता. चव्हाण-पाटील यांच्या नाइकाविषयीच्या संशयात अजूनही फरक पडलेला नाही.

इंदिरावाद्यांचा मेळावा भरला तेव्हा नाइकांना भेटलो असता ते म्हणाले होते, 'मी कोणालाही मेळाव्याला जा, म्हणून सांगणार नाही, त्याचप्रमाणे जाऊ नका, म्हणूनही सांगणार नाही!' नाईक जर चव्हाण-पाटील गटाबरोबर आहेत तर त्यानी चव्हाण-पाटील यांच्याप्रमाणेच मेळाव्याला जाऊ नका, असे का सांगितले नाही? इंदिरा गांधीबाबत रेड्डी-चव्हाण यांनी योग्य वर्तन केलं नाही, ही वसंतराव नाईक याची भावना असून कॉंग्रेस-फुटीला दोन्हीही गट जबाबदार आहेत, असे नाईकांना वाटते. चव्हाण-पाटील यांच्याबरोबर नाईक नाहीत, याचे आणखी उदाहरण द्यावयाचे म्हटले तर संयुक्त निवेदनासंबंधीचे देता येईल. मेळाव्याला जाऊ नये, असे अध्यक्ष नरेंद्र तिडके, मुख्यमंत्री वसंतराव दादा पाटील व वसंतराव नाईक यांचे संयुक्त निवेदन काढावे, असा विचार वसंतदादा यांच्याजवळ व्यक्त केला गेला होता. मात्र हे संयुक्त निवेदन निघाले नाही. उलट नाईक यांनी मेळाव्याला जा किंवा जाऊ नका, असे काहीच सांगणार नाही, असे सांगून टाकले. यावरून नाइकांचे मन काय सांगते, ते दिसून येईल.

कॉंग्रेसमध्ये फूट पडल्यावरही 'इंदिरा गांधीवर कडक टीका करू नका', असा सल्ला महाराष्ट्राच्या नेत्याना-म्हणजे यशवंतराव चव्हाण यांना दिला गेला होता. यशवंतरावांनी तो मानला नाही. 'इंदिरा गांधीच्या कैदेतून कॉंग्रेसला आम्ही मुक्त केले आहे. गांधींनी व्यक्तिवाद माजवला होता. गांधींनी पेशवाईतील 'तोतयाचे बंड' माजविले आहे.' अशी विधाने करण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. गांधी सत्तेवर असताना गोंडा घोळणारे आता सिंहगर्जनेचा आव आणू लागले आहेत, हे कार्यकर्ते पाहात असून त्याचा त्यांच्यावर परिणाम होत आहे. नेतृत्वाविषयी कार्यकर्त्यांना विश्वास, आपलेपणा वाटेनासा झाला आहे डॉ. य. दि. फडके यानी एका समारंभात बोलताना 'यशवंतराव सत्तेवर नाहीत, त्यांची सद्दी संपत आली म्हणून त्यांच्याविरुद्ध लिहिले जात आहे,' असे सांगून यशवंतनिष्ठा दाखविली; पण फडके यांचे यशवंतराव तरी काय करीत आहेत? गांधींची सत्ता गेल्यावरच यशवंतराव शूर झाले आहेत!

महाराष्ट्र मंत्रिमंडळातील एका वरिष्ठ मंत्र्याने यशवंतराव चव्हाण पक्षाला नेतृत्व देण्यास असमर्थ आहेत, त्यांच्यात ती पात्रता (पात्रता हा त्या मंत्र्याचाच शब्द) नाही, असे म्हटले आहे. यावरून यशवंतरावाविषयी मंत्र्याची खरी मते काय आहेत हे कळून येते. इंदिरा गांधी यानी तोतयाचे बंड केले आहे असे म्हणणाऱ्या यशवंतरावांनी महाराष्ट्रातही असेच तोतयाचे बंड करण्याचा बनाव घडवून आणला आहे. महाराष्ट्राचे पार्लमेंटरी बोर्ड पंधरा जणांचे केले आहे. साधारणपणे पार्लमेंटरी बोर्ड एवढे मोठे असत नाही. सात किंवा नऊ जणांचे- फार तर अकरा जणांचे असते; परंतु या वेळचे बोर्ड पंधरा

जणांचे आहे. यालाही वसंतराव नाईक कारणीभूत आहेत. आपल्या गटाच्या माणसाना घ्यावे असा आग्रह धरल्यामुळे पार्लमेंटरी बोर्ड पंधरा जणाचे झाले. दादांचे मंत्रिमंडळ हे नाइकाचे मंत्रिमंडळ म्हणून ओळखले जाते. त्याचप्रमाणे पार्लमेंटरी बोर्डही नाईकाचेच आहे, असे म्हटले जाते. पार्लमेंटरी बोर्डात नाइकाची माणसे अधिक आहेत. उलट यशवंतराव चव्हाण यांचे मानसपुत्र शरद पवार यांना पार्लमेंटरी बोर्डात स्थान देण्यात आले नाही. साहजिकच यशवंतराव अस्वस्थ झाले आहेत. त्यांच्या संमतीनेच काही तरुण आमदारानी बंडाचा झेंडा उभारून पवारांना पार्लमेंटरी बोर्डात घुसवण्याचा प्रयत्न केला. काही झेड् पी.अध्यक्ष, आमदार, याना आपल्या भेटीला येऊन शरद पवार यांना पार्लमेंटरी बोर्डात घ्या, असा आग्रह धरा, असे यशवंतरावानी सुचवले. त्यामुळेच दोन सरचिटणीस गोविंदराव आदिक व अंकुशराव टोपे यानी 'वर्षा'वरील बैठकीत सभात्याग करण्याचे नाटक केले. कांग्रेस–फुटीनतर विचार करण्यासाठी दादांच्या निवासस्थानी–'वर्षा'वर यशवंतराव चव्हाण, दादा, महाराष्ट्र कांग्रेसचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते यांची बैठक झाली होती. या बैठकीतून आदिक्-टोपे यांनी सभात्याग केला. यशवंतरावांच्या प्रेरणेने शरद पवार यांच्या संबधात तोतयाचे बंड कसे घडवले जात आहे, याचे हे उदाहरण आहे. तिकिटांचे वाटप करण्याचे अधिकार पार्लमेंटरी बोर्डाला आहेत. त्यामध्ये नाइकाच्या माणसाचे बहुमत झालेले यशवंतरावांना कसे मानवणार ? शरद पवार यांच्यासारखी आपल्याला निष्ठा वाहणारी माणसे यशवतरावाना पार्लमेंटरी बोर्डावर हवी आहेत. त्याकरताच चव्हाणानी तरुण आमदार, झेड्.पी. अध्यक्षांना खुणावले. तसे नसते तर पवाराकरता एवढा आग्रह धरण्याइतके पवार महत्त्वाचे आहेत काय ?

तिकिट–वाटपाच्या वेळी आपल्या माणसाना अधिक तिकिटे द्यावयाची. ही माणसे निवडून आल्यावर त्या जोरावर राजकारण करावयाचे. इतकेच नव्हे तर निवडणुकीनंतर नाईक यांची माणसे पक्षातून बाहेर पडतील, असा सशय बोलून दाखवला आहे. निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्र कांग्रेसमध्ये फाटाफुटीला सुरुवात होईल असे मानण्यात येते. चव्हाण-पाटील पश्चिम महाराष्ट्रात फूट पडू नये याचा आटोकाट प्रयत्न करणार हे उघड आहे. उत्तर महाराष्ट्रात मधुकरराव चौधरी, श्रीमती प्रतिभा पाटील गाधींना अनुकूल आहेत. विदर्भ चव्हाण गटाकडे बहुसंख्येने राहात नाही. कोकण आजही कांग्रेसच्या हातात नाही. मराठवाड्यात कांग्रेसचे नेतृत्व राहिलेच नाही. सुदरराव सोळके मराठवाड्याचे नेते होऊ शकत नाहीत. त्यामुळे मराठवाड्यातील कांग्रेस कार्यकर्ते आधीच हवालदिल झाले आहेत. प्रदेश कांग्रेसचे अध्यक्ष नरेंद्र तिडके अध्यक्ष झाल्यापासून मराठवाड्यात गेलेले नाहीत. मग राहता राहिले पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर हे जिल्हे ! या जिल्ह्यांत इंदिरावादी अजिबात नाहीतच, असे मानण्याचे कारण नाही ! म्हणजे यशवंतराव चव्हाण यांची कांग्रेस महाराष्ट्रात किती प्रभावी आहे हा प्रश्न पडावा ! इंदिरा गांधी याचा एक दौरा महाराष्ट्रात झाला की कांग्रेसमध्ये फाटाफुटीला कशी सुरुवात होते ते दिसून येईल.

इंदिरावादी कांग्रेसमुळे कांग्रेसच्या मित्रपक्षावर परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. रिपब्लिकन "गवईगट" वसंतराव नाईक यांच्यामुळे परंपरेने कांग्रेसबरोबर राहिला आहे. फुटीनंतर गवईगट चव्हाण कांग्रेसबरोबर जाणार की, इंदिरा कांग्रेसबरोबर जाणार, हे ठरलेले नाही: जाबुवंतराव धोटे इंदिरावाद्याशी हातमिळवणी करणार आहेत. कम्युनिस्ट पक्षात या प्रश्नावर मतभेद आहेत. त्यामुळे चव्हाण कांग्रेसला निवडणुकीत एकाकीपणेच जनता व मित्र पक्ष, इंदिरा कांग्रेस याच्याविरुद्ध सामना करावा लागणार आहे.

चव्हाण कांग्रेसकडे महाराष्ट्रात कार्यकर्ते राहिले आहेत ते का राहिले आहेत, हे मुख्यमंत्री पाटील याच्याच तोडून स्पष्ट झाले आहे. इंदिरा गांधी यांच्याकडे सत्ता होती म्हणून १९६९ मध्ये त्यांना पाठिबा मिळाला होता. सत्तेच्या जोरावर त्या वेळी गाधीनी पाठिबा जिंकला होता, असे मुख्यमंत्री म्हणाले. तेव्हा एका क्षणाचाही विलंब न लावता पत्रकारानी दादाना कोंडीत पकडले. याच सिद्धातानुसार तुमच्या बाजूला बहुमत झाले आहे असे मानावे लागले, असे पत्रकारानी म्हटले. त्यावर दादा काहीच बोलू शकले नाहीत.

महाराष्ट्र कांग्रेसमध्ये अध्यक्ष नरेंद्र तिडके यांच्यावर नाराज झालेलाही एक गट आहे. 'तिडके अत्यंत थंडा माणूस आहे. निर्णय घेण्यास फार वेळ लावला जातो. त्यांच्या हातून निवडणुकीचा मामला कसा पार पडणार कोण जाणे ! त्यांना निवडणुकीची धकाधकी झेपणार नाही. या माणसामुळेही कांग्रेसचा पराभव होणार आहे,' असे पदाधिकाऱ्यापैकी व मन्त्र्यापैकीही काहीजण बोलत आहेत.

चव्हाण कांग्रेसमधील प्रत्येक गट निवडणुकीनंतर आपले स्थान टिकविण्याच्या डावपेचात गुतला आहे. निवडणुकीत कोणत्याच पक्षाला हुकमी बहुमत मिळणार नाही, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अशा वेळी ज्याच्याकडे ४०–५० आमदाराची ताकद आहे, तो निर्णायक घटक ठरणार आहे. त्याकरता दादा आपल्यावर निष्ठा असणाऱ्या अधिक उमेदवाराना उभे करण्याचा प्रयत्न करतील. यशवंतराव मोहिते व शरद पवार दादाच्या या शहाला काटशहा देण्याच्या प्रयत्नात राहतील. यशवतराव चव्हाण, दादाच्या माणसाना तिकिटे देण्याऐवजी आपल्या माणसाना तिकिटे मिळावीत, या प्रयत्नात राहतील. अजूनपर्यंत इंदिरा गाधीना निष्ठा वाहणारे यशवंतराव मोहिते आता आपण यशवतराव चव्हाण याचे नेतृत्व मानतो, असे सागू लागले आहेत. कऱ्हाडजवळ मोहिते यानी जाहीर सभेत मी यशवतराव चव्हाण याचे नेतृत्व मानतो, असे सागून टाकले आहे. मोहिते व पवार जवळ येऊन दादाचे मनसुबे उधळण्याचा प्रयत्न करतील. निवडणुकीनंतर दादांचा गट निर्णायक घटक ठरला तर मोठ्या गटाबरोबर दादा सौदेबाजी करून मुख्यमंत्रीपद आपल्याकडे ठेवण्याचा प्रयत्न करतील. मग हा मोठा गट जनता पक्ष असेल किंवा शेतकरी कामगार पक्ष असेल ! आज जरी दादा कांग्रेसबरोबर असले तरी ते कांग्रेसमध्येच राहतील, याविषयी भल्याभल्याना खात्री वाटत नाही ती यामुळेच ! त्यामुळेच दादा जनता पक्षात जाणार, अशी चर्चा सर्व थरात चालू असते. दादा जनता पक्षात जातीलच, असे म्हणता येणार नाही; पण दादा निवडणुकीनतर तयार होणाऱ्या गटाबरोबर जातील. अर्थात त्या वेळी दादांना निष्ठा वाहणारे आमदार तीसपेक्षा अधिक असले पाहिजेत; तरच हे शक्य होईल ! □

# निवडणुका

## काही निकोप संकेत

**वा. दा. रानडे**

सरकारी नोकरांचा संप चालू असो किंवा नसो महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात आंध्र प्रदेश, कर्नाटक, आसाम, मेघालय आणि मिझोरामबरोबरच होत आहेत या बाबतची अनिश्चितता दूर झाल्याने निवडणुकीची चक्रे आता अधिक वेगाने फिरू लागतील.

मार्च १९७७ मधील लोकसभा निवडणुकांनी केंद्रातील गेल्या तीस वर्षांची काँग्रेस सत्तेची मक्तेदारी गेली. जूनमधील विधानसभा निवडणुकात काश्मीरसह उत्तरेकडील दहा राज्ये आणि तामिळनाडू येथील जनतेने तोच कौल दिला. आता राहिलेल्या राज्यात पुढील महिन्यात निवडणुका होत आहेत. तेथील काँग्रेसच्या सत्तेचेही उच्चाटन करून अपुरे राहिलेले सत्तातराचे वर्तुळ जनता पूर्ण करणार काय, हा या निवडणुकांतील मुख्य प्रश्न आहे व एकंदर परिस्थिती पाहता हे वर्तुळ पूर्ण होईल, असे दिसते.

परिस्थिती काँग्रेसच्या दृष्टीने अधिकच प्रतिकूल झालेली आहे. तो पक्ष पराभवातून सावरण्याऐवजी फुटीने आणखी खिळखिळा झाला आहे. उलट जनता आणि मित्र पक्षानी निवडणूक समझोता करायचे ठरविल्याने त्याची आघाडी अधिकच बळकट झाली आहे. जागावाटपाबाबत त्यांच्यात मतभेद निर्माण झाले होते; पण तुटेपर्यंत ताणावयाचे नाही, अशी समजसपणाची भूमिका घटक-पक्षांनी घेतल्याने आघाडी अभग राहिली आहे. मार्क्सवादी-लेनिनवादी पक्ष म्हणजेच नक्षलवाद्याचा पक्ष आघाडीतून फुटला आहे; पण त्याचा महाराष्ट्रात फारसा प्रभाव नाही.

या विधानसभा निवडणुकांचा राज्यवार विचार करण्यापूर्वी आपला मतदार, राजकीय पक्ष, निवडणुका आणि लोकशाही यासबंधी काही महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधावयाचे आहे. मतदार हा आपल्या लोकशाहीचे व निवडणुकाचे मुख्य अधिष्ठान आहे.. मताचा हक्क ही मोठी शक्ती आहे. आपल्याला नको असलेले सरकार सशस्त्र क्रांती न करताही निवडणुकीच्या शाततापूर्ण व लोकशाही मार्गाने आपण बदलू शकतो, ही जाणीव आता मतदाराना झालेली आहे. मार्च १९७७ मधील लोकसभा निवडणुकीत आणि जून १९७७ मधील काही राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी शाततापूर्ण सत्तांतराचा हा चमत्कार घडवून आणला.

निवडणुकांतून मतदारांचा कौल यथार्थपणे व्यक्त होण्यासाठी सध्याची सदोष निवडणूक-पद्धती बदलण्याची मागणी अनेक वर्षे केली जात आहे. निवडणूक पद्धतीत आम्ही सुधारणा करू, असे आश्वासन जनता पक्षाच्या नेत्यानी दिलेले अहो. गेल्या अकरा महिन्यांच्या काळात जनता सरकारने असे बिल मांडले असते तर फेब्रुवारीतल्या निवडणुकांतच मतदारांना त्याचा फायदा मिळाला असता. या निवडणुका पार पडल्यानंतर सरकार बिल आणणार आहे, असे कायदामंत्री शांतिभूषण यांनी काही दिवसापूर्वी सांगितले; पण याबाबतीत विलंब होत असल्याचे जाणवल्याशिवाय राहिले नाही. हे बिल केव्हा पास व्हावयाचे असेल तेव्हा होवो, त्यासंबंधी आपल्या कल्पना व सूचना या निवडणूक मोहिमेच्या काळातच राजकीय पक्षांनी व विचारवंतांनी लोकांपुढे मांडल्या पाहिजेत. या प्रश्नावर लोकजागृतीस त्यामुळे मदत होईल. यासंबंधात माझ्या सूचना मी पूर्वी मांडलेल्याच आहेत. या निमित्ताने पुन्हा एकदा त्या मांडीत आहे.

सध्याच्या निवडणूक पद्धतीत मला आढळणारा सर्वात मोठा दोष म्हणजे निवडणुकावरचा भरमसाठ खर्च. उमेदवाराने करावयाच्या खर्चावर निवडणूक कायद्याने मर्यादा घातल्या आहेत; पण प्रत्यक्षात त्या कधीच पाळल्या जात नाहीत, हे उघडे गुपित आहे. हा भरमसाट खर्च आणि त्याबरोबर येणारा भ्रष्टाचार यांना आळा कसा घालता येईल ? निवडणूक-खर्च सरकारनेच करावा. सबंध खर्च करणे शक्य नसेल तर निदान त्यातला काही वाटा सरकारने उचलावा, अशा सूचना या संबधात केल्या जात आहेत, त्याचा जरुर विचार व्हावा. सध्याच्या कायद्यानुसार उमेदवाराने केलेल्या खर्चाचे हिशेब त्याला सादर करावे लागतात; पण त्याच्या पक्षाने किंवा मित्रानी त्याच्यासाठी केलेल्या खर्चाचा यात समावेश नसतो. हा खर्च कितीही करावा; त्यावर कोणतेही निर्बंध नाहीत. दिल्लीच्या एका काँग्रेस खासदाराची निवडणूक रद्द ठरविताना सुप्रीम कोर्टाने काही वर्षांपूर्वी राजकीय पक्षाने उमेदवारासाठी केलेल्या खर्चाचाही निवडणूक-खर्चात समावेश केला पाहिजे, असा अभिप्राय व्यक्त केला होता. या निकालाने त्या वेळच्या सत्तारूढ काँग्रेस पक्षाला व सरकारला हादरा बसला होता. सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तींनी या निकालात मांडलेल्या तत्त्वानुसार अनेक काँग्रेस खासदारांच्या निवडणुका रद्द ठरण्याचा संभव होता. तेव्हा उमेदवारांच्या निवडणूक-खर्चात राजकीय पक्षाने त्याच्यासाठी केलेला खर्च जमेस धरू नये, अशी स्पष्ट तरतूद करणारा निवडणूक-कायदा दुरुस्ती वटहुकूम राष्ट्रपतींनी काढला व पुढे त्या बिलाला 'कायद्याचे रूप' देण्यात आले. पूर्वीच्या इंदिरा राजवटीने केवळ स्वत:च्या पक्षाच्या फायद्यासाठी केलेली ही दुरुस्ती रद्द व्हावयास हवी आणि राजकीय पक्षानी आपला निवडणूक-निधी कसा जमविला व कसा खर्च केला, याचा तपशील सादर करण्याचे बधन त्यांच्यावर घालण्यात यावे. त्यामुळे निवडणुकीतील भ्रष्टाचारास काही प्रमाणात तरी आळा बसेल.

मतदारांच्या दृष्टीने दोन आवश्यक दुरुस्त्या म्हणजे निवडणुकीत मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त झाले पाहिजे व विजयी उमेदवारास झालेल्या मतदानाच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते पडावयास हवीत. ज्या मतदारसंघात या अटी पुऱ्या होणार नाहीत तेथील निवडणूक रद्द समजावी व ती जागा रिकामीच ठेवावी. आपले मत वाया जायला नको असेल तर मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त झाले पाहिजे आणि विजयी उमेदवारास पन्नास टक्क्यापेक्षा अधिक मतानी निवडून आणले पाहिजे, अशी जाणीव यामुळे मतदारांना होईल व त्यांचे मतदानाचे प्रमाण वाढेल. राजकीय पक्षही याबाबतीत अधिक दक्षता घेतील. १९७२ च्या निवडणुकीत इंदिरा-लाट असतानाही महाराष्ट्रात ४७ काँग्रेस उमेदवार ५० टक्क्यापेक्षा कमी मतांनी विजयी झाले हे या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.

याबाबत निवडणूक-कायद्यात दुरुस्ती होईल तेव्हा होवो; पण त्याची वाट न पाहता लोकशाहीप्रेमी राजकीय कार्यकर्त्यांनी संकेत म्हणून या दोन्ही अटी स्वत:च रूढ कराव्यात. ज्या विजयी उमेदवाराना ५० टक्क्यांपेक्षा कमी मते पडली असतील किंवा ज्याच्या मतदारसघात ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले असेल त्यानी आपण खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी नाही, असे मानून राजीनामा देण्याचा निकोप पायंडा पाडावा. याला अपवाद हरिजन व आदिवासी मतदारसघाचा ठेवावा. कारण हे वर्ग मागासलेले असल्याने मतदान कमी होते. त्यांच्यात जागृती होण्यासाठी आणखी काही वर्षांचा काळ जाऊ द्यायला हवा. ☐

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ पुन्हा एकदा शहा आयोग

नऊ जानेवारी रोजी शहा आयोगाच्या कामकाजाला प्रारंभ झाला. त्या वेळी साऱ्या देशभर त्या दिवशीच्या कामकाजाबद्दल विलक्षण उत्सुकता होती. आणीबाणीच्या मुख्य प्रवर्तक माजी महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी याच आघाडीवरील त्याचे एक प्रमुख सहाय्यक सिद्धार्थ शंकर रे, बाईंच्या दडपशाही धोरणापासून बंधमुक्त झालेले ब्रह्मानंद रेड्डी, आंध्रचे मुख्यमंत्री वेंगलराव... तात्पर्य आयोगाच्या कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या व्यक्ती नऊ जानेवारी रोजी पतियाळा हाउसवर दाखल झाल्या होत्या. मुख्य लक्ष अर्थातच श्रीमती इंदिराजी. बाईंनी अपेक्षेप्रमाणे पहिल्या दिवशी सारे कामकाज आपल्या वकिलामार्फत चालविले आणि दुसऱ्या दिवशी न्यायमूर्ती शहा यांनी वारंवार विचारणा केल्यावर ज्या अकरा मुद्द्यांबाबत त्यांचे स्पष्टीकरण हवे होते त्याला स्पर्शही न करणारे एक राजकीय भाषण आयोगाच्या व्यासपीठावरून त्यांनी ठोकले.

असहकाराची दिशा बाईंकडून स्पष्ट झाल्यावर न्यायमूर्ती शहा यांनी इतर साक्षीदारावर लक्ष केंद्रित केले. या साक्षीदारांपैकी सर्वांत महत्त्वाचे होते प. बंगालचे त्या वेळचे मुख्य मंत्री एस्. एस्. रे. यांनी २२ जून ते २५ जून पंचाहत्तर या आणीबाणी घोषित होण्यापूर्वीच्या तीन दिवसांतील घडामोडीवर प्रकाश टाकला आणि मग आयोगाच्या कामकाजाने नेहमीच्या पद्धतीने वाटचाल केली. सर्वसाधारण जनतेला अन्य कोणत्याही गोष्टीपेक्षा आयोग आणि इंदिरा गांधी याच गोष्टीमध्ये विशेष रस आहे आणि बाईंनी तर उघड उघड आयोगविरोधी धोरण स्वीकारले आहे. त्याचे नेमके परिणाम काय होतील? मुंबईमधील एका कायदेतज्ज्ञाने या विषयाबाबत नोंदविलेली मते लक्षात घेतली तर बाईंचे दिवस भरत आल्याचे लक्षात येते. आयोग सहकार म्हणजे सर्वनाश... मग निदान असहकार करून काही जमले तर पहावे असे त्याचे आणि नियुक्तीने अंगावर चढलेली खासदारकीची झूल मिरविणाऱ्या त्यांच्या वकिलाचे धोरण दिसते. बाईंनी निवेदनाबाबत असहकार पुकारल्यावर न्यायमूर्ती शहा यांनी आयोगाच्या चिटणिसांना त्यांच्यावर रीतसर खटला भरण्याचा आदेश दिला. आयपीसीच्या १७९ या कलमाखाली हा खटला दाखल करण्यात आला आहे. आता लोकांना शंका आहे की, समजा या कलमाखालील खटला रीतसर चालून बाईंना शिक्षा झाली तर– सहा महिन्यांच्या साध्या कैदेवर अथवा हजार रुपये दंडावर अथवा या दोन्हींवर... शहा आयोगासमोर येण्याचे बाई टाळू शकतात काय? आयोगाने बजाविलेल्या दुसऱ्या समन्साला जर बाईंकडून असाच प्रतिसाद मिळाला तर पुन्हा दुसरा खटला दाखल होणार का? समन्स बजावणे आणि त्यांनी निवेदनास नकार देणे ही प्रक्रिया किती काळ चालू राहील? बाईंनी दिलेल्या नकारामुळे निर्माण होणाऱ्या या खटल्याचे राजकीय परिणाम काय होतील? या प्रश्नांची कायदेतज्ज्ञांनी जी उत्तरे दिली आहेत त्यांचा तपशील देण्यापूर्वी बाईंची राजकीय हालचाल आणि आयोगाबाबतचे त्यांचे धोरण यांची सांगड घालण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला आहे त्याची दखल घेणे अगत्याचे वाटते. राजकीय महत्त्व असलेली व्यक्ती म्हणून आयोगासमोर जाण्याची त्यांची इच्छा होती. चव्हाण-रेड्डी यानी त्यांच्या या योजनेला खो घालताच त्या आपला गट घेऊन बाजूला झाल्या खऱ्या; परंतु अपेक्षित राजकीय महत्त्व त्यांना मिळू शकले नाही. त्यांच्या लोकप्रियतेचा आलेख पाहिला तर त्या आयोगासमोर येईपर्यंत या आलेखाने नीचांक गाठला होता. आयोगासमोरील भेकड नाट्याचा कोणताही राजकीय लाभ त्यांना मिळेल असे वाटत नाही. आता वरील प्रश्नांबाबत शहा आयोगासमोरील निवेदन करण्याचे बाईंनी नाकारले असल्याने त्यांच्यावर खटला होईल. या खटल्यामध्ये त्या दोषी ठरून त्यांना शिक्षा झाली तर विद्यमान कायद्यानुसार फौजदारी खटल्याखाली ,शिक्षा झाल्याने त्या लोकसभा निवडणूक लढविण्यास अपात्र ठरतील, असे काही कायदेतज्ज्ञांना वाटते. शहा आयोगाने बजाविलेल्या दुसऱ्या समन्साची त्यांनी पहिल्याप्रमाणेच वाट लावली तर दुसरा खटलाही होऊ शकेल; परंतु समन्साचा आणि त्यापाठोपाठ येणाऱ्या खटल्यांचा असा पोरखेळ चालविणे शहा आयोगालाही शोभा देणारे नाही आणि आयोगही या पद्धतीने पुढे जाणार नाही, असा एक अंदाज आहे. आयोगाची किमान अपेक्षा आहे ती एवढीच की, एक तर इंदिराजींनी सरळ निवेदन करावे किंवा परिणामाना तोंड द्यावे. बाईंनी दुसरा मार्ग पत्करला असला तरी आयोगाला आव्हान देण्याचे किंवा आयोगाच्या निर्णयाविरुद्ध न्यायालयामध्ये धाव घेण्याचे त्या टाळीत आहेत. कारण न्यायालयात आपली बाजू टिकणार नाही असे त्याना वाटते आणि तशी ती टिकली नाही तर अधिक हसे होईल, जनमानसामधील डागाळलेली प्रतिमा आणखीनच कलंकित होईल आणि आपण पूर्ण कैचीत पकडले जाऊ असे त्यांना वाटत असावे. त्यामुळे आयोगाबाबत त्यांनी असे आडमुठेपणाचे धोरण स्वीकारले आहे. आपल्यासमोर आरोपी म्हणून कोणीही व्यक्ती नाही असे आयोगाने स्पष्ट करून इंदिराजींच्या वकिलांनी केलेले सर्व दावे फेटाळून लावले आहेत. त्यांनी निवेदनास नकार दिला असला तर अन्य मान्यवर व्यक्तीची निवेदनें, समोर आलेले विविध साक्षीपुरावे, या आधारे आयोग योग्य ते निष्कर्ष काढून निर्णयाप्रत येऊ शकतो. बाईंना जी कार्यपद्धती अपेक्षित आहे ती अंगीकारली तर विवक्षित कालमर्यादेमध्ये काम-

पृष्ठ २३ वर

परराष्ट्रीय घडामोडी

# आग्नेय आशिया (२)

चंद्रशेखर पुरंदरे

मागील आठवड्यातील आग्नेय आशिया-वरील लेखात व्हिएतनाम–कंबोडिया युद्धाचा उल्लेख केला होता. हे युद्ध तेव्हा-पासून चिघळल्याचीच लक्षणे आहेत. परस्पर विरोधी दावे व्हिएतनाम आणि कंबोडिया-तर्फे करण्यात येत आहेत. खऱ्या परिस्थितीचा वेध घेण्यासाठी यामागचे सूत्रधार कोण आहेत हे पहाणे उचित ठरेल.

व्हिएतनामचे ३० वर्षांचे अखंड युद्ध ही विसाव्या शतकातली एक प्रमुख घटना. या युद्धाने अपरिमित हानी तर झालीच, शिवाय जागतिक राजकारणाचा चेहरामोहराच बद-लून गेला. पहिली गोष्ट कोणती झाली असेल, तर अमेरिकेच्या वर्चस्वाला तडा पोचला. आर्थिक व्यवस्था इतकी ढासळली की, भात हे प्रमुख पीक सुद्धा दुर्मिळ झाले. त्यामुळे सुमारे वर्षापूर्वी 'बंदुकीच्या ऐवजी फावडी हातात घ्या आणि शेतीच्या कामाला लागा.' असा आदेश जनतेला देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर आज शेजारच्या कंबोडिया-वर व्हिएतनामने केलेला हल्ला का केला असावा हे पहावे लागेल.

आग्नेय आशियामध्ये इंडोचायनीज राष्ट्राचे एक कम्युनिस्ट संघराज्य बनवावे ही आवडती कल्पना. दोन व्हिएतनाम एकत्र झाल्यापासून या एके काळच्या अस्पष्ट स्वप्नाला आधार मिळण्याची शक्यता प्राप्त झाली. कंबोडिया हा लगतचा देश कम्युनिस्ट क्रान्तीच्या पोथीतल्या कल्पनाचा मूर्तिमंत अवतार आहे.

आफ्रिकेत सोमालीमध्ये जशी क्रान्ति-पोषक स्थिती परिपक्व आहे असे रशियाला वाटते, तशीच परिस्थिती येथेही आहे. म्हणूनच आन्तरराष्ट्रीय कम्युनिस्ट विजयाचा मक्ता आपल्याच शिरावर असल्याच्या अभि-निवेशाने (जो जगाला आता अपरिचित नाही) व्हिएतनामने कंबोडियाशी कुरबूर सुरू केली. आज नॉमपेन या कंबोडियाच्या राजधानीपासून ३५ मैलांवर असणारे व्हिएतनामी सैन्य १९६८ साली रशियाने चेकोस्लोवाकियावर जे आक्रमण केले होते आणि समाजवादी साम्राज्यवादाला एक तात्त्विक मुलामा देण्याचा जो अयशस्वी प्रयत्न केला होता, त्याचीच आठवण करून देत आहे.

आज आग्नेय आशियामधील या परि-स्थितीवर अमेरिका कोणतेच भाष्य करू इच्छित नाही हे सहज समजण्यासारखे आहे. रशिया व्हिएतनामचा मक्ता उचलून आहे. कारण व्हिएतनामचे नुकतेच चीनशी ताणले गेलेले संबंध ही रशियाला आग्नेय आशियात शिरकाव करायला फार मोठी संधी आहे आणि ती रशिया सोडणार नाही. व्हिएत-नामचे पुनर्वसन हा एवढा जिकिरीचा प्रश्न आहे की, अनंतहस्ते कमलवराने ओढले तरी अपुरेच पडावे. २४०० दशलक्ष डॉलर्सची मदत सध्या रशिया व्हिएतनामला पुरवणार आहे. आन्तरराष्ट्रीय राजकारणात शत्रू आणि मित्र दीर्घकालपर्यंत कधीच कायम नसतात याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे अमेरिकेची मदत मिळवण्याचे व्हिएतनामचे फ्रान्स व त्याद्वारे EEC (turopeam Economic Community) तर्फे चालवलेले प्रयत्न होत.

अर्थातच या साऱ्या नवजात युद्धात चीनची भूमिका महत्त्वाची. चीनची अतर्गत परिस्थिती आज अस्थिर आहे. तेंगसिआओ पेंग हा कोणत्याही क्षणी राष्ट्राध्यक्ष होऊ शकतो. आधुनिकीकरणाची जी प्रचंड योजना चीनने हाती घेतली आहे ती चीनची सर्व शक्ती तिकडे केन्द्रित करायला पुरेशी आहे. त्यामुळे चीन या युद्धात कंबोडियाला अप्रत्यक्ष पाठिंबा देण्याखेरीज काही करू शकत नाही. चीन-रशिया सीमेवरील परिस्थिती इतकी तंग आहे की, थोड्या प्रमाणातसुद्धा चीन सैन्याची हलवाहलव करणार नाही. अर्थात आतापर्यंत ज्या राष्ट्रांना चीनने जोरकस पाठिंबा दिला, त्यानाही सैन्याची प्रत्यक्ष मदत क्वचितच दिलेली आहे; पण तरीसुद्धा रशियाला शह देण्यासाठी त्या विभागात काही तरी हालचाल करणे आवश्यक आहेच; म्हणून चीन कंबोडियाला गोंजारून घेत असावा. तसेच व्हिएतनामचे या निमित्ताने पेकिंगपासून दूर जाणे पेकिंगला नको आहे. म्हणून रशिया जेवढ्या तत्परतेने व्हिएत-नामच्या बाजूने यात उतरलेला आहे, तेवढ्या तत्परतेने चीन कंबोडियाच्या बाजूने उतर-लेला नाही.

याच युद्धाची उपरिनिर्दिष्ट आन्तर-राष्ट्रीय बाजू सोडता, कंबोडियाच्या विश्ले-षणानुसार, अत्यंत व्यावहारिक पातळीवर हा प्रश्न निराळ्याच स्वरूपात पुढे टाकलेला आहे. ही पातळी म्हणजे व्हिएतनामची अन्नान्नदशा. मध्ययुगात जशा उभे पीक कापून नेण्यासाठी व जनावरे पळविण्यासाठी चढाया व्हायच्या तशीच ही दरिद्रीपीडित व्हिएतनामची चढाई आहे असे कंबोडियाचे म्हणणे आहे.

एकूण चीनच्या संदिग्धतेवर भावी परि-णाम अवलंबून आहे; पण दोन्ही बाजूना हे युद्ध दीर्घकालच काय, आणखी अल्पकालही चालू ठेवणे परवडण्यासारखे नाही.

**इंडोनेशिया** : इंडोनेशिया हे सॅपल निराळेच आहे. १९६५ च्या अयशस्वी उठावानंतर प्रचंड प्रमाणात धरपकड होऊन ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या अहवालानुसार ५५,००० ते १ लाख लोकांना तुरुंगात विनाचौकशी डांबण्यात आले. यांच्यात 'अ' दर्जाचे सुमारे दीड हजार लोक आहेत. यांनाच काय ते राजकीय कैदी म्हणून सवलतीनी वागवण्यात येते; पण बाकी 'ब' दर्जाचे जे आहेत ते तर मिसाराणीच्या तीव्र अंमला-खाली इथं आलेल्या प्रचंड प्रमाणातील तुरुंग-वासियाचीच आठवण करून देतात. त्यांच्या-वर निश्चित आरोप नाहीत. ते केवळ संशया-वरून डांबण्यात आले आहेत.

संपूर्ण आग्नेय आशियाला एक मात्र जिवत वरदान लाभलेले आहे. ते म्हणजे विद्यार्थी-शक्ती. इतका जागरूक विद्यार्थी-वर्ग

क्वचितच जगाच्या दुसऱ्या भागात आढळल. ॲम्नेस्टी इंटरनॅशनल, रेडक्रॉस यांना एरवी सुहार्ले या इंडोनेशियाच्या सर्वेसर्वाने भिकही घातली नसती आणि तशी ती घातली नाहीच. रेडक्रॉसला त्याने स्वायत्त आयोग नेमण्यास परवानगी दिली आणि असहकार पुकारून चौकशीचा फार्सच केला; पण इंडोनेशियाच्या विद्यापीठातून धुमारे फुटू लागलेला असंतोष दाबणे कठीण आहे हे तो धूर्त राजकारणी जाणून आहे आणि सध्या त्याने दिलेल्या आदेशाकडे पाहिले म्हणजे तर कालौघावर तो ध्यान ठेवून आहे असेच म्हणावे लागेल. आतापर्यंत धाकदपटशाने असा विरोध खतम करणे चालू होते; पण आता मात्र विद्यापीठाच्या आवारात, अगदी सरकारविरोधी जरी निदर्शने झाली, चर्चा झाल्या, सभा-संमेलने झाली, तरी त्याची गंभीर दखल न घेण्याचे त्याने ठरवले आहे. मात्र रस्त्यावर येणाऱ्यांशी त्याच न्यायाने वागण्यात येईल अशी टांगती धमकी आहेच.

या तथाकथित राजकीय गुन्हेगारांनी आंतरराष्ट्रीय बाजारात, विशेषत: वर्षापूर्वी मानवी हक्कांच्या संरक्षणाचे वलय घेऊन आलेल्या कार्टरच्यामुळे, इंडोनेशियाला वेळोवेळी पेचात पकडले आहे. त्यामुळे १९७९ सालापर्यंत हळूहळू याना, म्हणजे ब दर्जाच्या गुन्हेगारांना, सोडण्यात येईल असे जाहीर करून पहिल्या १०,००० जणांना सोडल्याचे जाहीर केले आहे; पण केवळ त्यांना तुरुंगातून सोडल्याने प्रश्न मिटत नाही. अशा त्रासदायक लोकांना सामावून घेण्यास भेकड सामान्य माणूस तयार नसतो. शिवाय सरकारलाही काही मोठा आनंद या सुटकेने होतो असे नाही, म्हणून त्यांना दूरच्या बेटावर नेऊन ठेवण्यात येते ! म्हणजे ही एकातवासाहून भयानक शिक्षा त्यांच्या नशिबी !

तरीसुद्धा एक बदलते वारे या प्रदेशातून वाहात आहे हे स्वागतार्ह आहे. ☐

**आर्थिक टिपणे**

# उद्योगपती आणि ग्रामीण विकास !

नारायण वैद्य, माजी उपमहापौर, पुणे

**१९४६–४७** ते १९७६–७७ या तीस वर्षांच्या कालामध्ये सरकारने दरवर्षी जे जादा कर बसविले त्याबाबत काही तज्ज्ञांनी नापसती दर्शविलेली आहे. त्यांचे म्हणणे असे की या ३० वर्षांच्या, कालखंडात जादा कर बसवून सरकारने जे जादा उत्पन्न जमा केले ते जर तसे केले नसते व ती रक्कम उत्पादनक्षम उद्योगात गुंतविण्यासाठी तशीच लोकांच्या हाती ठेवली असती तर एकूण राष्ट्रीय उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली असतीच; पण त्याचबरोबर करसंकलनाचा विशाल पाया ( Wider Tax Base ) तयार झाला असता व परिणामी सरकारला अधिक महसूल मिळाला असता.

| वर्ष | ग्रॉस नॅशनल प्रॉडक्ट | जादा कर रुपये (कोटी) केंद्रीय व प्रांतीय |
|---|---|---|
| ४६–४७ | ७,७२० | ५ |
| ४७–४८ | ८,१७५ | ४८ |
| ४८–४९ | ८,६२५ | २८ |
| ४९–५० | ९,१२६ | ३६ |
| ५०–५१ | ९,३३० | ६९ |
| ५१–५२ | ९,७६६ | ५२ |
| ५२–५३ | ९,४०० | ८ |
| ५३–५४ | १०,०२८ | २१ |
| ५४–५५ | ८,९१३ | १३ |
| ५५–५६ | ९,४४९ | १२ |
| ५६–५७ | १०,९४४ | ४६ |
| ५७–५८ | ११,०९९ | ७८ |
| ५८–५९ | १२,४७० | २० |
| ५९–६० | १२,८९४ | ३० |
| ६०–६१ | १३,९९९ | ३० |
| ६१–६२ | १४,७९९ | ८१ |
| ६२–६३ | १५,७२७ | ९५ |
| ६३–६४ | १७,९७८ | २९७ |
| ६४–६५ | २१,११३ | ४७ |
| ६५–६६ | २१,८६६ | २० |
| ६६–६७ | २५,२५० | ७३ |
| ६७–६८ | २९,६१२ | ७८ |
| ६८–६९ | ३०,२९३ | ८० |
| ६९–७० | ३३,५२१ | १११ |
| ७०–७१ | ३६,५६८ | १४९ |
| ७१–७२ | ३८,६२० | २५० |
| ७२–७३ | ४२,१३६ | २०२ |
| ७३–७४ | ५२,१९५ | २९० |
| ७४–७५ | ६१,५५१ | ६०७ |
| ७५–७६ | ६४,१६८ | ३७१ |
| ७६–७७ | ६६,३१८ | १९२ |

संदर्भ :–(१) रिपोर्ट ऑन करन्सी ॲन्ड फायनान्स, १९४५–४६ ते १९७५–७६, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई.

(२) नॅशनल अकौंटस् स्टॅटिस्टिक्स, सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन, १९४८–४९ ते १९७४–७५

वरील कोष्टकावरून असे दिसेल की १९४६–४७ मध्ये जादा कराआकारणीपासून सरकारला ५ कोटी रु. मिळाले. १९७६–७७ मध्ये १९२ कोटी रु. मिळाले व गेल्या ३० वर्षांमध्ये जादा कराआकारणीपासून सरकारला एकूण ३ हजार ४ शे ३४ कोटी रु. मिळाले. ही रक्कम सरकारकडे जमा न होता गुंतवणुकीसाठी लोकांच्या हाती राहिली असती तर एकूण राष्ट्रीय उत्पादनात

निश्चित वाढ झाली असती असे काही तज्ज्ञांचे म्हणणे !

परंतु प्रश्न असा आहे की, जादा कर न आकारता ही रक्कम लोकांच्या हाती राहिली असती तर प्रामाणिकपणे राष्ट्रीय गुंतवणूक म्हणून तिचा वापर केला गेला असता का ? चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करून देशातल्या उद्योगपतींना आणि कारखानदारांना सरकारने कराबाबत अनेक सवलती दिल्या व 'यामुळे वाचणारी रक्कम ग्रामीण भागाच्या विकासाला उपयोगी पडेल व व ज्यामुळे रोजगार–उपलब्धता वाढेल अशासाठी गुंतवावी' असे आवाहनही सरकारने केले होते, त्याचे काय झाले ?

ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशनच्या तामिळनाडू प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीसाठी जमलेल्या उद्योगपतींसमोर भाषण करताना अर्थमंत्री श्री. एच्. एम्. पटेल यांनी त्यांना चांगलेच खडसावले. श्री. पटेल म्हणाले, 'खाजगी उद्योगक्षेत्राला धोका पत्करायला नको, एकसारख्या सवलती हव्यात, अगोदरच भरपूर संरक्षण असताना आणखी अवाजवी सरक्षण हवे. खाजगी उद्योगाने ही वृत्ती टाकून द्यावी आणि देश-उभारणीच्या कार्यास मनापासून हातभार लावावा.'

गेल्या काही महिन्यांत खाजगी क्षेत्रातील उद्योगांना अनेक प्रकारच्या आर्थिक सवलती देऊनसुद्धा अपेक्षेप्रमाणे गुंतवणुकीचा वेग खरोखरच वाढत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. दिलेल्या सवलती पचवून कॉर्पोरेट टॅक्स, भांडवली मालावरील अबकारी कर यामध्ये कपात, विभक्त उत्पन्नावरील करमुक्त आकारणी यांची मागणी सुरू झालेली आहे. त्याचबरोबर सवलतीच्या दराने भांडवल हवे म्हणून खाजगी उद्योगक्षेत्राचा ओरडा चालूच आहे. फक्त काही उद्योग असे आहेत की त्यांनी सरकारच्या सूचनेप्रमाणे करसवलतीतून जमा झालेले उत्पन्न ग्रामीण भागातील जनतेच्या प्रगतीसाठी वापरण्याचे सुरू केले आहे. (त्यातही काही खाजगी कंपन्या हा प्रयोग बऱ्याच वर्षांपासूनच करीत आहेतच); **परंतु जनता सरकारने दिलेल्या आर्थिक सवलतीचा फायदा स्वत:ची श्रीमंती वाढविण्यासाठी काही उद्योगपती करीत असतील तर त्याची योग्य ती दखल आगामी अर्थसंकल्पाचे वेळी घेतली जाणे आवश्यक आहे.** माणूस केवळ श्रीमंत असला म्हणजेच तो गरिबांना मदत करतो असे समजणे वस्तुस्थितीला धरून होईल असे वाटत नाही. दानत, देशनिष्ठा, समाजप्रेम या गोष्टी आणखी वेगळ्या आहेत. एक वर्षाच्या सवलतीचा उपयोग (दुरुपयोग ?) खाजगी उद्योगक्षेत्राने अशा तऱ्हेने केला असेल तर गेल्या ३० वर्षांतील जादा कराची आकारणी न करता ३ हजार ४ शे ३५ कोटी रुपये सरकारने 'जनतेकडे'च ठेवले असते तर त्याचा उपयोग गुतवणुकीसाठी होऊन जी. एन्. पी. (Gross National Product) खरोखरच वाढले असते का असा प्रश्न मनात येतो.

फरक आहे तो वृत्तीचा !

## जकातकर–जैसे थे !

काही आठवड्यांपूर्वी 'माणूस'च्या आर्थिक टिपणामध्ये जकातकरासंबंधी मी लिहिले होते. त्यात एक मुद्दा मी जाणीवपूर्वक वाचकांच्या नजरेस आणून दिला होता की, देशातल्या अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांचा खर्च भागण्यासाठी ज्या काही जमेच्या बाजू आहेत त्यात जकातकरापासून मिळणारा वाटा मोठा असतो म्हणून जकातकर जर रद्द करावयाचे म्हटले तर जमेची पर्यायी व्यवस्था 'कोणाला तरी' करावीच लागेल.

जकात रद्द करण्याबाबत अनेक प्रांतांचा दृष्टिकोन उदारतेचा असला तरी जकात रद्द करण्याचा प्रश्न आज तरी बाजूला सारलेला दिसतो. कारण जकात रद्द केल्यामुळे उत्पन्नात पडणारी तूट भरून काढण्यासाठी केन्द्र सरकार व प्रात सरकारे तयार नाहीत. बहुतेक प्रांतांचे अर्थसंकल्प तुटीचे आहेत. अग्रक्रमाची विकासाची कामे करण्यासाठी आणि नव्याने आकार घेत असलेला रोलिंग प्लॅन नीट पद्धतीने चालविण्यासाठी उत्पन्नाच्या नव्या नव्या बाबी शोधाव्या लागत आहेत. त्यामुळे केन्द्रीय अर्थमंत्रालयाने या प्रश्नावर 'पुढे पाहू' असे धोरण स्वीकारले आहे. चालू आर्थिक वर्षात देशभरचे जकातीचे उत्पन्न २६५ कोटी रुपयांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. यापैकी मुंबई आणि कलकत्ता या दोन मेट्रोपॉलिटनक्षेत्राचे जकातीचे उत्पन्न अनुक्रमे ४७ कोटी ८० लक्ष रुपये व २३ कोटी १५ लक्ष रुपये असेल. सुमारे १ हजार स्थानिक स्वराज्य सस्थांच्या क्षेत्रात जकातकर आहे. गुजरात, हरियाना, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मिर, कर्नाटक, महाराष्ट्र, मणिपूर, ओरिसा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि प. बंगाल या बारा राज्यांत व दिल्ली आणि पाँडेचरी या केन्द्रशासित प्रदेशात जकातकर प्रचलित आहे. प. बंगालमध्ये फक्त कलकत्ता मेट्रोपॉलिटन क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या मालावरच जकात घेतली जाते. मध्यप्रदेश सरकारने मे १९७६ पासून जकात रद्द केली आहे व केन्द्राकडून भरपाई मागितली आहे. जकातकर रद्द करण्याचे तत्त्व जरी सर्वमान्य असले तरी सर्व राज्ये केन्द्राकडून भरपाई मागत आहेत. उलट महसूल वाढविण्यासाठी पर्यायी मार्ग म्हणून (१) विक्रीकरावर सरचार्ज लावणे, (२) उलाढाल कर बसविणे, (३) विक्रीकराच्या धर्तीवर नगर-राज्य कर (Municipal States Tax) बसविणे अशी सूचना केन्द्र सरकारकडून केली जात आहे. आता विक्रीकराबाबत म्हणाल तर बहुतेक राज्यांचे मत असे आहे की, विक्रीकराच्या जागी अबकारी कर आणावा. अशा परिस्थितीत पर्यायी व्यवस्था पूर्ण विचारांती केल्याशिवाय सध्याच्या परिस्थितीत आताच बदल करणे सोयीचे ठरणार नाही, असे विविध प्रांतांच्या मुख्य मंत्र्याशी चर्चा केल्यावर श्री. एच. एम. पटेल यांचे मत बनल्याचे समजते. देशातल्या ज्या प्रांतात येत्या एक-दोन महिन्यात विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत, तेथे जनतापार्टीने निवडणूक जाहीरनामा तयार करताना याबाबत जनतेला काही वचन द्यावयाचे ठरविले असेल तर ती वचनपूर्ती सोपी नाही हे लक्षात असू द्यावे असे सुचवावेसे वाटते.

## चक्रम्‌चक्री (२९)

दीर्घस्मृती विश्वनाथ

# प्रेमकथेला पूर्णविराम

१९२२च्या ऑक्टोबरात मुंबईतील प्रख्यात वकील कन्हैयालाल मुन्शी यांचा संसार कसा चहू अंगानी बहरून आला होता. पहिल्या महायुद्धानंतर पैशाचा पूर मुंबईवर लोटला होता. गुजराती बनिये, पेढीवाले, कारखानदार यांच्या तिजोऱ्या भरून ओसंडत होत्या. साहजिकच कज्जे-दलालीही वाढली होती. मुरब्बी वकील ओंजळीनी पैसा कमवीत होते. अशाच वकिलांत मुन्शींची गणना होत होती. आठवड्याला दोन-अडीचशे गिनी, म्हणजे तीन ते चार हजार रुपये, ते सहज मिळवीत.

पैशाची बाजू भरभक्कम होती आणि कौटुंबिक बाबतीतही काही उणे नव्हते. अतिलक्ष्मीसारखी पतिपरायण धर्मपत्नी होती. पदरी चार मुले होती. इतर गोतावळा-सख्खी-चुलत भावंडे, मावश्या, मामा– मोठा होता आणि त्यांना आधारही [कन्हैयालाल-चाच. वर छत्र मातुश्री जीजीमाचे. जीजीमा मोठी व्यवहारी, जग पाहिलेली स्त्री होती. वडलांमागे तिने [कन्यहैालालना शिस्तीत वाढविले होते. भरूचच्या मुन्शींचा लौकिक कन्हैयालालने मुंबईपर्यंत पोचविला, आणि त्यात आपला वाटा थोडका नाही, याचा अभिमान तिला होता.

मुन्शींच्या गृहस्थीला आणखीही एक बाजू होती. गुजरातच्या इतिहासातील अद्‌भुतरम्य प्रसंगांवर प्रणयपूर्ण कादंबऱ्या लिहून त्यांनी गुजराती वाचकवर्गाला भारून टाकले होते. गुजराती तरुण त्यांच्या शृंगार व अद्‌भुत रसानी परिपूर्ण असलेल्या कादंबऱ्याची पारायणे करीत होते. याच सालाच्या मध्यास त्यांनी 'गुजरात' नावाचे नवे आकर्षक मासिक सुरू केले होते. सतत, संयत, लौकिक, विद्याव्यासंग आणि वडीलधाऱ्यांची देखरेख, संसाराच्या सुखाला आता कमतरता ती कोणती उरली?

पण कुमारवयापासून कन्हैयालालचे एक स्वप्न होते. एक मानसी त्याने कुमारवयापासून इच्छिलेली होती. शाळेत असल्यापासूनच कन्हैयालालला नाटक-कादंबऱ्यांचे आणि काव्याचे वेड होते. प्रत्येक नाटकातून, कादंबरीतून आणि कवितेतून स्त्रीचे चागले गुण आणि रूपछटा गोळा करून त्याने देवीची मानसमूर्ती तयार केली होती– ऋषींनी प्रत्येक रत्नाचा तुकडा-तुकडा घेऊन निलोत्तमा तयार केली तशी! ही देवी आपल्याला कुठे तरी आणि कधी तरी अचानक भेटेल अशी श्रद्धा त्याने कायम मनाशी बाळगली होती. त्याला तसे भासही क्वचित् झाले होते.

पण आता ह्या वयात, अर्धा संसार झाल्यावर आणि फुलांनी घमघमल्यावर अशी देवी आपल्याला भेटली तर केवढा कहर गुदरेल,याचीही कल्पना त्याला होती. मनाच्या एका कोपऱ्यात एक मानसी दडविणे वेगळे आणि ती प्रत्यक्षपणे अवतरल्यावर नीती–रीतीची बंधने ओलांडून प्रीतीच्या किनाऱ्यावर तिच्याशी क्रीडा करणे निराळे; पण तसे घडण्याची शक्यता फारच थोडी होती. लेखक म्हणून प्रसिद्धीला आल्यावर आणि 'गुजरात'-सारख्या नामवंत मासिकाचे संपादन करू लागल्यापासून काही स्त्रियांशी त्याचा पत्रव्यवहारही झाला होता; पण तो अगदीच कोरडा. उदाहरणार्थ, लीलावती शेठ नावाची एक विवाहित तरुणी चमकदार लेख 'गुजरात'मध्ये लिहीत होती. तिच्याशी कन्हैयालालने पत्रांतून क्वचित विनोद केलाही असेल; पण तो देखील अगदी अलिप्तपणे. असो.

तर असे हे कन्हैयालाल माणेकलाल मुन्शी, वकील हायकोर्ट, वर सांगितल्याप्रमाणे (मासिक मनोरंजनाच्या भाषेत) १९२२ सालच्या ऑक्टोबरच्या एका दिवशी बाबुलनाथाजवळील माणिकव्हिला नावाच्या वाडीच्या वरच्या मजल्यावरील आपल्या बिऱ्हाडी, रात्रीचे जेवण उरकून केसचे कागद वाचत कोचावर पहुडले होते. त्यांची धाकटी कन्या त्यांच्या पोटावर बसून लाडिक बडबड करीत होती. इतक्यात, तळमजल्यावरून गाण्याची एक मधुर लकेर त्यांच्या कर्णपथावर आली आणि वसंतागमनाने वेली थरथरावी त्याप्रमाणे त्याचे हृदय झंकारून गेले.

तळमजल्यावर नुकतेच एक नवे बिऱ्हाड आले होते. ते बिऱ्हाड लीलावती शेठ यांच्या सावत्र मुलाचे होते.त्या बिऱ्हाडात लीलावतीबेन आजच अहमदाबादहून आल्या होत्या. मुक्कामाला, कदाचित कायमच्या वास्तव्यासाठी.

### कथेचा परिपोष

लवकरच लीलावती आणि कन्हैयालाल यांची भेट झाली, लीलावती ही कलावती स्त्री होती. पाणीदार, उद्योगी, लाघवी आणि उपक्रमशील होती. तिने कन्हैयालालला 'गुजरात'च्या संपादनात साह्य करण्यास सुरुवात केली. लेख वाचणे, प्रुफे तपासणे, मांडणी करणे या साऱ्या कामात तिचे कौशल्य दिसून येऊ लागले. तिच्या घरी गुजरातीतील प्रमुख लेखकांचा राबता सुरू झाला. रोज सकाळी कन्हय्यालाल कोर्टात जायला निघत तेव्हा लीलावती या दरबारात सम्राज्ञीसारखी बसलेली असे. कधी ती गाणे गाई, कधी वीणा वाजवी. रात्री जेवणे झाल्यावर ती कन्हैयालालकडे येऊन तास-दीड तास 'गुजरात'बद्दल चर्चा करी. कामाचा निपटा होई.

अगदी पहिल्यापासूनच कन्हैयालालना काय किंवा लीलावतीला काय, आपल्या दुसऱ्या विषयीच्या भावना काय आहेत याची किंचितही शंका उरली नव्हती. रस, रूप, स्पर्श, गंध आणि शब्द यांच्या संवेदना वाटून घेण्याची कन्हैयालालची शक्ती लीलावतीच्या संबंधात अतिशय तीव्र आणि सूक्ष्म बनली होती. तिचे केस, तिची चालण्याची ढब, तिची कपडे नेसण्याची पद्धत ही त्याला कुठे ना कुठे, कधी ना कधी अनपेक्षितपणे आढळत. ती घरात असो, बागत असो, की इतर कुठे

असो, ती कोठे आहे आणि काय करीत आहे याचा अचूक अंदाज त्याला असे; इतकेच नव्हे तर, ती आपल्याकडे येण्यासाठी आता जिना चढणार आहे, अशी अटकळही त्याला बांधता येई.

लीलावती आणि कन्हैय्यालाल यांच्या या प्रेमकहाणीची अनेक अनोखी अंगे आहेत. तारुण्याच्या ऐन उंबरठ्यावर, प्रेमासाठी मन आसुसलेले असताना, व्हेन हाफ द वर्ल्ड ए ब्राइड्ग्रूम इज अँड हाफ द वर्ल्ड ए ब्राईड या भावनेने साऱ्या जगाकडे पहात असताना, अचानक भेट झाली.अभावितपणे. रस्त्यातून घाईने जाताना अनवधानाने क्षणाची आटयापाटी खेळली गेली. नंतर सामाजिक समारंभातून, विवाहसोहळ्यांतून परस्परांच्या कटाक्ष-भेटी झाल्या. संभाषणाशिवाय बांधून गेलेल्या भेटी. त्यानंतर सकेतस्थळी भेट झाली. प्रेम वाढत गेले, धागे जुळले. अशा प्रेमकथा आपण अनेक वाचतो. क्वचित् प्रत्यक्षातही घडतात. बहुधा अपेक्षिलेल्या तरी असतातच; पण अशा गोजिऱ्या प्रेमकथेत आणि लीलावती-कन्हैयालाल यांच्या कहाणीत काडीचेही साम्य नाही.

१९२२ साली, लीलावती व कन्हैय्यालाल जवळ आले त्यावेळी, त्या काळच्या आयुर्मानाने पाहता कन्हैयालालचे अर्धे आयुष्य उलटले. होते. लीलावतीने जरी तेवीसच पावसाळे पाहिले होते तरी संसारात कधी न संपणारा उन्हाळा तिच्या वाट्याला आला होता. अनेक अनुभवातून गेल्यामुळे दोघांचेही ठिकाणी एक प्रौढपणा, सुजाणपणा आणि परिपक्वता आली होती. सहज संधी येऊन भेट झाली आणि दोघानी स्वतःला प्रेमात लोटून दिले, असा प्रकार त्यांच्याबाबतीत नव्हता. एखाद्या पोळ्यात मध जसा सहजी पाहता पाहता पण जाणीवपूर्वक भरला जातो, तसं दोघांच्या संबधात प्रेम सहजी, चटकन पण जाणीवपूर्वक भरले गेले. बहुतेक प्रेमसंबंधातून असे आढळते की, एक प्रेम करीत असतो आणि दुसरा प्रेम करू देत असतो; पण काळानेही विस्मित चित्ताने बघत राहावे असे स्वयंभू आणि अति तीव्र प्रेम दोघानाही वाटत आहे, अशी स्थिती विरळाच. मुन्शीच्या प्रेमाचे हे वैशिष्ट्य होते की, प्रत्येकाच्या मनातील भावनांना तितक्याच तीव्र भावनाची दाद मिळत होती.

दोघांच्या प्रेमसंबंधाच्या मार्गात येणाऱ्या व्यावहारिक अडचणीही अनुल्लंघ्य होत्या. दोघाचीही लग्ने झालेली होती आणि वैवाहिक संबंधातील जोडीदार जिवंत होते. दोघानाही मुले होती, लीलावतीची सावत्र मुले तर तिच्याहूनही वयाने मोठी होती. (तिला स्वतःची मुलगी होतीच.) मुन्शीजी जातीने भार्गव ब्राह्मण होते तर लीलावती जैन होती. तो काळ १९२२-२३ चा होता. सामाजिक आणि कौटुंबिक बंधने शिथिल झालेली नव्हती. या अडचणी दिसत असताना दोघांनीही डोळसपणे जवळीक वाढू दिली, आपल्या भावना एकमेकांपासून अगर जगापासून लपवून ठेवल्या नाहीत, ही त्यांची बहाद्दुरीच समजली पाहिजे.

## गंगा आणि पार्वती

लीलावतीच्या जीवनात प्रवेश झाला आणि कन्हैयालालचे लेखन, वकिली आणि सार्वजनिक कार्य या तिहीत नवीनच मार्मिकपणा, बुद्धिकौशल्य आणि तडफ दिसून येऊ लागली. लीलावतीचा सहवास हा प्रेरक आणि उत्साहदायक आहे, असा अनुभव येऊ लागला. तो सहवास जास्तीत जास्त मिळावा अशी दोघांचीही धडपड चालू झाली. प्रत्येकाच्या मनात दुसऱ्याशी संवाद तर अखंडच चालत असे. त्याला प्रत्यक्षात अधिक वाव मिळावा म्हणून दैनंदिन पत्रव्यवहार सुरू झाला. सकाळी दहाचे सुमारास वकीलसाहेब कोर्टात जाण्यासाठी खाली येत तेव्हा आपले पत्र लीलावतीला देत व तिचे पत्र हाती घेत. मोटारमधून कोर्टात जाताना पत्र वाचीत. कामाच्या रगाड्यात फुरसत मिळेल तेव्हा उत्तर लिहीत. संध्याकाळी घरी आल्यावर जिना चढण्यापूर्वी पुन्हा पत्रांची देवघेव होई. रात्री लीलावती 'गुजरात'च्या कामासाठी मुन्शीच्या बिऱ्हाडी येई; परंतु तेव्हा खाजगी संभाषणाला वाव फारसा मिळत नसे. मुन्शी कुटुंबियापैकी कोणी तरी जवळपास असेच.

ही सर्व परिस्थिती फार तणावाची होती आणि हा तणाव वाढतच जाणार होता. हा ताण कमी करायचा असेल, तर लीलावती आणि कन्हैयालाल यांच्या संबंधाची पूर्ण कल्पना कन्हैयालालची पत्नी अतिलक्ष्मी हिला देणे जरुरीचे होते. या कथेतील सर्वांत मोठी गुतागुत हीच होती. त्या साध्वीशी प्रतारणा करणे कन्हैयालालला शक्यच नव्हते; पण हे सगळे आपण अतिलक्ष्मीला सांगणार आहोत याची कल्पना लीलावतीलाही द्यायला हवी होती.

२२ च्या डिसेंबरात मुन्शी एका दौऱ्याचे निमित्ताने अहमदाबाहेर गेले. तिथे ते लीलावतीच्याच घरी उतरले होते. काही बहाण्याने मुंबईहून लीलावतीही तेथे आली. तेथे असताना लीलावतीची केविलवाणी गृहस्थिती मुन्शीच्या नजरेस पडली. लीलावतीचा नवरा लालभाई हा वयस्क, व्यसनाधीन आणि वाया गेलेला मनुष्य होता. तो सकाळी ११ वाजता उठे. इतरांची जेवणे झाल्यावर एकटाच बारा वाजता जेवी व पेढीवर जाई. तेथून अनेक घरे हिंडून, दारू आणि जुगार यात मित्रांसमवेत रमून रात्री केव्हा तरी घरी येई. लीलावतीच्या जिव्हाळ्याची व्यक्ती म्हणजे तिची मुलगी बाला; पण ती अगदीच लहान होती. लीलावतीसारख्या गुणी स्त्रीचे जीवन असे एकाकी, उजाड आणि उदासवाणे होते.

२९ डिसेंबरला मुन्शीचा वाढदिवस होता. त्या दिवशी संध्याकाळी दोघे साबरमतीच्या काठावर फिरावयास गेली. तेथे दोघानी परिस्थितीचा आढावा घेतला. मुन्शींनी विचारले, 'आपली ही विचित्र मैत्री क्षणाची ऊर्मी आहे, की ती आपल्या जीवनाचे एक कायमचे अंग आहे? आपल्या मैत्रीचा बभ्रा झाला, लोकनिंदेची चिखलफेक झाली, कौटुंबिक शिव्याशापांचे फटकारे बसले तर त्याला तोड देऊन मैत्री टिकविण्याची हिम्मत आपल्यात आहे का?' 'माझं आयुष्य शुष्क, एकलकोंडं आणि असह्य आहे, तुमची मैत्री हेच माझं सर्वस्व आहे!' 'पण, माझी इतिश्रीही कदाचित् येईल!' 'अशी वेळ आली तरी मी आहे तशीच राहीन!' 'मी आपल्या दोघांच्या आत्म्यांची अविभक्त जोडी स्वप्नात जोपासली आहे. त्याचा वास्तवात साक्षात्कार घडवणं हेच मी जीवनाचं ध्येय मानतो. तुझी श्रद्धा अशीच आहे का?' 'आत्मा वगैरे काही मी जाणत नाही; पण माझी तुमच्यावर श्रद्धा आहे आणि त्यामुळे आत्म्यावरदेखील आहे!' 'हा अविभक्त आत्मा साकार करायचा असेल, तर तपश्चर्या करावी लागेल. अतिलक्ष्मीला सारे सांगावे लागेल!' 'अतिलक्ष्मीबेनला सांगा की, निर्धास्त रहा. जे तिचं आहे, ते मी मागत

नाही. जे तिला मिळालेलं नाही आणि मिळणारही नाही त्याचं दान तिनं मला केल, तर मी ते स्वीकारीन ! '

'मुन्शीजी पुराणकथात रमणारे. त्याना वाटल, शंकराने मस्तकी गंगा धारण केली आणि पार्वतीशी ससार केला. तसच आपणही करू. त्यानी अतिलक्ष्मीला बडोद्याला बोलावून घेतले. अहमदाबादहून भडोचला जाताना बडोद्याला अतिलक्ष्मी गाडीत चढली. गाडीत मुन्शीनी आपले आणि लीलावतीचे रहस्य लक्ष्मीला सांगितले. गंगा आणि पार्वती ही कल्पनाही सांगितली. अतिलक्ष्मी बिचारी घरगुती अनपढ स्त्री. दोन-तीन दिवसानी मुन्शीच्या लीलावतीशी असलेल्या मैत्रीला तिने संमती दिली. या सर्व हकीकतीत कुणी कुणाला फसविले, की प्रत्येकाने स्वतःला फसविले, की सर्वचजण प्रामाणिक होते, ते ठरविणे कठीण आहे.

तेवीस सालच्या मार्च-एप्रिल-मे या तीन महिन्यात कन्हैयालाल, लीलावती आणि अतिलक्ष्मी अशा तिघानी मिळून युरोपचा प्रवास केला. हा सर्व प्रवास कशा दडपणाखाली झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. स्वित्झर्लंडमधील निसर्गसौंदर्याने कविमनाचे मुन्शी तरंगायला लागले यात नवल नाही. इंटर लॉकन या ठिकाणी कालव्याने जोडलेली सरोवरे आहेत. या सूचक निसर्गदृश्याने प्रेमी जोडीच्या वृत्ती उफाळून आल्या.

प्रियकर व प्रेयसी याना सर्व काही समाईक, पण दोघातच राहयला हवे असते—अगदी भाषासुद्धा. त्यामुळे बहुधा काही शब्दसमुच्चय प्रेमीयुगुलामध्ये विशिष्ट आणि वेधक अर्थ धारण करतात. लीलावती आणि कन्हैयालाल यांच्या प्रेमजीवनात अविभक्त आत्मा, इंटरलॉकन, हर्डरकुस्म (इंटर लॉकनजवळचे खेडे), प्रकरण नवमुं या शब्दप्रयोगांना असेच विशिष्ट आणि वेधक स्थान आहे.

तेवीसच्या मेत यूरोपच्या प्रवासाहून मुन्शी दांपत्य आणि लीलावती परत आली आणि 'गंगा-पार्वती' हे प्रयासाने जमलेले नाते तुटून पडले. प्रेमाचा शाश्वत त्रिकोण अधिराज्य गाजवू लागला.

## प्रेमाचा त्रिकोण

अतिलक्ष्मीने कन्हैयालाल व लीलावती याच्या मैत्रीला मान्यता दिली होती. त्या दोघांतील संबंध शुद्ध आहेत, याचीही तिला खात्री होती; पण कन्हैयालालच्या आपल्यावरील प्रेमात कोणी वाटेकरीण असावी ही कल्पना तिला सहन होणारी नव्हती. हा आपला अपमान आणि पराभव आहे, असे तिला वाटणे साहजिक होते. आपण कोठे तरी कमी पडलो या भावनेतून तिने कन्हैय्यालालची भावडी आणि असंतुष्ट चाकरी करण्यास सुरुवात केली. तिचे सतत नवऱ्याकडे लक्ष असे. सहज त्याचा हात कपाळाकडे गेला तरी ती विचारी, 'डोक दुखतंय ? चेपू का ? लेप घालू का ?' रात्री केसचा अभ्यास चालू असताना ती शेजारी उभी राहून एकटक बघे. मानसिक ताणामुळे मुन्शीना रात्री झोप येत नसे. तीही सारी रात्र नवऱ्याबरोबर तळमळत काढी. या तिच्या चाकरीने कन्हैयालाल अधिकच विव्हल होई.

कन्हैयालाल आणि लीलावती यांच्यासंबंधीचा बोभाटा आता सर्वत्र झाला होता. वकिलांच्या बैठकीतून, साहित्यिकांच्या अड्डयांतून, इतकेच नव्हे तर वर्तमानपत्रांतून नि मासिकांतून या बोभाटयाचे कुत्सित ध्वनी ऐकू येत. मुन्शीच्या 'गुजरात'ला स्पर्धक म्हणून 'गुजराती' नावाचे नियतकालिक निघत होते. त्यात या प्रेमिकयुगुलाविषयी विडंबनपर कविता, कुजट चुटके आणि आडवळणी टोमणे येत असत.

मुन्शीच्या कुटुंबातील वडीलधाऱ्या मडळीतही या प्रकरणाची दखल उघडपणे घेतली जाऊ लागली. जीजीमा भरूचहून उठून मुंबईला आली. तिने मुलाची उलटतपासणी घेतली. लीलावतीलाही ती भेटून आली. सर्व बाजूनी असे कोंडल्यासारखे वातावरण झाले होते. कधी कधी कन्हैयालालच्या मनात असेही येई की, धंदा—ससार सोडून द्यावा आणि नर्मदेच्या काठी संन्यस्त रहावे !

हा तिढा अचानक आणि अतिशय दुर्दैवी रीतीने सुटला. १९२४ च्या फेब्रुवारीत अतिलक्ष्मीचे निधन झाले. तशी ती बरेच दिवस आजारी होती; परंतु ती मृत्यू पावेल असे कोणाला वाटलेच नव्हते.

## गाठ सुटली

सुनेच्या मृत्यूनंतर जीजीमा मुलाचा उद्ध्वस्त संसार लागी लावण्यासाठी पुढे सरसावली. मुलांना घेऊन ती प्रथम माथेरानला आणि नंतर पाचगणीला जाऊन राहिली. लीलावतीही या दोन्ही ठिकाणी जाऊन राही. मुलांना तिने आपलेसे केलेच; पण जीजीमाची मर्जीही सांभाळली.

इकडे लीलावतीचा नवरा लालभाई यांचा धंदा अधिकाधिक खोलात बुडत चालला होता. तो पुरा बरबाद होण्यापूर्वी त्याच्या इस्टेटीतला जमेल तितका भाग लुबाडण्याच्या हालचाली त्याच्या मुलांनी चालविल्या. लीलावतीनेही तिची मुलगी बाला हिची कायमची व्यवस्था लावा असा लकडा लावला. उलट, लालभाई लीलावतीकडे तिचे सोने-नाणे मागू लागला. एकदा तर लीलावतीकडच्या किल्ल्या भय्याकरवी काढून घेण्याची धमकी त्याने दिली. त्याबरोबर मुलीला त्याच घरी ठेवून लीलावतीने नवऱ्याचे घर सोडले. मुन्शीनी तिला साताक्रूझला एका बंगल्यात ठेवले. लालभाईच्या मुलांपासून तिचे रक्षण व्हावे म्हणून पोलिसात खबर दिली. खुद्द मुन्शीही तेव्हा पिस्तुल बाळगून असत.

पुढे लीलावतीने शिकण्याची इच्छा दाखविली म्हणून तिला पाचगणीच्या कॉन्व्हेंटमध्ये ठेवले. तेथेच मुन्शीची मुले व जीजीमा बंगला घेऊन रहात होती. त्यामुळे लीलावती जवळपास घरचीच झाली. तिची टापटीप, उमदा स्वभाव, कलागुण, चलाखी यामुळे ती सर्वांची आवडती बनली.

१९२६ च्या जानेवारीत लालभाई वारला. सुटला. त्यानंतर १५ फेब्रुवारी १९२६ ला कन्हैयालाल आणि लीलावती यांचा वैदिक पद्धतीने विवाह झाला.

## जोडयात्रा आणि वैधव्य

त्यानतर कन्हैयालाल आणि लीलावती यांनी काय कार्य केले ते सर्वांसमोर आहे. कन्हैयालालनी मुंबई प्रांताचे गृहमंत्रिपद, केंद्रीय अन्नमंत्रिपद, उत्तर प्रदेशचे राज्यपालपद अशी महनीय पदे भूषविली. स्वातंत्र्यलढ्यात, सस्थानांच्या विलिनीकरणाच्या प्रकरणी महत्त्वाची कामगिरी बजाविली. भारतीय विद्याभवनाची स्थापना करून टोलेजंग सांस्कृतिक कार्य केले. लीलावतीबाईंनी स्त्रियांच्या चळवळी, लहान-मोठ्या सार्वजनिक चळवळी, अन्नपूर्णा कॅफेटेरिया वगैरे कामे केली.

कन्हैयालालच्या मृत्यूनंतर विद्याभवनाच्या कार्याची धुरा बाईंनी किती यशस्वी रीतीने वाहिली, हे सर्वांना माहित आहे. भारतीय परंपरेत वैधव्याला अतिशय ओंगळ अर्थ आलेला आहे; पण वैधव्य हे पतीच्या कर्तृत्वाची वाढविलेली रत्नरेखा आहे, हा तेजस्वी विचार बाईंनी आचरून दाखविला.

एका भयाण वादळातून अविभक्त आत्म्याची तेवती पणती त्यांनी शर्थीने वाचविली होती. त्या पणतीच्या प्रकाशात त्यांनी आयुष्याची उरलेली वाट कापली. गेल्या ६ जानेवारीला त्याच अविभक्त आत्म्यात त्या विलीन झाल्या ! अगदी शांतपणे झोपलेल्या असताना. जाताना कदाचित त्या इंटरलॉकनचेच दृश्य स्वप्नात पहात असतील. □

कथा

# तो

## उदय फडणीस

वास्तविक पूर्वीही तो बरेच वेळा दिसत असे. त्याचा तो धूसर अस्पष्ट चेहरा, तेलकट पाटीवर गिरविलेल्या अक्षरांसारखाच पुसट दिसे. खांद्यावरची तितकीच मळकट, मेणचट वाटणारी शबनम पिशवी, एखाद्या गर्भार बाईने पुढे ओढून घेतलेल्या शेपट्या इतकीच बेढबपणे हालत असे. या सर्वांतून लक्षात राहण्यासारखी प्रतिमा निर्माण होणे कठीणच. कॅफेच्या धूसर वातावरणात तर त्याचे असे रूप धुक्यात विरघळून गेलेल्या एखाद्या वाटसरूसारखेच वाटे. मुद्दाम ओळख काढून बोलणे तर दूरच राहो; परंतु समोर दिसल्यावरं पुसटशा ओळखीचे हास्य निर्माण होण्याइतकीही त्याच्या अस्तित्वाची जाणीव माझ्या मनाला होत नसे. क्वचित प्रसंगी मित्रांच्यावरोबर बसला असला तरीही तो अगदी एकटा वाटे, उपरा वाटे! अस्ताव्यस्त पसरलेल्या गर्दीच्या अॅमीबाचा एक लहानसा, आकारहीन अस्पष्टपणे थरारणारा अवयव, इतकेच त्याचे अस्तित्व. साहजिकच त्याचे ते बिनचेहऱ्याचे अस्तित्व मनाच्या पडद्यावर नोंदविले गेलेच नाही कधी. अशी तोंड मिटून बसणारी, आपलं अस्तित्वच गमावून बसलेली माणसं मला फारशी रुचत नाहीत.

आणि म्हणून एका संध्याकाळी मधू करमरकरने त्याच्याशी ओळख करून देताच मधूने माझी फिरकीच घेतल्यासारखे मला वाटलं. रीतीखातर एक उसनं हास्य करण्यापलीकडे त्याची विशेष दखल घ्यावी, असं निदान त्या वेळी तरी मला वाटलं नाही. त्या संध्याकाळी त्याच्याशी आणखी काही बोलल्याचं मला आठवत नाही. मी पुन्हा एकदा नेहमीच्या वातावावरणात बुडून गेलो होतो. सिगारेटचा धूर सोडीत तोही जवळच्याच एका खुर्चीत बसून राहिला होता, एखाद्या स्थितप्रज्ञासारखा. आपल्या अस्तित्वाची पुसटशीही जाणीव आम्हाला करून देण्याची आवश्यकता त्याला वाटली नाही!

अशीच एक धूसर संध्याकाळ. त्या दिवशी मित्रांपैकी कोणीही कॅफेकडे फिरकलं नाही. आमचा नेहमीचा कोपरा बापुडवाणा होऊन अंग चोरून बसला होता– एखाद्या अस्थिपंजर, भिन्या कुत्र्यासारखा. रात्रीचा पुकारा करण्यास आलेली संध्याकाळही आज काहीशी उदासवाणी भासत होती आणि या अशा वातावरणात तरंगणारे तलतचे दर्दभरे स्वर! मन नकळत त्या वातावरणात विरघळून गेले. 'है सबसे मधुर वो गीत–' तलतचे सर्वांत ग्रेट गाणे. अर्थात हे मत माझे! पहिल्या-पहिल्यांदा मित्रांमध्ये माझं हे मत मोठ्या हिरीरीने मी मांडीत असे; परंतु गाणं बाजूलाच राहून वितंडवादच फार, हे लक्षात येऊ लागताच मी स्वतःपुरता त्या गाण्याच्या कोषामध्ये स्वतःला गुरफटून घेऊ लागलो. त्या दिवशीही असाच भान विसरून त्या गाण्याचा कोष स्वतःभोवती विणत बसलो होतो. 'सुरेख! डोक्यात चढतं हे गाणं!' तलतने बाकी काहीही न गातां केवळ हे एकच गाणं दिलं असतं तरी आपण त्याला मानला असता!' चमकून मी बाजूला बघितलं. समोर तो बसला होता. धूमकेतूसारखा अचानक उगवला होता. ओझरत्या ओळखीचा अदृश्य धागा धरून आला होता. माझ्या मनातील आवर्तनं मलाच ऐकवत होता. मी त्याच्याकडे पाहातच राहिलो. आजूबाजूच्या वातावरणास आंधळ्या हाताने चाचपडत राहिलो. तो पटकन् हसला होता. अरे, याच्या हसण्यात एक वेगळेपण आहे. एखाद्या बुद्धाच्या जिवणीवरील उदासीन हास्यासारखं! त्याच्या कोऱ्या चेहऱ्याला न शोभणारं. उदासवाणी कडा असलेलं. 'अगदी तलतच्या गाण्यासारखं! 'तलतचं हे गाणं ऐकलं की, डोकं विलक्षण भन्नाट होऊन जातं!' पूर्वीची अलिप्ततेची कात टाकून मीही नकळत त्याच्याकडे ओढला जाऊ लागलो. त्याच्या हास्याची सोनेरी किनार अधिक जवळून पाहण्यासाठी. भडाभडा तलतच्या गाण्यासंबंधी बोलू लागलो. शैलेन्द्रच्या त्या गीताचा प्रत्येक शब्द हळुवारपणे गोंजारू लागलो. आणि तो? पुन्हा एकदा शून्य चेहऱ्याने माझ्याकडे बघत राहिला; ओठाचा पीळ अधिकच आवळून घेत! माझ्या हे लक्षात येताच मी अतिशय नाराज झालो त्याच्यावर. विलक्षण चीड आली त्याची. वाटलं, त्याला धरून गदगदा हलवावं. जाणीव करून द्यावी, त्यालाच त्याच्या जिवतपणाची. नंतर काही बोलण्याची इच्छाच राहिली नाही. समोर दिसला तरी या प्राण्यास पुन्हा ओळखही द्यायची नाही, असा निश्चय करून चव गेलेल्या तोंडाने थंड चहाचे घुटके होऊ लागलो.

असाच एकदा चर्चगेटकडे जाणाऱ्या बसमध्ये तो दिसला होता.

ओळख दाखवणारं हास्य करीत शेजारीच येऊन बसला होता. ओळख न दाखवण्याचा निश्चय तसाच राहिला. पराभूत योद्ध्यासारखी अवस्था झाली होती माझी. विलक्षण चीड आली होती; परंतु त्याला जणू माझ्या रागाशी काहीएक कर्तव्य नव्हतं. चेहऱ्याशी विसंगत असं आपलं सलगीचं हास्य करीत त्यानं आपलं अस्तित्व माझ्यावर लादलं. बराच वेळ काही न बोलता बसून राहिला– आपल्या शून्य नजरेनं खिडकीबाहेर न्याहाळीत. मीही काही न बोलता बसून राहिलो होतो. 'कोसला' वाचली आहे तुम्ही? भालचंद्र नेमाडयांची?' चमकून मी त्याच्याकडे पाहात राहिलो. प्रेताच्या तोंडून शब्द ऐकल्यासारखं वाटलं मला. 'एक विलक्षण अनुभव आहे, ती कादंबरी म्हणजे!' पुन्हा एकदा त्याने आपल्या अस्तित्वाचं वेटोळं मिटून घेतलं. माझ्या उत्तराची त्याला अपेक्षाच नव्हती. खांद्यावरील शबनम पिशवीची चाळवाचाळव करीत तो पुन्हा एकदा बसून राहिला, निःशब्द! मध्येच एकदा पिशवीत हात घालून दिलीप चित्र्यांचं 'ऑर्फियस' काढलं. 'एकदा ऑर्फियस वाचा तुम्ही.

झपाटून जाल.' माझ्या हातात पुस्तक कोंबीत तो म्हणाला. मला अचानक जाणवलं, माझ्याविरुद्ध तो कट्च करतो आहे. माझ्याच आवडीनिवडी—माझेच विचार, मलाच ऐकवून माझी फिरकी घेतोय. वास्तविक 'ऑर्फियस' वारंवार वाचून त्यानं भन्नाट होऊन जाणं हा माझा आवडता छंद! परंतु तेवढं सांगण्याचीही संधी त्यानं मला दिली नाही आणि मधल्या एका स्टॉपवर तो उतरून गेला. जाताना एक चकार शब्दही न बोलता. आश्चर्य म्हणजे मीही त्याच्याकडून अपेक्षा केली नाही. त्याचं ते हवेत विरून जाणारं अस्तित्व मीही नकळत मान्य करू लागलो होतो!

अचानक अनपेक्षितपणे दत्त म्हणून समोर ठाकणं, हा त्याचा स्थायीभावच ठरू लागला होता. गुरुदत्तच्या पुण्यतिथीच्या दिवशी असेच आम्ही एकत्र जमलो होतो. 'प्यासा'ची गाणी आठवत गुरुदत्तच्या आठवणी काढीत आम्ही बसलो होतो आणि अचानक तो दिसला—एका निरुपद्रवी कोपऱ्यात एकटाच बसलेला. तसाच शून्यात हरवून गेलेला. आठवण झाली ती 'प्यासा'-मधल्या गुरुदत्तची! आपल्याच शोकसभेत एका कोपऱ्यात धक्के खात उभ्या असलेल्या गुरूची!! व्यक्तित्व हरवलेल्या गुरुदत्तची. एक विलक्षण साम्य पटकन मनात लकाकून गेलं. का कोण जाणे, त्या दिवशी त्याची ती शून्य नजर विसंगत वाटलीच नाही. बाहेर पडता पडता जवळ कोणी तरी गुणगुणल्याचा भास झाला. 'तंग आ चुके है कशमकशे जिंदगीसे हम.' 'प्यासा'तल्या गुरुदत्तइतकंच प्रत्ययकारी वाटलं ते गुणगुणणं. आजूबाजूला पाहिलं. शबनम पिशवीची चाळवाचाळव जवळच जाणवली. 'तुम्हाला उशीर होत नसेल तर जरा समुद्रावर बसू', आणि माझ्या प्रतिक्रियेची अपेक्षाही न करता तो चालू लागला. 'भाऊ पाध्यांचा लेख वाचलात 'माणूस'च्या दिवाळी अंकातला? गुरुदत्तवर लिहिला आहे.. गुरूवर अतोनात प्रेम करणारेच त्याच्यावर कळत न कळत अन्याय करून जातात.' उत्तर देण्यात काहीच अर्थ नव्हता. उत्तराची अपेक्षाही नव्हती. 'गुरुदत्तला आवडलं नसतं, त्याच्यात इतकं गुरफटून गेलेलं. कामूचं आउटसाइडर वाचलंय तुम्ही? स्वत:च्या मृत्यूकडे एका निखळ कोऱ्या अलिप्ततेने पाहणारा त्याचा नायक मन अस्वस्थ करून जातो. गुरूलाही हीच अलिप्तता अपेक्षित होती.' समुद्राच्या अथाग विस्ताराचा ठाव घेत तो बोलत होता. माझं अस्तित्वही विसरून जाऊन. त्याचं वागणंच असं होतं. इतरांना दूर ठेवून अलिप्त होतं. त्याचं ते तुटक, एका लयीत बोलणं दुरून कानावर पडत असल्याचा भास होत होता. काही वेळ तो तसाच नि:शब्द, लाटांपलीकडे अव्यक्ताचा वेध घेत बसून राहिला. 'गुरुदत्तला माणसंही खरोखर विलक्षण भेटली. साहिरशिवाय 'प्यासा' पूर्ण वाटलाच नसता. साहिरचं 'ताजमहल' वाचलं आहे तुम्ही?

ये चमनजार, ये जमनाका किनारा,
ये महल
ये मुनक्करा दरो-दीवार,
ये महराव, ये ताक।
इक शहनशाह ने दालत का
सहारा लेकर
हम गरीबों की मोहब्बत का
उडाया है मजाक।
मेरी महबूब कहीं
और मिला कर मुझसे।

ताजमहालवरील इतकी जिवंत प्रतिक्रिया आणखी कोठेही पाहायला मिळणार नाही तुम्हाला!' रात्रीच्या त्या वाझ वातावरणात त्याचे ते बोलणं एका वेगळ्याच समस्येची पूर्तता करू पाहात होतं. माणसाच्या अस्तित्वाच्या समस्येची पूर्तता! अलिप्त निरीक्षकाची भूमिका बजावत असतानाही नकळत माझं मन त्याच्या भावविश्वाचा ठाव घेऊ पाहात होतं आणि अचानक जुळू पाहणारी तार टचकन तोडून टाकल्याप्रमाणे तो उठला. 'जाऊ या.' त्याची ही नेहमीचीच तऱ्हा. कित्येक वेळा मला तो फारच अजाण वाटे. अगदी कुमारिकेच्या गर्भाशयाइतका अजाण! त्याची ती शून्य नजर—तीही अजाण!! परंतु त्याचं बोलणं मात्र अगदी गर्भवतीला आलेल्या वेणेप्रमाणे वाटे. खोल हृदयातून उठलेल्या जीवघेण्या वेदनेप्रमाणे. विसंगती ही तर त्याचं अस्तित्व होती. एकदा आला आणि बराच वेळ नुसता बसून राहिला. मध्येच अचानक विचारू लागला, 'वात्स्यायनाचं हे कर्ज कधीच का फिटणार नाही? चक्रवाढव्याज जमलंच नाही कधी. नाही तर ते सगळं कर्ज अगदी मुद्दलासकट हिजड्याच्या पदरी टाकून केव्हाच मोकळे झालो असतो.' त्याच्या या बोलण्याने मी मात्र पार भन्नाट होऊन गेलो. त्या रात्री झोपच आली नाही. मनाच्या काळोख्या कोपऱ्यात उगाचच जाणवत होतं, ताज्या गर्भाचं ओलं अस्तित्व! पूर्वी दुर्लक्षित केलेलं त्याचं अस्तित्व मनातील रेणूरेणूमध्ये प्रचंड जीवघेणं वादळ उठवू लागलं. मन एक धोक्याचा इशारा वारंवार देत होते. अतिशय खतरनाक आहे हा माणूस! एक भयंकर प्रलय याच्या मनात चालला आहे. जवळ जाशील तर केवळ एक भन्नाट अपूर्णता तुलाही ग्रासून टाकील. प्रत्येक वेळेस माझेच विचार, माझ्याच मनातील खळबळ, माझ्याच पुढे उघडून दाखविणाऱ्या या महाभागाचा कित्येक वेळा रागही येत असे. मला प्रिय असलेलं प्रत्येक पुस्तक मलाच आवर्जून 'वाचून बघा' म्हणून सांगणारा तो कित्येक वेळा मन बेचैन करून टाकीत असे.

एकदा असाच कुठून तरी झपाटल्यासारखा येऊन माझ्या शेजारच्या खुर्चीवर बसला. हातात काफ्काचं 'ट्रायल' होतं. काफ्काच्या तीन्ही कादंबऱ्यांची आणि माझी तशी जुनी ओळख. विशेषत: 'ट्रायल' आणि 'कॅसल'च्या प्रत्येक वाक्याचा अन्वयार्थ लावण्याचा आणि स्वत:च तो खोडून काढण्याचा माझा आवडता छंद. कोणताही एक साचेबंद अन्वयार्थ मनाला पटलाच नाही कधी. काफ्काच्या लेखनामधील संदिग्धतेमधून उद्भवणारी भेदक वेदना अनुभवणं आणि वेगवेगळ्या शक्यतांच्या निबिड अरण्यात हरवून अंतिम, निखालस, परंतु कधीही स्पर्श होऊ न शकणाऱ्या सत्याचा पाठपुरावा करणं, हा तर माझ्या मनाचा आवडता खेळ. आणि आज तो मला काफ्काच्या लिखाणाचा अन्वय सांगतोय! 'काफ्काचं साहित्य म्हणजे एक प्रचंड शून्य आहे. एक निखळ कोरेपणा आहे. त्यावर कोणताच ठसा उमटू शकत नाही.' त्याच्या निखळ कोऱ्या चेहऱ्याकडे पहात मी ऐकत राहिलो, एखाद्या अज्ञानी मठ्ठासारखा! त्यालाही त्याचीच अपेक्षा असावी! अथवा कोणतीच अपेक्षा नसावी!! खानोलकर हे त्याचं असंच एक श्रद्धास्थान. 'काय विलक्षण ताकद आहे या माणसाच्या लेखनात! वाचताना डोक्यात एक जीवघेणं थैमान — एक

प्रलयंकारी खळबळ उडून जाते. डोक्याच्या चिधडया उडून मेंदू फुटून जाईलसं वाटतं!' हळूहळू त्याच्या भावविश्वातील प्रतिमांची ओळख पटू पहात होती. काफ्का, काम गुरुदत्त, खानोलकर, चित्रे चिरपरिचित प्रतिमा! परंतु त्यांनाही याने फारस जवळ येऊ दिलं असेल, असं वाटत नाही.

त्याचे ते धूसर, पारा उडून गेलेल्या आरशातील प्रतिबिंब माझ्या परिचयाचं होऊ पहात होतं आणि अचानक काल मधूने बातमी आणली की, तो गेला! तपशिलात शिरण्याची कोणालाच आवश्यकता भासली नाही. आजही माझ्या मनाची प्रतिक्रिया अजमावण्याचा मी प्रयत्न करीत आहे; परंतु ती मलाही तितकीशी उमजत नाही. तो नेहमीप्रमाणेच अचानक मध्येच उठून गेल्यासारखे वाटत आहे, पुन्हा अचानक उगवण्यासाठी, एखाद्या धूमकेतूसारखा! आठवते आहे आरती प्रभूची 'खार' ही कविता.

तो जगताना होता, असेल कदाचित
रामायणातील
सेतुबंधाच्या उद्योगातील एक आत्मा
एका खारीचा, रेतीचा कणकण आणणारा
पण ती खारही मेली असेल एखाद्या
खडकाखाली रामाचा हात पाठीवर
असून सुद्धा
त्या खारीचं शेपूट रहावं,
एखाद्या बालबोध पुस्तकात, एखाद्या
मस्तकात त्याची आठवण असावी
तो जगला आणि मेला या वाक्यांत
फार तर शब्दांचा पेंढा भरता येईल; पण
त्या पुढे पूर्णविराम देण्याचा अधिकार
त्या सेतुबधाभोवतीच्या सागरालाच आहे.

□


## प्रकाशित झाले

# टच

कालच्या
बायसिकल थीव्हज्‌पासून
आजच्या
चोमाना डुडीपर्यंतच्या
पंधरा
देशी–विदेशी
चित्रपटांची
ओळख

अशोक
प्रभाकर
डांगे

## प्रकाशनाच्या वाटेवर

# पश्चिमेचे पुत्र

ऑस्कर वाइल्ड
अर्नेस्ट हेमिंग्वे
विन्स्टन चर्चिल
एडगर वॉलेस
......

पश्चिमेच्या या प्रतिभावंतांची
सुंदर व्यक्तिचित्रे

रवींद्र पिंगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.
दहा रुपये

पुस्तके

# सामर्थ्ययोगी रामदास

## तात्त्विक विवेचनाला वाहिलेला प्रबंध

समर्थ रामदासस्वामींच्या वाङ्मयावर आणि त्यांच्या सांप्रदायिक कार्यावर आधारलेले अनेक प्रबंध अथवा शोधनिबंध आजवर पुढे आलेले आहेत. त्यात कै. इतिहासाचार्य राजवाडे, कै. पांगारकर, कै. समर्थभवन देव, कै. ज. स. करंदीकर, कै. आळतेकर, कै. अनंत रामदासी, कै. भा. वा. भट इत्यादी समर्थ–भक्ताचे सशोधन जितके मोलाचे आहे, तितकेच किंबहुना अधिक वास्तव आणि चिकित्सक दृष्टी बाळगल्यामुळे अलीकडील कै. श्री. म. माटे, प्रा. न. र. फाटक, काकासाहेब कारखानीस, गुरुदेव रानडे, डॉ. शं. गो. तुळपुळे, पु. पां. गोखले, कै. डॉ. शं. दा. पेंडसे, बा. रं. सुठणकर, प्रा. गं. बा. सरदार, प्रा. भा. श्री. परांजपे, महाराष्ट्रकवी यशवंत, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इत्यादी विचारवंतांचेही लेखन मोलाचे ठरते. रेव्ह. डब्ल्यू. एस्. डेमिंग या पाश्चात्य विचारवंताचाही त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. समर्थावर स्वतंत्रपणे ग्रंथलेखन किंवा शोधबुद्धीने स्फुट लेखन करणाऱ्या या विद्वान मंडळीच्या विचारात सर्वसाधारणपणे दोन तट पडलेले दिसून येतात. समर्थांचे राजकारण हा त्या दोन भिन्न मतप्रणाली निर्माण करणारा अत्यत वादग्रस्त प्रश्न. तथापि या वादग्रस्त विषयाची सागोपांग चर्चा करताना समर्थ राजकारणी संत होते, या मुद्द्यावर सर्वस्वी भर देणाऱ्या विचारवंतांची आत्यंतिक समर्थ भक्ती दिसून येत असली तरी समर्थांचा आणि तत्कालीन राजकारणाचा कसलाही संबंध नव्हता, असे म्हणणारे विचारवत समर्थद्वेष्टे आहेत किंवा होते असे म्हणण्याचे काहीच कारण नाही. कारण समर्थांच्या वाङ्मयाद्वारे त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना त्यानी जी एक विशिष्ट दृष्टी ठेवून विवेचन केले आहे, त्यातून समर्थांचे मोठेपणच व्यक्त होते, यात संशय नाही.

प्रस्तुत प्रबंधाद्वारे प्रा. पुजारी यांच्या व्यासंगाचा आणि विशेषतः चिंतनशील वृत्तीचा पुरेपूर प्रत्यय येतोच; परंतु त्यांच्या चिंतनात एक प्रकारचा बाणेदारपणा असल्याचाही प्रत्यय येतो. 'समर्थवाङ्मयासबंधीच्या माझ्या चिंतनामध्ये औद्धत्य व आक्रमक आग्रहीपणा आहे, असे वाचकांस वाटेल' अशी जाणीव लेखकानेच आरंभीच्या निवेदनात व्यक्त केली आहे. या जाणिवेतील 'औद्धत्य' हे विशेषण सोडून दिले तर आक्रमक आग्रहीपणा मात्र आहे, हे कबूल करावे लागते. अर्थात लेखकाच्या आक्रमक आग्रहीपणामागे जशी समर्थाविषयीची नितांत भक्ती प्रेरक असल्याचे दिसून येते तसा, लेखकाने केलेल्या समर्थांच्या समग्र वाङ्मयाचा आणि कार्याचा सखोल अभ्यासही प्रेरक असल्याचे दिसून येते.

### सामाजिक मनाचे दर्शन

समर्थ हे 'सामाजिक नीतिशास्त्राचे, समाजरचनेचे व राज्यशास्त्राचे तत्त्वज्ञ होते, त्यांच्या या सर्व तात्त्विक चिंतनाची परिणती सामाजिक पुनर्घटनेच्या ध्येयात कशी होते याची उकल लेखकाला या प्रबंधात करावयाचा आहे. 'समाजनिष्ठा हे समर्थांच्या वाङ्मयाचे अद्वितीय वैशिष्ट्य असल्यामुळे मुख्यतः सामाजिक दृष्टिकोनातून त्यांच्या वाङ्मयाचे परिशीलन केले आहे', अशी लेखकाने आपली भूमिकाही व्यक्त केलेली आहे. समर्थांच्या सर्व प्रकारच्या वाङ्मयातून परमार्थाबरोबरच व्यक्त होणाऱ्या त्यांच्या सामाजिक मनाचे दर्शन ज्याला यथार्थतेने घडलेले आहे, त्याला प्रस्तुत लेखकाच्या या भूमिकेतील वास्तवाची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही. समर्थ हे केवळ भक्तिमार्गी संत होते आणि भक्तिमार्गालाच संघटित स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी सर्व विषयांचे निरूपण केले आहे, अशा संकुचित अर्थाने समर्थांच्या एकूण वाङ्मयातील आशयाचा अन्वयार्थ प्रा. न. र. फाटकांनी आपल्या प्रबंधात लावला असला असला तरी, प्रा. श्री. म. माटे, काकासाहेब कारखानीस, डॉ. पेंडसे इत्यादी विद्वानांना त्यांच्या सामाजिक मनातील प्रगल्भ आशय प्रकर्षाने जाणवला होता, यात संशय नाही. तथापि प्रस्तुत प्रबंधलेखकाने यापुढे जाऊन समर्थांच्या सामाजिक विचाराचे तात्त्विक दृष्टीने परिशीलन करून समाजनिष्ठा, समाजसंघटना व समाजपुनर्घटना यासबंधीच्या विचारातून त्यांचे सामाजिक चिंतन कसे प्रभावी रीतीने व्यक्त होते, त्याचे मार्मिक दर्शन 'समर्थांचे समाजचिंतन' या प्रकरणात घडविले आहे. वेदवाङ्मयातील सर्वसंग्राहक तेजस्वी जीवननिष्ठा, रामायणातील व्यक्तिधर्माधिष्ठित प्रजाहितनिष्ठा आणि महाभारतातील समाजधर्माधिष्ठित कर्तव्यनिष्ठा यांच्या एकात्मतेतून रामदासांच्या समाजनिष्ठेचे भरण-पोषण झाले, हे प्रस्तुत प्रबंध-लेखकाचे म्हणणे जितके वास्तव आहे तितकेच, रामदासांनी निवृत्तिवादाचे तत्त्वज्ञान वैयक्तिक व राष्ट्रीय प्रपचाची उपेक्षा, जीवनाच्या विविधतेकडे दुर्लक्ष करणारी एकागी जीवनपद्धती, ज्ञान, चातुर्य व्यवहार, बुद्धिनिष्ठा याचा अव्हेर करणारी भोळधाभाबड्या भक्तीची परंपरा; परलोकवाद, प्रारब्धवाद आणि सर्वांगीण निष्क्रियता या समाजजीवनाला मरगळ आणणाऱ्या परंपरा उखडून टाकल्या आणि स्वतंत्र प्रज्ञेच्या बळावर समाजाच्या पुनर्घटनेची तत्त्वे पुरस्कारिली, हेही लेखकाचे प्रतिपादन वास्तव आणि म्हणून रामदासाच्या समाजचिंतनाचे यथार्थ मूल्यमापन करणारे आहे, यात कोठलाही संदेह राहत नाही. समाजजीवनात परंपरेने आलेली ही मरगळ जावी आणि समाजाची पुनर्घटना व्हावी म्हणून समर्थांनी लोकसंग्रह, महंतसंघटना, धार्मिक उत्सव, समत्वदृष्टी, विवेक, नेतृत्व, प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय, प्रयत्नवाद,

बुद्धियोग, सामर्थ्ययोग इत्यादी तत्त्वांचा जो पुरस्कार केला त्याचे प्रस्तुत लेखकाने आधुनिक समाजशास्त्रीय दृष्टीला अनुसरून केलेले मूल्यमापन लक्षणीय आहे.

## समत्वदृष्टी

समर्थांच्या समत्वदृष्टीतील वास्तव काही अपवाद वगळता, फार थोड्या विद्वानाच्या ध्यानात आले, असे खेदाने म्हणावे लागते. जन्मसिद्ध चातुर्वर्ण्यव्यवस्था किंवा जातिव्यवस्था परमार्थसाधनेशी विसंगत आहे, असे इतर संतांप्रमाणे रामदासांनीही ठासून सांगितले आहे. तथापि जी गोष्ट समाजाच्या हाडीमासी खिळलेली आहे, तिच्या विरुद्ध जाणे त्या काळाच्या संदर्भात समर्थांसारख्या व्यवहारी बुद्धीला पटण्यासारखे नव्हते आणि म्हणून काही मोजक्या ठिकाणी जातिवाचक उल्लेख आलेले पाहून त्यांच्यावरच तेवढा प्रतिगामित्वाचा आरोप करण्यात काहीच अर्थ नाही. लोकसंग्रह हीच ज्यांच्या कार्याची प्रेरक शक्ती आहे तिच्यातील भेदाला समर्थ फार मोठे महत्त्व देतात, असे कोणाही साक्षेपी बुद्धीच्या अभ्यासकाला वाटणार नाही. उलट 'समाजातील आंतरिक दृढता ही केवळ समानतेच्या कल्पनेवर अधिष्ठित नसून ती समाजाने डोळ्यांसमोर ठेवलेल्या सामाजिक ध्येयांवर अवलंबून असते' असा समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी काढलेला बुद्धिनिष्ठ निष्कर्ष आधाराला घेऊन लेखकाने समर्थांच्या सामाजिक कार्याचे केलेले मूल्यमापन त्या कालखंडाच्या संदर्भात वास्तव आहे, असेच म्हणावे लागेल; परंतु याच प्रकरणात पुढे (पृ. ७८) लेखकाने चातुर्वर्ण्याचे केलेले समर्थन आजच्या काळाच्या संदर्भात अप्रस्तुत वाटल्याशिवाय राहत नाही. तथापि हा मुद्दा गौण मानून 'सतराव्या शतकातील समर्थांची सामाजिक कामगिरी विसाव्या शतकातील सुधारकाग्रणी म्हणविणाऱ्यांस लाजवील अशीच आहे' असे जे उद्गार काकासाहेब कारखानीसांनी काढले आहेत त्यातील मर्म तात्त्विक भूमिकेवरून सप्रमाण सिद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकाने 'समर्थांचे समाजचिंतन' या प्रकरणात केला आहे असेच म्हणावे लागेल.

## राजकीय कार्याची मीमांसा

समर्थांचा तत्कालीन राजकारणाशी संबंध कितपत होता हा वाद वस्तुतः न मिटणारा आहे. आज उपलब्ध होणाऱ्या निसटत्या पुराव्यांव्यतिरिक्त अन्य ऐतिहासिक बोलका पुरावा उपलब्ध होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. राजकीय पुरुषाच्या कार्याचे मूल्यमापन त्याच्या राजकीय कृतीवरून इतिहासाला करता येते; परंतु राजकीय उत्थानाच्या काळात त्या अनुषंगाने समाजात वैचारिक प्रबोधन करणाऱ्या विचारवंतांच्या कार्याचे मूल्यमापन करताना ते विचार व्यक्त करणारे त्यांचे वाङ्मय, हेच एकमेव साधन मानावे लागते. अन्यथा एकाच कालखंडातील अशा दोन विभूतींच्या साधनांची गल्लत होण्याचा संभव असतो. हे अवधान राखून प्रा. पुजारी यांनी 'समर्थांचे राज्यकारण' या प्रकरणात समर्थांच्या राजकीय कार्याचे मूल्यमापन केले आहे, ते करत असताना प्रा. न. र. फाटक यांच्या विधानांतील विसंगती, धरसोडपणा व अनाठायी आग्रहीपणा हे दोषही काहीसा आक्रमक पवित्रा घेऊन दाखविले आहेत. तसेच 'राजकारण' या शब्दाचा समर्थभक्तांनीही कसा चुकीचा अर्थ लावला हेही दाखविण्यास लेखक विसरलेला नाही. पुढे समर्थांच्या राजकारणविषयक विचारांचा तात्त्विक भूमिकेवरून अन्वयार्थ लावताना लेखक म्हणतो, 'समर्थांच्या वाङ्मयातील 'राजकारण', म्हणजे राज्यकारण किंवा राष्ट्रकारण असल्यामुळे त्यात मुख्यतः राष्ट्रजीवनाची, राष्ट्रघडणीची व राष्ट्रविकासाची तत्त्वे प्रकट झाली आहेत.' आणि त्यामुळेच लेखकाला समर्थांनी राजपुरुषाना केलेला राजनीतीचा उपदेश हे त्यांच्या राजकारणाचे सारसर्वस्व वाटत नाही, तर राष्ट्रीय पुनरुत्थान घडवणे हेच त्यांच्या राजकारणाचे प्राणतत्त्व आहे, असे वाटते. सबंध राजकीय इतिहासच सामाजिक इतिहासाचा म्हणजे माणसाच्या संपूर्ण जीवनेतिहासाचा एक भाग आहे अशी लेखकाने इतिहासासंबंधी व्यापक भूमिका घेतलेली आहे. या व्यापक भूमिकेवरून समर्थांच्या राजकारणाची मीमांसा करताना त्याने छत्रपतींच्या राजकारणाशी समर्थांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याचा खटाटोप न करता त्यांनी वैचारिकदृष्ट्या केलेल्या राष्ट्रीय उत्थानाची मीमांसा केलेली आहे, हे योग्यच झाले. या व्यापक भूमिकेवरून तत्कालीन महाराष्ट्राचा इतिहास लक्षात घेऊन लेखकाने असे स्पष्टपणे दाखवून दिले आहे की, शिवाजीमहाराजांचे कर्तृत्व, त्यांचा राज्यकारभार, त्यांचे नेतृत्व म्हणजे तत्कालीन महाराष्ट्राचा संपूर्ण इतिहास नव्हे. या ठिकाणी त्यास असे म्हणावयाचे आहे की, समर्थांनी केलेल्या राष्ट्रीय पुनरुत्थानाचा विचार केल्याशिवाय तत्कालीन महाराष्ट्राच्या इतिहासाचे सम्यक् दर्शन होणार नाही. कोणत्याही राष्ट्रीय क्रांतीपूर्वी राष्ट्रीय विचार आणि तत्त्वज्ञान या गोष्टी निर्माण होत असतात, हे सत्य नाकारता येत नाही. या दृष्टीने समर्थांनी केलेल्या कार्याची मीमांसा कै. प्रा. माटे यांनी यापूर्वीच केली असली तरी प्रस्तुत लेखकाने समर्थ-वाङ्मयातील सामाजिक आणि राजकीय विचारांची तात्त्विक भूमिकेवरून मीमांसा करून जे निष्कर्ष काढले आहेत ते विचारांना चालना देणारे आहेत. समर्थांनी राजकीय चळवळी केल्याचा भक्कम पुरावा ज्याप्रमाणे देता आला नाही, त्याप्रमाणेच शिवाजीमहाराजांनी किंवा त्यांच्या राज्ययंत्रणेतील कोणाही पुरुषाने वैचारिक आणि तात्त्विक भूमिकेवरून त्या काळात समर्थांइतके प्रबोधन केल्याचा पुरावा मिळत नाही. यावरून त्या कालखंडात शिवाजीमहाराजांचे राजकीय कार्य जितके मोलाचे होते तितकेच त्या राजकीय कार्याला पोषक ठरणारे समर्थांचे वैचारिकदृष्ट्या राष्ट्रीय पुनरुत्थानाचे कार्य मोलाचे होते. समर्थांच्या राजकीय कार्याची लेखकाने केलेली ही मीमांसा समर्थांच्या टीकाकारांना चोख उत्तर देणारी आहे तशी समर्थांच्या कार्याचे योग्य त्या दिशेने मूल्यमापन करणारी आहे.

समर्थांच्या समाजकारणाच्या आणि राजकारणाच्या संदर्भात प्रस्तुत लेखकाने ॲरिस्टॉटल, कन्फ्यूशस, मॅझिनी, अरविंद, लो. टिळक, महात्माजी, स्वा. सावरकर यांच्या विचारांची घेतलेली पार्श्वभूमी उद्बोधक ठरते. कारण या पाश्चिमात्य आणि पौरस्त्य तसेच नव्या आणि जुन्या विचारवंतांचे राजकीय वा सामाजिक विचार सूत्ररूपाने रामदासांच्या वाङ्मयात कसे आढळून येतात ते ठळकपणे दिसून येते. तसेच समर्थांना प्रतिगामी ठरविणाऱ्या काही विद्वानांना, त्याचे विचार तत्कालीन पाश्चात्य विचारवंतापेक्षाही कसे पुढे गेलेले होते हे दाखविण्याच्या दृष्टीने सातव्या प्रकरणाचे महत्त्व नाकारता येत नाही.

## सामर्थ्याची गीता

समाजजीवनातील सर्व शक्तींचा समतोल विकास घडवून आणण्यासाठी प्रेरणा देणारे त्यांचे वाड्मय ही प्रस्तुत लेखकाला 'सामर्थ्य गीता' वाटते. त्याच्या सामर्थ्ययोगात बलोपासनेबरोबरच शासनशक्ती, दंडनीती, संघटनाबल, क्षात्रतेज, ब्राह्मतेज, कुशल नेतृत्व इत्यादी अनेक पुरुषार्थी गुणांचा समावेश झालेला आहे. त्या काळात या सद्गुणांना सामाजिक संदर्भात सांस्कृतिक मूल्यांचे माहात्म्य प्राप्त करून देणारा हा संत लेखकाने 'सामर्थ्ययोगी' या औचित्यपूर्ण शब्दांत गौरविला आहे.

ग्रंथप्रचीती आणि गुरुप्रचीतीपेक्षाही आत्मप्रचीतीवर भर देणारे रामदास आत्मशक्ती हीच काव्याची मूलभूत प्रेरणा मानतात, असा सिद्धान्त मांडून पहिल्याच प्रकरणात लेखकाने समर्थांच्या काव्यविषयक सर्व कल्पनाचे स्पष्टीकरण केले आहे. दुसऱ्या प्रकरणात समर्थांच्या वाङ्मयनिर्मितीमागील इतर प्रेरणाचा धावता आढावा घेतला आहे. त्यात विवेकसिंधुकार मुकुंदराज, दासोपंत, एकनाथ, त्र्यंबकराज यांचा विचार झालेला नाही ही उणीव कोणालाही जाणवण्यासारखी आहे. समर्थ वाङ्मयातील नीती आणि धर्म, तत्त्वज्ञान आणि अध्यात्म ही प्रकरणेही समर्थांच्या धर्म, नीती आणि तत्त्वज्ञानविषयक कल्पना स्पष्ट करणारी आहेत. परब्रह्म, ईश्वर, जीव आणि जगत् याच्याकडे पाहण्याची समर्थांची दृष्टी पारंपरिक असली तरी त्यातही त्यांचे असे काही निराळेपण दिसतेच. ते ठळकपणे दाखविता आले असते तर बऱ्याच बाबतीत समर्थ इतर संताहून निराळे का वाटतात, याचे उत्तर कदाचित मिळाले असते. तथापि संशोधनापेक्षा तात्त्विक विवेचनावर प्रामुख्याने भर देणाऱ्या या ग्रंथाचे वैचारिक मूल्य, त्यातील आक्रमक आग्रहीपणा आणि मतभेद होऊ शकणाऱ्या काही जागा मान्य करूनही कधीच नाकारता येणार नाही. ◦

— प्रा. र. रा. गोसावी

**'सामर्थ्ययोगी'**
प्रा. प्रभाकर पुजारी,
कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, ३०,
पृ. २७६, मूल्य रु. २०.

# आमचं ग्रंथालय

## India A Wounded Civilization

By V. S. Naipaul
(Alfred knopf, Pages 191, price Rs. 5 approx. $ 7·95)

हे पुस्तक अजून तरी मुंबई किंवा पुणे येथील पुस्तकांच्या दुकानात दिसत नाही. मला ते अमेरिकेहून श्री. मोहन रानडे यानी पाठवले.

परदेशी लेखकांनी भारतावर लिहिलेल्या पुस्तकांच्या बाबतीत दोन प्रकार आहेत. एक म्हणजे नुसती टीकाच करणं व दुसरा म्हणजे फक्त प्रशंसा करण; परंतु या परदेशी लेखकाच्या भारताविषयीच्या लिखाणामध्ये संतुलनपणा फार कमी आढळतो.

अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणारे निराद चौधरी व नायपॉल हे वेगळयाच प्रकारात मोडतात. निराद चौधरी हे भारतीय आहेत; परतु त्यांच्या लिखाणात भारताविषयी द्वेष दिसून येतो. नायपॉल हे परदेशी आहेत, पण इंडियन ओरिजिनचे आहेत. नायपॉल हे तर Scatology (विष्ठेबद्दल विकृत दृष्टिकोन) ने पछाडले आहेत. भारतात आल्यावर त्यांना गोड शास्त्रीय संगीताची आठवण येत नाही. भारतीय शास्त्रीय संगीतासारखं अंतर्मुख करणारं व विश्वाशी एकरूप होण्याचं आव्हान करणारं संगीत इतर देशात कुठेच नाही. जुन्या भारतासारखी शिल्पकला अन्यत्र कोठेच आढळत नाही. आणि भारतीय नृत्य तर कमालीचं तालबद्ध, लयबद्ध व डौलदार आहे; पण या सर्वांकडे नायपॉल कानाडोळा करतात आणि त्यांना दिसते ती फक्त घाण !

असं वाटतं की, नायपॉल याची भारताशी love–hate relationship आहे. नायपॉल यांचा जन्म त्रिनिदाद येथे झाला व ते तिथेच राहतात. भारतापासून ते जास्त दिवस लाब राहू शकत नाहीत, आणि भारतावर चिखलफेक केल्याशिवाय त्यांना राहवत नाही. आतापर्यंत तीन वेळा ते भारतात आले आणि एकूण सोळा महिने त्यांनी भारतात वास्तव्य केले 'An Area of Darkness.' या त्यांच्या आधीच्या पुस्तकात सुद्धा त्यांनी भारतात कुत्री मानवाची विष्ठा कशी चाटतात, याचं वर्णन लिहिलेले आहे. या पुस्तकात तर भारताविषयी अशी वर्णनं भरपूर आढळतात. एकदा नायपॉल भारताला 'India is a great diarrhoea' असे म्हणाले होते ! रेल्वेच्या रुळाच्या बाजूची घाण तेवढी त्यांना दृष्टीस पडते. आता कोण म्हणेल की नायपॉल हा विष्ठेच्या विचाराने पछाडलेला नाही ? रशियाच्या किंवा अमेरिकेच्या मिलिटरी बेसच्या दोन्हीकडे आटोपशीर रचून ठेवलेली मानवाचा संहार करणारी अण्वस्त्रे त्यांना निश्चितच स्वच्छ दिसत असतील ! या दोन्ही प्रकारच्या घाणी स्वच्छ करण्याची आवश्यकता आहे. एवढा प्रख्यात लेखक, परंतु त्याला द्रष्टेपणा कसा नाही ? त्याच्या 'An Area of Darkness' ह्या पुस्तकावर भारत सरकारने बंदी घातलेली आहे. 'India–Wonuded Ciilzation.' या पुस्तकावर सुद्धा बंदी येण्याची शक्यता आहे. (मोरारजीभाई आहेत तोवर नाही ! )

खुशवंतसिंग यांनी सुद्धा या पुस्तकाची इतकी प्रशसा केली आहे की, ती वाचून वीट येतो. खुशवंतसिंग म्हणाले की,'या पुस्तकाला भारताबाहेर बंदी घालावयास हवी आणि प्रत्येक भारतीयाने ते सक्तीने वाचले पाहिजे !' आता याला काय म्हणावे ? पुस्तकाच्या शैलीबद्दल किंवा भाषेबद्दल कोठेच बोट ठेवता येणार नाही. श्री. नायपॉल यांना तर १९७७ चे साहित्यावद्दलचे नोबेल प्राईज् मिळावे कशी शिफारस स्वीडिश ॲकॅडमीला केली गेली होती.

भारताला स्वतत्र होऊन उणीपुरी ३० वर्षे झाली आहेत. ३० वर्षे हा काळ एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात मोठा आहे; पण एखाद्या देशाच्या इतिहासात एवढा काळ म्हणजे फार मोठा नाही. माणसाच्या आयुष्याचं रहाटगाडगं सारख फिरत असतं. आजचा राव उद्याचा रंक होतो. देशाचही असेच असते. भारताला आज काही प्रमाणात अवकळा आली असेलही., (तसं पाहिलं तर आज साऱ्या जगाला अवकळा आली आहे ) पण आणखीन काही वर्षांनी भारतासारखा

गरीब देश आघाडीवर व अमेरिकेसारखा बलाढ्य व श्रीमंत देश मागे राहू शकेल,

नायपॉल भारताला उद्देशून म्हणतात, 'The real crisis is neither political nor economic, but that of a decaying civilization whose only hope lies in further swift decay.' छान शब्द! सुरेख शब्द! पॉलिश्ड भाषा! नायपॉलसाहेब, तुम्ही मला सांगाल की, आज कोणत्या देशाला कीड लागली नाही? कोणत्या रामराज्यात भ्रष्टाचार नाही? गुन्हेगारी नाही? जगाच्या पाठीवर आज असा कोणता देश आहे की, ज्याची नीतिमूल्ये ढासळली नाहीत? जिथे ढोंगीपणा नाही, भोंदूपणा नाही? अरे, पण हो, नायपॉलसाहेबांना फक्त पोटातील घाण तेवढी दिसते, मनातली नाही. भारतातील घाणेरडे basic pollution त्यांना दिसते; पण लॉस एंजेलिसमधले कॅन्सर करणारे केमिकल पोल्युशन म्हणजे त्यांना प्रगतीचे द्योतक वाटत असावे!

भारतात व पाश्चात्य देशांत परीटघडीत, सुटा-बूटात वावरणारे, पाश्चात्य देशांच्या प्रगत विज्ञानाने भारावून जाणारे, ग्रॉस नॅशनल प्रॉडक्ट (GNP) च्या वृद्धिगतीने पछाडलेले पुष्कळ 'साहेब' आहेत. या साहेबांचा भारत म्हणजे एक 'favourite whipping boy' आहे; पण नायपॉलसाहेब, तुम्ही एक लेखक आहात. तुमचे नाव जगभर मशहूर आहे. लेखक म्हणजे विचार करणारा. अंतर्मुख होणारा. तुमच्यात एवढ्या सुद्धा संवेदना राहिल्या नाहीत का, की तुम्हाला भारतात काही एक चांगले दिसत नाही? नोबेल पारितोषिकामुळे मी भारावून जात नाही; परंतु एके काळी मला नोबेल पारितोषिकाविषयी आदर होता. यदाकदाचित जर तुम्हाला नोबेल प्राईझ मिळाले तर त्या पारितोषिकाबद्दल माझ्या मनातील उरलासुरला आदर सुद्धा नाहीसा होईल.

'ॲन एरिया ऑफ डार्कनेस'मध्ये मुंबई सेंट्रलविषयी श्री. नायपॉल म्हणतात, 'तो प्रचंड जनसागर बघून मी धसकाच घेतला. या जनसागरात मी इतक्या सहज रीतीने बुडून जाईन, की माझी नावनिशाणीही राहणार नाही अशी मला भीति वाटली! मी येथून परागंदा होणेच इष्ट!' न राहो तुमचे नावनिशाण! बहुतेक भारतात फक्त खुशवंतसिंगच तुमच्यासाठी अश्रू ढाळील!

भारतात टीका करावेसे भरपूर आहे; पण त्या टीकेला काही हाड आहे की नाही? टीका ही विधायक असावी—संहारक नाही. भारत घाण आहे, भारतीय पलायनवादी आहेत, भारतीयांचा 'अहं' फोफावलेला नाही. (Indians have underdeveloped egos) India is intellectually second-rate, ब्रिटिशांचे भारतावर राज्य सुरू झाले त्या वेळेलाच भारतीय चित्रकला व स्थापत्यशास्त्र दिवंगत झाले. भारतीय समाज हा 'क्रिएटिव्हिटी' व 'सायन्टिफाय इन्क्वायरी'ला पोषक नाही, कर्माच्या व वहीमाच्या शृंखलेने भारतीय समाज जखडला आहे, त्या सडत असलेल्या समाजाला जातीय वादाची भगदाडे पडली आहेत, आठव्या ते विसाव्या शतकापर्यंत लुटला गेलेला, ज्याची संस्कृती रक्तबबाळ झाली आहे असा हा भारत आहे, असे नायपॉल सांगतात. थोडक्यात, हे पुस्तक म्हणजे भारत व भारतीयांच्या दोषाची एक यादीच आहे.

वाळीत टाकलेला व नाकारलेला हा वाळीत टाकणाऱ्या व नाकारणाऱ्याइतकाच दु:खी होतो, असे मी मार्गारेट मीड या प्रसिद्ध मनुष्यशास्त्रवेत्त्याच्या (Anthropologist) आत्मचरित्रात वाचले होते. बहुतेक या पुस्तकाचे नाव 'Winter Mulberry' किंवा असेच काही तरी होते. नायपॉलइतकी संहारक टीका म्हणजे त्याच्या दृष्टीने वाळीत टाकणेच होय. तेही तसे 'रूटलेस'च आहेत! वेस्ट इंडीजमधील विद्याधर सूरजप्रसाद नायपॉल हे एक कॅरॉबिअन साहित्यिक आहेत. कॅरिबिअन साहित्यिकांत त्यांचा नंबर पहिला आहे. वेस्ट इंडीजबद्दल नायपॉल स्वत: असे म्हणाले होते, 'History is built around achievement and creation and nothing was created in the West Indies!' (except of course, V. S. Naipaul!)

वेस्ट इंडीजची संस्कृती धड इंग्लिशही नाही व धड आफ्रिकनही नाही. त्यामुळे ही संस्कृती, हे साहित्य, हे व्यक्तिमत्त्व, सतत आपला ठाव घेण्यासाठी धडपडत असते. ह्या धडपडण्यात, या ठाव घेण्यातच नायपॉल रमले असते तर बरे झाले असते. जो साहित्यिक स्वत:च्या संस्कृतीचा, स्वत:च्या साहित्याचा ठाव घेऊ शकला नाही, वेध घेऊ शकला नाही, तो काय भारतासारख्या प्रचंड देशाचा, त्याच्या विविध रंगांचा, त्या छटांचा, त्या पैलूंचा वेध घेणार? स्वत:च मूळ नसलेला, तो काय खोलवर मूळ गेलेल्या देशाचा आढावा घेणार?

४४ वर्षांच्या श्री. यू. आर्. अनंतमूर्तींची 'संस्कार' ही कादंबरी श्री. नायपॉल यांना फार आवडली, असे ते या पुस्तकात लिहितात. या पुस्तकात भारतीयांचे व्यक्तिमत्त्व आपल्याला गवसते, असा नायपॉलचा दावा आहे. या पुस्तकात एक ब्राह्मण स्वत:चे व्यक्तिमत्त्व गमावून बसतो. हे पुस्तक मुळात कानडीत लिहिले गेले आहे. 'संस्कार'मध्ये भारताचे वस्तुनिष्ठ वर्णन केले आहे आणि अल्ल्या भारतात ते लोकप्रिय झाले आहे 'इलस्ट्रेटेड विकली'ला नायपॉल सर्वांत चांगले नियतकालिक म्हणतात! (गेल्य वर्षापासून मी हे नियतकालिक वाचावयाचेच बंद केले आहे.) विकलीच्या १९७६ च्या पहिल्या तीन महिन्यात श्री. अनंतमूर्तींच्या 'संस्कार'चे इंग्रजी भाषांतर एक कवी श्री. ए. के. रामानुजननी केले होते. 'वीकली'ला सर्वोत्तम नियतकालिक म्हटले म्हणून तर श्री. खुशवंतसिंग यांना नायपॉल एवढे आवडत असतील का?

भारताविषयी चर्चा करून, मऊ मऊ सोफ्यावर बसून, हातात बिअर किंवा व्हिस्कीच्या बाटल्या घेऊन, '5 star' हॉटेलमध्ये राहून का भारत समजायचा आहे? कदाचित एक संवेदनाशील अनामिक नि:स्वार्थी समाजसेवक, जो खेड्यापाड्यात बैलगाडीत खडबडीत रस्त्यावर हिंडला आहे, झोपडीत ज्यानी निवारा घेतला आहे, त्याला नायपॉलपेक्षा भारत जास्त समजला असेल!

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी

काज पूर्ण करणे सर्वथैव अशक्य आहे. हे कामकाज दीर्घकाळपर्यंत लांबावे हीच बाईंची इच्छा असली तरी ती पूर्ण होणे शक्य नाही.

आयोगासमोर येणाऱ्या अन्य मंडळीमध्ये दोन गट पडणे स्वाभाविक आहे. बाईंचा पाठपुरावा करणारी मंडळी बाईंच्या पावलावर पाऊल ठेवणार. प्रणवकुमार मुखर्जी हे नेमके त्याच वाटेने गेले आहेत. विद्याचरण शुक्ला काही फारसे वेगळे करतील असे दिसत नाही. या असहकाराचा आयोगावर काही परिणाम होणार नाही. जमलेला पुरावा इतका बक्कळ आहे की, काही मंडळीच्या या आडमुठ्या धोरणामुळे आयोगाचे काम अवघड व्हावे अशी अजिबात परिस्थिती नाही. या चामडीबचाऊ धोरणामुळे काही राजकीय फायदे मिळणार आहेत असेही नाही. उलट या आकांडतांडवामागील भ्याडपणा जनतेच्या लक्षात आल्यावाचून राहणार नाही.

आयोगाच्या कामकाजाबाबत बाईंनी जी लाइन पकडली आहे ती त्यांच्या आगामी आक्रमक धोरणाची दिशा स्पष्ट करणारी आहे. हे आक्रमक धोरण म्हणजे काय तर प्रस्थापित सरकारविरुद्ध चौफेर आगडोंब उसळविणे. या आगडोंबातून भडकणाऱ्या ज्वाळा प्रखर आणि भाजऱ्या ठरतात का निस्तेज होतात याची कसोटी आगामी विधानसभा निवडणुकामध्ये लागणार आहे बाईंचा गट निवडणुका लढवतोच आहे. त्याला कसे आणि कितपत यश मिळते यावर त्यांचे राजकारण आणि त्यांच्या पाठिराख्यांचे भावी धोरण ठरणार आहे. □

## □ संप तापत चालला

वाटाघाटीचे दरवाजे दादांनी बंद करून घेतले असल्यामुळे एक महिन्याहून जास्त काळ चाललेल्या या संपाची कोंडी फुटणार तरी कशी याची काळजी वाटत असतानाच आता निवडणुका घोषित झाल्याने आणि नोकरभरतीची घोषणा दादांनी केल्याने संपआघाडी तापली आहे. एकजुटीने लढविल्या जात असलेल्या या संपाला जनतेची अपेक्षित सहानुभूती मिळत नसल्याने आणि सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी संपविरोधी भूमिका स्वीकारल्याने वातावरण कडवट झाले आहे. 'माणूस'चे संपादकीय संपवाल्यांना दिलासा देणारे आणि दादांच्या ताठर भूमिकेमागील कण्याला छेद देणारे होते. एक गोष्ट नक्की की, या संपाचे कितीही कोडकौतुक केले तरी जनतेची संपवाल्यांबाबत नाराजी आहे आणि शासन या संपाच्या निमित्ताने स्वतःची प्रतिमा तेजाळून निघाली तर बरे अशा भूमिकेतून संपाकडे पाहत आहे. केंद्र-शासनाबद्दल काही म्हणता येणार नाही; परंतु पंतप्रधान मोरारजीभाई दादांच्या धोरणाचा पाठपुरावा करीत आहेत. अगदी संक्रांतीच्या मुहूर्तावर मुंबईकरांकडून नागरी सत्कार स्वीकारताना त्यांनी संपवाल्यांना दुराग्रह आणि सत्याग्रह यातील फरक समजावून सांगून प्रथम तातडीने कामावर रुजू होण्याचा सल्ला दिला. मोरारजीभाईंची भूमिका केंद्रीय मंत्रिमंडळामधील त्यांच्या सहकाऱ्यांना मान्य नाही असे दिसते. कारण मोरारजीभाई शिवाजीपार्कवर संपाबाबत जे बोलत होते नेमके त्याच्या विरोधी भाषण जॉर्ज फर्नांडिस सोलापूर येथे करीत होते. संपवाल्यांनी आपल्या एकजुटीच्या सामर्थ्याचे दर्शन घडविलेच आहे. त्यात आता २४ जानेवारी महाराष्ट्र बंदची आरोळी निनादत आहे, तर इकडे शासनाने नोकरभरतीची धमकी दिली आहे; नव्हे हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत काही नवीन मंडळी कामावर आलेलीही असतील. ही नवीन मंडळी मोठी काम करणारी असतात असातला भाग नव्हे; परंतु संपावरील मंडळीवर दबाव आणणे हाच त्याचा उद्देश असतो. थोडक्यात म्हणजे शांततापूर्ण सामर्थ्यदर्शनाची पहिली फेरी बरोबरीत सुटली असून आता शक्तिप्रदर्शनाला जिथे वाव आहे अशा दुसऱ्या फेरीला प्रारंभ होत आहे. हे शक्तीचे प्रदर्शन अर्थातच दोन्ही बाजूनी असेल. कोणत्याही संपाची पहिली फेरी ही सदी शांततापूर्णच असते. आता बलप्रदर्शनाला प्रारंभ झाला तर संप तापतो, कडवटपणा वाढतो आणि दोन्ही बाजूचा तोल सुटण्याची शक्यता असते. संपनेते ज्याला स्वयंभू गती असल्याचा दावा करतात त्या स्वयंभू गतीला अडथळा आणण्याला आता प्रारंभ होणार आहे. संप अवाजवी ताणला जात असल्याने निवडणुकांच्या वेळी जे वातावरण हवे ते मिळू शकणार नाही; पण संपवाल्यांनीही परंपरागत पद्धतीने निवडणुका तोडाशी आल्या असताना संपाचे घोडे पुढे दामटले आहे. दादांच्या बाबतीत त्यांचा होरा चुकला आहे. दादांनी मतपेटीचे दडपण न मानता संपविरोधी भूमिका घेतली आहे. कारण त्यांनी संपविरोधी भूमिका नेटाने तडीस नेली तर त्याचे त्यांना राजकीय भांडवल करता येणार आहे. वास्तविक या राज्यपातळीवरील संपाचा अलग विचार न करता वेतनाबाबत राष्ट्रीय धोरण ठरविले जाणे अगत्याचे आहे. महाराष्ट्र शासनापेक्षा ज्यांची आर्थिक ताकद कमी आहे अशा राज्यांना जर केंद्रीय दराने महागाईभत्ता देणे परवडते, तर महाराष्ट्राला ते का परवडू नये ? या प्रश्नाला उत्तर नाही.

संपवाल्यांबाबत महामंत्र्यांनी एक बोलणे आणि केंद्रीय मंत्र्यांनी दुसरे विचार व्यक्त करणे हेही बरोबर नाही. लोकशाहीचा असा विक्षिप्त अर्थ कोणालाच अभिप्रेत नाही; परंतु आज जॉर्ज, दंडवते एक बोलतात, तर ही मंडळी ज्याच्या सरकारात मंत्री आहेत ते मोरारजीभाई दुसरेच बोलतात असे विक्षिप्त चित्र पहावयास मिळते. महाराष्ट्र राज्य कर्मचाऱ्यांना सध्या विरोधात असलेला पक्ष आपला पाठपुरावा करील असे वाटले होते; परंतु जनता पक्षाच्या एकाही प्रभावी नेत्याने संपवाल्यांच्या मागण्यांचा झरझरून पाठपुरावा केलेला नाही, संपवाल्यांची ताकद कितीही असली तरी पगाराच्या तारखा टळून गेल्यावर त्याचा तणाव जाणवल्याखेरीज राहाणार नाही. संप मोडून काढला अशी जनतेची भावना होऊ देणे संपवाल्यांना हितावह ठरणारे नाही. कामावर जाऊन वाटाघाटी चालू ठेवल्या तर अपेक्षित उद्दिष्टाच्या दृष्टीने वाटचाल करता येईल. 'महाराष्ट्रामध्ये कधीही नव्हत्या एवढ्या चुरशीच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. निदान निवडणुकांसाठी तरी 'परत या' असे जे आवाहन राज्याच्या मुख्य

मंत्र्यांनी केले आहे ते पकडून संपवाले माघारी आले तर जनतेमध्ये त्याची अनुकूल प्रतिक्रिया उमटल्याखेरीज राहाणार नाही. याउलट संपवाल्यांना दाद न देता आम्ही निवडणुकाही घेऊ शकतो असे जर सिद्ध करता आले तर ते संपवाल्यांच्या दृष्टीने हितावह ठरणार नाही. संप काही रोज रोज करता येत नाही, हे जसे खरे तसे एकाच लढयात खरे काही मिळविता येत नाही हेही तितकेच खरे. संपाचे हुकमी हत्यार धार जाईपर्यन्त न वापरता दबाव रहावा अशा पद्धतीने वापरता येणे शक्य आहे. दोन्ही बाजूनी सोडण्यात येणारे आकडेवारीचे फुगे सर्वसाधारण लोकांना कळत नाहीत. त्यांना फक्त त्यांची गैरसोय दिसते. सरकारी कर्मचाऱ्याच्या कार्यक्षमतेबद्दल तर त्यांचा हिरीरीने पाठपुरावा करणारेही दावा करू शकत नाहीत असा सरकारी कामाचा खाक्या असतो. या गजगती कामाची चुणूक कित्येक वेळा सरकारी कर्मचाऱ्यांनीही घेतलेली असते; पण गमतीचा भाग असा की, वेतनाच्या बाबतीत पोटतिडिकेने बोलणारी मडळीही कार्यक्षमतेबद्दल ढम अक्षर काढीत नाहीत. संप सुरू करण्याची वेळ जशी संपवाल्यांनी पकडली तशी तो मागे घेण्याची वेळही पकडणे अगत्याचे आहे आणि ते होणे नसेल तर या खदखदत्या प्रकरणाच्या ज्वाला भडकल्याखेरीज राहाणार नाहीत ! ◻

# ◻ काल–परवाचे सितारे

वर्षानुवर्षे ज्यांनी सत्ता उपभोगली अथवा सत्तेवर असलेल्यांचा वरदहस्त लाभल्याने ज्यानी मनमानी केली, आणीबाणीच्या काळात जे प्रखर तेजस्वी तारे होते ते हे काल–परवाचे सितारे निवडणुकीतील उत्पातानंतर काय करीत होते ? सत्ताभ्रष्ट झाल्यावर त्यांनी सरलेल्या सत्याहत्तर सालचे उरलेले दिवस कसे घालविले ? 'इंडिया टू–डे' या पाक्षिकाने या संदर्भात काही निवडक व्यक्तीबाबत तपशील पुरविला आहे. त्यामधील दोन–चार मंडळीची दखल घेणे अगत्याचे वाटते.

### देवकान्त बारुआ

काँग्रेस अध्यक्षीय खुर्ची कलंकित करणारे देवकान्त बारुआच पहा ना ! 'इंदिरा इज इंडिया' या विक्षिप्त घोषणेमुळे गाजलेले बारुआ यांना इंदिरा आणि इंडिया याच्यामधला फरक आता समजून आला आहे. काँग्रेस अध्यक्षपदावरून हकालपट्टी झाल्यापासून बारुआ फारसे प्रकाशझोतामध्ये नाहीच आहेत. त्यांचे चिटणीस सांगतात, बारुआ आता फारसे कोणाला भेटत नाहीत. त्याची सध्या विश्रांती चालू आहे. शहा कमिशनसमोर साक्ष देताना दिल्लीच्या एक माजी खासदार सुभद्रा जोशी यांनी असे सागितले की, तुर्कमन गेटप्रकरणी ससद सदस्यत्वाचा राजीनामा देण्याचा प्रस्ताव त्यांनी ज्या वेळी बारुआजीसमोर ठेवला त्या वेळी पंजाबी असल्यामुळे तुम्हाला डोक्याचा भाग नाहीच आहे असे दिसते असे ते म्हणाले. तर असे हे बारुआ–रेड्डी–चव्हाण फौजेंमध्ये मानकऱ्यांच्या रांगेत शेवटी कुठे तरी उभे असलेले दिसतात !

### विद्याचरण शुक्ला

माहिती आणि नभोवाणी खाते संभाळणारे विद्याचरणजी मंत्रीपद गेले आणि खासदारकी नसली तरी दिल्लीच्या परिसरात घुटमळतात. सत्त्याहत्तर सालामधील पराभूत कालखंड त्यांनी घरी बसून घालविला असला तरी इंदिराजीवरील त्यांची श्रद्धा अढळ आहे. त्यांनी बोलाविलेल्या मेळाव्याला जे नाव घेण्यासारखे चार–दोन सहकारी हजर होते, त्यापैकीच एक म्हणजे शुक्लाजी. आबेराय इंटर काँन्टिनेन्टलजवळील सुदर नगरमध्ये त्यांचे वास्तव्य असते. मंत्रिपद गेलें असल्याने सत्तेभोवती झुलणारा ताफा त्यांच्याभोवती नाही; पण शुक्लाजीच्या शाही राहाणीमध्ये काही घट नाही. आणीबाणीच्या काळात माहिती आणि नभोवाणी खात्याने जे प्रताप गाजविले त्याची जबाबदारी स्वीकारणारा खानदानी मंत्री आपला खानदानी रुबाब अजूनही जमवून आहे. शुक्लाजी केस कापून घेण्यासाठी ऑबेराय इंटर कॉन्टिनेटलमध्ये जातात. आणीबाणीयर सगळेच पुस्तके लिहितात मग शुक्लाजीनी तरी मागे का हटावे ? सध्या पुस्तक लिहिण्यात असलेले शुक्लाजी आपण होऊन फारशा कोणाच्या गाठीभेटी घेत नाहीत आणि पत्रकारांपासून तर चार पावले दूरच रहातात. शहा आयोगाबाबत इंदिराजीनी जी लाइन पकडली आहे त्याला साजेसा सूर त्यानी लावला आहे..

### संजय गांधी

आणीबाणीमध्ये कान किटेपर्यंत ज्यांच्या नावाचे नगारे वाजविले गेले, ते इंदिराजीचे हे चिरजीव ! गेल्या वर्षीच्या मार्चपासून प्रथमच रखरखीत उन्हाळा अनुभवीत आहेत. ३१ वर्षांचे असलेले संजय आज एक अति बदनाम व्यक्ती म्हणून ओळखले जात असले तरी, परिस्थितीमध्ये जो बदल झाला आहे तो त्यांच्या फारसा ध्यानी आला आहे असे वाटत नाही. त्यांचा उद्धटपणा पहिल्या इतकाच तिखट आहे आणि सार्वजनिक सकेताच्या बाबतीतही पहिलेच धोरण अजूनही कायम आहे. भारतीय मोटारउद्योगधंद्यामध्ये क्रांती करू पाहाणाऱ्या या बाळाचा क्रांतीनेच बळी घेतला ! सर्व राजकीय महत्त्वाकांक्षांची धूळधाण झाली असली तरी संजय हार मानण्यास तयार नाहीत. १२ विलिंग्डन क्रिसेन्टमधील त्यांच्या माताजीच्या हालचाली ठरविण्यात अजूनही त्यांचा आणि त्यांच्या प्रसिद्ध चांडाळचौकडीचा मोठाच हात आहे. त्यांच्या विरुद्ध संतापाची जी प्रखर लाट उमटली आहे त्याचे कारण झालेल्या चुकांबद्दल त्याने चुकूनही पश्चात्तापाचा अथवा क्षमेचा शब्द काढलेला नाही. इंदिराजी ओझरता का होईना परंतु आणीबाणीमधील चुकांचा उल्लेख करतात; परंतु हे चिरंजीव त्याबाबत 'ब्र' काढीत नाहीत ! आपण राजकारणातून निवृत्त झाल्याची घोषणा त्यांनी स्वतःच्या निवडणूकपराभवानतर केली आहे; पण त्यांची घोषणा आणि कृती यांचा मेळ बसत नाही. काँग्रेस अतर्गत सत्ता काबीज करण्यासाठी इंदिराजींनी केलेल्या राजकीय हालचाली असोत अथवा शहा आयोगासमोरील त्यांच्या साक्षीचा प्रश्न असो, पडद्यामागे संजय गांधी आहेतच ! मारुती लि. वाचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु मारुती साम्राज्य टिकून राहणे एकंदर कठीणच दिसते. गुप्ता आयोगासमोर त्यांना आपला नेमका व्यवसाय काय, हे कधीच

सांगता आले नाही. सत्तांतर झाल्यानंतर संजयबाबूंचा सारा वेळ आईच्या राजकारणात आणि विविध आयोगाबाबतच्या कामातच खर्ची पडला. सत्ता गेली, विकत घेतलेल्या लोकप्रियतेची सूज सत्ता जाताच ओसरून गेली आणि अति प्रतिकूल परिस्थिती समोर येऊन उभी राहिली. इच्छा असो वा नसो कोर्टकचेऱ्या व राजकारण यातून त्यांची सुटका होणे कठीणच दिसते. एक गोष्ट नक्की की, त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यामधील आणीबाणीचे ते सुवर्णपर्व परत कधी वाटयाला येणे शक्य नाही.

### बन्सीलाल

संजय गांधी यांची आठवण झाल्याबरोबर जी आणखी एक-दोन नावे डोळ्यासमोर येतात त्यापैकी पहिले नाव माजी संरक्षणमंत्री बन्सीलाल यांचे आणि त्यापाठोपाठ आठवण येते ती युवक काँग्रेसचे नेतृत्व करणाऱ्या खासदार अंबिका सोनी यांची. बाईंची खासदारकी राज्यसभेची असल्याने ती आणखी टिकून आहे. बन्सीलाल चौकशी आयोगाच्या चक्रात गुरफटून गेले आहेत. बन्सीलाल हे मंत्रिमंडळापैकी सर्वांत जास्त बदनाम झालेले मंत्री ! सत्ता गेल्यावर काँग्रेस-पक्षाने त्याची तत्परतेने हकालपट्टी केली तरी हे आपले बाईंच्या मागेमागे आहेतच ! पक्षातून हकालपट्टी झालेले बन्सीलाल आयोगाच्या कचाटयातून सुटण्यासाठी आटापिटा करीत आहेत. त्यांच्या आगाऊपणाच्या वर्तणुकीमुळे त्यांना बेडया ठोकाव्या लागल्या आणि त्यांची छबी पुन्हा एकदा वर्तमानपत्रामध्ये चमकून उठली. बन्सीलालजीच्या घरी काम करणाऱ्या मंडळींना आपल्या साहेबाच्या आजच्या अवस्थेची फारशी कल्पना नाही. कारण त्यांना भेटण्यासबंधी कोणी फोन वगैरे केला तर फोनवर सांगितले जाते 'मिनिस्टरसाब हरयाना में है !' आणि दिल्लीमधील कायदेशीर कामे सोडली तर बन्सीलाल खरोखरच हरयानामध्ये असतात. भिवनीमध्ये विश्रांती घ्यायची आणि दिल्लीमध्ये कज्जेदलाली करायची असा सध्या त्यांचा खाक्या आहे. चिरंजीव सुरिंदरसिंग-आमदार आहेत हीच त्यातल्या त्यात दिलासा देणारी गोष्ट.

### अंबिका सोनी.

युवक काँग्रेसच्या माजी अध्यक्षा अंबिकाजी म्हणतात, गेले वर्ष फारच तापदायक गेले. १९८० सालापर्यंत खासदारकी टिकणार असली तरी त्यांची पहिली शान पार गेली आहे. त्यांच्याबद्दल जो मजकूर प्रसिद्ध झाला त्यामुळे आपले खाजगी आयुष्यही अति तापदायक ठरले असे त्या म्हणतात. वर्षभरात आपण पुष्कळ काही शिकलो. राजकारणी मंडळी लोकांना मूर्ख बनविण्याचा खेळ खेळत असतात अशी आपली खात्री पटली आहे. गेली दोन वर्षे मी हा खेळ पाहिला आहे आणि या खेळात राहावे असे आता वाटत नाही. बाईंचे पतिराज उदय सोनी मोरक्को येथे भारतीय राजदूत आहेत. कधी दिल्लीत तर कधी मोरक्कोला असे दीर्घकाळ करता येणार नाही. कदाचित खासदारकीचा राजीनामा देऊन मी मोरक्कोला निघूनही जाईन; पण खरे सांगायचे तर निश्चित काही नाही ! मात्र मोरक्को आणि दिल्ली यांच्यामधील वाऱ्या करीत लोकांचे प्रतिनिधित्व दीर्घकाळ करता येणार नाही हे मी ओळखून आहे. काँग्रेसचा निवडणुकांमध्ये पराभव झाला खरा; परंतु तरीही जनता-शासनाकडून लोकांची जी निराशा झाली त्याचा फायदा काँग्रेसला उठविता आला नाही. कारण अंतर्गत भांडणातच सारी शक्ती खर्ची पडली. या अंबिकाबाईंचे एक ठीक आहे, हौसेचे राजकारण आहे. नाहीच जमले तर कडवट आठवणी बरोबर घेऊन रामराम ठोकता येईल आणि मोरक्को येथे जाऊन राजदूताची पत्नी म्हणून मिरवता येईल; पण बन्सीलाल, बारुआ, शुक्ला, संजय यांची मात्र गोची झालेली दिसते ! □



लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर
श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा............



# । मॅक्झिम गॉर्की ।

## । सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

मुक्काम : पुणे

# आता पुण्यातही 'छबिलदास'

पुण्यातल्या थिएटर अॅकॅडमी या नाटय-संस्थेने नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच नाटयक्षेत्रातील चळवळीच्या दिशेने एक नवं पाऊल टाकलं आहे. पुण्याच्या सर परशुराम-भाऊ महाविद्यालयाच्या स्टुडंटस् हॉलमध्ये या संस्थेने एक सांस्कृतिक केंद्र सुरू केलं आहे.

पुण्यामध्ये मराठी नाटकाकरता एकूण तीनच थिएटर्स आहेत. शिवाय या थिएटर्सचं भाडंही हौशी, प्रयोगशील नाटयसंस्थाना परवडणारं नसतं. विशेषत: सांगली, सातारा, वाई, इचलकरंजी अशा पुण्याच्या आस-पासच्या भागांमध्ये नाटयक्षेत्रात धडपडणाऱ्या हौशी नाटयसंस्थाना पुण्याला येऊन त्यांच्या नाटकांचे प्रयोग करणं निरनिराळ्या आर्थिक अडचणीमुळे अशक्यच असतं. आता थिएटर अॅकॅडमीचं हे सांस्कृतिक केंद्र त्यांना हा वाव देऊ शकेल.

या केंद्रामागची योजना अशी आहे की, कोणत्याही हौशी आणि प्रयोगशील नाटय-संस्थेला फक्त दीडशे रुपये भाडं देऊन त्यांचे प्रयोग करता येतील. या दीडशे रुपयांमधूनच त्याना प्रयोगासाठी आवश्यक ते लाइटस् आणि डीमर्स थिएटर अॅकॅडमीतर्फे पुरवले जातील. तसंच प्रयोगाच्या जाहिरातीची आणि तिकीट-विक्रीची व्यवस्थाही याच भाड्यामधून थिएटर अॅकॅडमीच करील.यामुळे या बाहेरगावच्या नवीन संस्थांना पुण्यामध्ये प्रयोग करताना पुन्हा कराव्या लागणाऱ्या-अनेक तांत्रिक बाबी तर कराव्या लागणार नाहीतच, शिवाय भाड्यापोटी दीडशे रुपये वजा जाता जो काही फायदा प्रयोगाच्या प्रवेशपत्रिकांच्या विक्रीतून होईल तोही या संस्थांना मिळेल. या प्रवेशपत्रिकांच्या दरां-बाबतही असं एक धोरण थिएटर अॅकॅडमीने ठेवलं आहे की, जर बाहेरगावच्या नाटय-संस्थेचा प्रयोग असेल तर हा दर चार रुपये ठेवला जाईल आणि जर पुण्यातल्याच कोणत्या तरी नाटयसंस्थेचा प्रयोग असेल (यात स्वत: थिएटर अॅकॅडमीही समाविष्ट आहेच.) तर हा दर तीन रुपये असेल.

नाटयप्रयोगाव्यतिरिक्त नाटयक्षेत्राचा अभ्यास, त्यामध्ये होणाऱ्या नवनवीन प्रयोगांवर चर्चाही या केंद्रातर्फे आयोजित केल्या जातील. याशिवाय काही निवडक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना इथे होणाऱ्या कार्यक्रमांना खास सभासदत्व देऊन रंगभूमी-विषयी अभ्यासात्मक दृष्टिकोन त्यांच्यामध्ये निर्माण करणं, अशीही एक या संस्थेची भावी योजना आहे.

अर्थात नाटकांव्यतिरिक्त गायन, नृत्य, चित्रपट यांचेही प्रयोग आणि चर्चा या केंद्रामध्ये घडवून आणल्या जातील.

स. प. महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवानिमित्त महाविद्यालयाने त्यांचा स्टुडंट्स हॉल कोणतंही भाडं न घेता दिलेला आहे आणि त्याबद्दल थिएटर अॅकॅडमीतर्फे काही देणगी हीरक महोत्सव निधीला देण्यात येणार आहे. अर्थात नाटयप्रयोगाच्या दृष्टीने हॉलची जी थोडी-फार दुरुस्ती करावी लागेल ती मात्र हळूहळू थिएटर अॅकॅडमीतर्फेच केली जाणार आहे.

या केंद्राची सुरुवातही अत्यंत औचित्यपूर्ण झाली. दि. ८ जानेवारी रोजी मुंबईच्या उदय कला केंद्र या हौशी नाटयसंस्थेने 'काय वाट्टेल ते' हा दोन अंकी प्रयोग त्यानिमित्त सादर केला. सगीतप्रधान नाटकांचं विडंबन हा प्रयोगाचा मुख्य विषय होता; पण त्याच-बरोबर निवडणुका आणि राजकारण यांचीही बऱ्यापैकी टर उडविण्यात आली होती. श्री. जया दडकर यांनी हे नाटक लिहिल आहे. त्यातील काही भाग चांगला होता; पण नाटक उगीचच ताणल्यासारखं वाटलं. हेंच नाटक एका अंकात संपविता आलं असतं आणि ते अधिक प्रभावी झालं असतं. दोन अंकांमुळे अनेक ठिकाणी विनोदी प्रसंग आणि हालचाली यांची त्रासदायक पुनरावृत्ती झाली होती. उदाहरणार्थ, नाटयगीत गाण्यासाठी मुख्य पात्राने 'प्ले बॅक' घेण आणि त्या वेळी नाटयगीतातील आलापी-नुसार ओठ हालवण्यासाठी त्याची उडणारी त्रेधा-तिरपीट. तसंच स्टेजवरच्या 'मॉब सीन' मधील पात्रांच्या हालचाली या अतिशय ठरीव साच्याच्या, (प्रायोगिक म्हणवून घेणाऱ्या प्रत्येक नाटकात असतात तशा) होत्या. एखाद्या पात्राने प्रेक्षकांमधून डरकाळी फोडत स्टेजवर धावत येणंसुद्धा इथेही होतंच.

ही संगीतिका होती; पण या संगीतावर 'घाशीराम' आणि 'महानिर्वाण'चा जबरदस्त पगडा होता. कित्येक चाली तर अगदी जशाच्या तशा उचलल्या होत्या. काम करणाऱ्या पात्रांपैकी विशेष उल्लेख करावासा वाटतो तो, श्री. विजय कारेकर यांचा. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेला पुढारी त्यानी फारच मिष्कीलपणे उभा केला.

तेव्हा अशा तऱ्हेने हे एक सांस्कृतिक केंद्र पुण्यात मूळ धरतंय्. प्रायोगिक रंगभूमीच्या दृष्टीने हे फार महत्त्वाचं ठरणार आहे. अर्थात त्याचं यशापयश इतर प्रायोगिक नाटकसंस्था आणि रसिक प्रेक्षक यांच्या प्रतिसादावरच अवलंबून राहणार आहे; परंतु, 'किमान, नाटकाविषयीचे गैरसमज दूर झाले तरी या केंद्राच उद्दिष्ट बरंच सफल झालं, असं म्हणता येईल' असं थिएटर अॅकॅडमीचे निर्मितीप्रमुख श्री. श्रीधर राजगुरू यांनी या संदर्भात बोलताना म्हटलं आणि त्याच दृष्टीने ते प्रयत्न करणार आहेत.

**—सतीश कामत**

मुक्काम : मुंबई

# 'गीतगंगा'

## एक रसीला कार्यक्रम

रविवार दि. ८ जानेवारी, स्थळ शिवाजी मंदिर, मुंबई. वेळ सकाळी दहा. चेंबूर महिला समाजानं आयोजित केलेला आणि सुप्रसिद्ध संगीतकार अनिल–अरुण यांनी सादर केलेला 'गीतगंगा' हा हिन्दी–मराठी सुगम संगीताचा कार्यक्रम मोठ्या दिमाखात पार पडला.

चेंबूर महिला समाजाच्या आजवरच्या परपरेला अनुसरून एखादा सामान्य ऑर्केस्ट्रा वगैरे आयोजित करण्याच्या भानगडीत न पडता सामान्यतः मध्यमवर्गीय समाजाला (रसिकाला) पसंत पडणाऱ्या सुगम संगीताचा बहारदार कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा व कार्यक्रमाच्या संयोजिका सौ. कुसुम पाध्ये ह्याना प्रथम धन्यवाद देणं आवश्यक आहे.

अनिल–अरुण ह्या संगीतकार जोडीनं फारसा डामडौल न दाखविता, अतिशय साधेपणानं खरोखरच एखाद्या इमारत-निधीसाठीच कार्यक्रम केला, ही समाधानाची बाब. गायक कलाकार श्री. अरुण दाते, श्री. शरद जाभेकर व सौ. अनुराधा पौंडवाल ह्यांच्याकडेच कार्यक्रमाचं बरचसं श्रेय जातं.

सौ. वन्दना विटणकरांच्या निवेदनानं कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रथमतः सौ. अनुराधा पौंडवाल व अरुण दाते ह्या जोडीनं ईशस्तवन गायलं अन् त्यानंतर अनुराधाबाईंनी एकापाठोपाठ एक अशी पाच सुरेल गाणी पेश केली.

'धुंदीत गधीत'... ह्या धुंद गाण्यानं सुरुवात करून त्यांनी तमाम मडळींना खुश केलं. नंतर 'मेंदीच्या पानावर' लतावाईंच्या ठसक्यात सादर केलं. पाठोपाठ मंगेश पाडगांवकरांचं, 'डोळ्यावरून माझ्या उतरून रात्र गेली,' व 'अदालत' चित्रपटातील 'यूं हँसरतोके दाग' कै. मदनमोहन यांची आठवण करून गेलं.

नंतर अरुण दाते स्टेजवर प्रवेश करते झाले. पाडगावकरांची गीतं अन् अरुण दातेंचा नाजूक आवाज. 'बदनाम नाम झाले', 'भेट तुझी माझी' 'मान वेळावुनी,' शंकर वैद्यांची स्वरगंगा वगैरे टाळयांच्या कडकडाटात त्यांनी पेश केली.

त्यामागोमाग शरद जांभेकरांनी 'गगनी तम हा मावळला' 'मधुरा बिम्बाधरा' ही नाट्यगीतं पेश करून मैफिलीत अधिकच रंग भरला.

मध्यंतरानंतर परत अनुराधाबाईंनी शांताराम नांदगावकरांच्या 'ससा तो ससा' पासून सुरुवात करून नंतर पब्लिकची फर्माइशी गाणी– अर्थातच 'जाने मन' चित्रपटातलं 'आएगी–आएगी' व किनारामधील 'नाम भूल जाएगा'त गायली. बहुतेक सर्व वन्समोअर मिळवून गेली. नंतर 'रुपेरी वाळूत, माडांच्या बनात' ह्या गाण्याने तर अक्षरशः अख्ख्या शिवाजी मंदिराला ठेका धरायला लावला. पाठोपाठ अभिमान मधलं 'पिया बिना' व 'भेंटीलागे जीवा' ही दोन गाणी पेश करून त्यानी कार्यक्रमाचा रंग भक्तिरसाकडे वळविला तर शरद जांभेकरानी 'नाचत गुरुभजनी, आम्ही रंगुनी जाऊ' म्हणता म्हणता सर्वांना रंगवून टाकलं.

परत एकदा अरुण दाते आले. 'अविरत ओठी यावे नाम' गाऊन दाते 'या जगण्यावर या जन्मावर' गाताना भावगीतात शिरले. नंतरची दोन गाणी म्हणजे फक्त अरुण दातेंनीच गावीत. 'दिवस तुझे हे फुलायाचे' व 'भातुकलीच्या खेळामधली' ही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रत्येकाच्या तोंडात बसलेली गाणी त्यानी दणक्यातच सादर केली.

सौ. अनुराधा पौडवाल व अरुण दाते ह्यानी खास फर्माइशीनुसार 'शुक्रतारा मन्दवारा' पेश केला. हे गाण गाताना अनुराधाताईंनी, सुधा मल्होत्रांवरही काकणभर ताणच केली. शेवटी स्वा. सावरकरांचं 'ने मजसी ने' याच दोघांनी सादर केलं व कार्यक्रम संपला.

कार्यक्रम जरी सुरेख झाला तरी सौ. वन्दना विटणकरांचं निवेदन अजिबात आवडल नाही. सर्वच प्रकारात अतिशय कृत्रिमपणा जाणवल्याखेरीज राहृला नाही. अगोदर जाहीर झाल्याप्रमाणे श्री. व. पु. काळे निवेदन करणार होते. व. पू. ची सर वन्दना विटणकरांना येणार नाही,. हे जरी खरं तरी निवेदन आणखी चांगलं व्हायला काहीच हरकत नव्हती. अनिल–अरुणानी नेहमीच्याच ढंगात संगीत दिल. विशेषतः श्री. कुँवर राजेंद्रसिंग ह्यांचं व्हायोलिन अप्रतिम वाटलं. श्री. रवि दाते व दत्ता लाड ठीक वाटले.

–निरंजन घोडके

# बॅरिस्टर

## एक सुंदर नाट्यबीज

श्री. जयवंत दळवी यांचं 'बॅरिस्टर' हे दुसरे नाटक. पहिलं सध्याछाया. 'सध्याछाया' नाटकातील काळ, कौटुंबिक चित्र अगदी चालू घटकेचे, आपल्या भोवतालचे आहे. याउलट 'बॅरिस्टर' नाटकातील काळ भूतकाळ. स्वातंत्र्यापूर्वीचा, टिळकांचं नाव ज्या काळात तळपळत होतं, बालगधर्व जेव्हा रंगभूमीचे राजे होते, तो काळ आहे. त्या काळातील विलायतेहून शिकून आलेल्या 'बॅरिस्टर'ची ही गोष्ट.

राऊ हा बॅरिस्टर एका वाड्यात राहतो आहे. त्याच्या घरात त्याची सोवळी मावशी आहे. वेडा झालेला भाऊ नाना आहे. गणोजी नोकर आहे. वाड्यात एक बिऱ्हाड आहे भाऊराव आणि राधाक्का या दांपत्याचे 'बॅरिस्टर' आणि या कुटुबाचे संबध जिव्हाळ्याचे आहेत. एकमेकाच्या सुखदुःखात त्यांची एकमेकांना साथ आहे. एकमेकाशी हसत खेळत त्यांचे दिवस चालले आहेत बॅरिस्टरची प्रेयसी ग्लोरिया विलायतेत आहे विलायतेहून तिच्या भावाची-जिमी नॉर्टनची अधूनमधून पत्रं येतात. विलायतेला जाण्यापूर्वीच दमयंती गोरेशी बॅरिस्टरचं लग्न ठरलेले होत. म्हणून ग्लोरियाला तो तिच्याकडे मन ओढ घेत असूनही दूर ठेवतो. परत येते तेव्हा दमयंतीशी त्याच लग्न होऊ शकत नाही. त्याच्या घराण्यातील वेडाला धाबरून दमयंतीचे वडील त्याला नकार देतात. बॅरिस्टर एकाकी होतो. विलायती काड्य जाळीत त्यात स्त्रीचं काल्पनिक विवस्त्र रूप पहात, भाऊरावाच्या संसारात रस घेत तं

स्वत:च्या जीवनातील पोकळी भरून काढतो आहे. ग्लोरियाला वेड लागल्याचे कळते तेव्हा त्याच्यावर जबरदस्त आघात होतो. तो किंचित्काळ जवळ जवळ भ्रमिष्ट होतो. भाऊराव त्याला सावरतो. मोठा भाऊ नाना भर पावसात पळून जातो. तेव्हा बॅरिस्टरवर दुसरा आघात होतो. भाऊराव नानाला खूप शोधतो; पण नाना सापडत नाही. पावसात भिजून किंवा योगायोगाने भाऊराव आजारी पडतो. त्यातच त्याचा अंत होतो. बॅरिस्टरवर तिसरा मोठा आघात होतो. दारुड्या तात्या सुनेला–राधाक्काला सोवळी करतो. बॅरिस्टर ती दुर्घटना थांबवू शकत नाही. बॅरिस्टरवर चौथा मोठा आघात होतो. राधाक्काचा सासरा ती पहाटे विहीरीवर जाते तेव्हा तिच्या अंगावर हात टाकतो. तिच्या ढकलण्याने किंवा स्वत:चा पाय घसरून तो विहिरीत पडतो. त्यातच त्याला मरण येते. हळवा, सुधारक, सौंदर्यप्रेमी बॅरिस्टर राधाक्काला केस वाढवा, सुंदर दिसा, मी तुमचा कोणाशी तरी पुनर्विवाह जुळवीन, असे पुन:पुन्हा सांगतो. तिच्या मुलाची जबाबदारी स्वत: घेतो. त्याच्या नावे सगळी इस्टेट करतो. राधाक्काचे मन पुन:पुन्हा पुनर्विवाहाकडे वळवण्याचा प्रयत्न करतो. राधाक्का सूचक बोलते. मावशी बॅरिस्टरला रोखठोक विचारते, 'तू करणारेस तिच्याशी लग्न?' बॅरिस्टर राधाक्काशी लग्न करायचे ठरवतो. तिची संमतीही मिळवितो. राधाक्का जेव्हा त्याच्या घरात येऊन विवाहासंबंधी विचारते तेव्हा आधीच बऱ्याच मानसिक यातनातून गेलेला बॅरिस्टर चिडतो. त्याला वेड लागते. नानाच्या खुर्चीवर तो जाऊन बसतो. मावशी उगाचच राधाक्काला धीर देत असते. सगळे व्यवस्थित होईल; पण ते सांगणे उगीचच आहे, हे दोघींना माहिती आहे. इथेच नाटक संपते.

नाटकाचे हे कथानक. घटना अगदी मोजक्या आहेत. घटनांना इथे प्राधान्य नाही. नाटकाची प्रकृती मनोविश्लेषणात्मक आहे. बॅरिस्टरच्या मध्यवर्ती व्यक्तिरेखेचे मनोविश्लेषण, हा या नाटकाचा विषय आहे.

बॅरिस्टर श्रीमंत आहे. सुशिक्षित आहे. सुसंस्कृत आहे. रसिक आहे. अर्थपूर्ण जीवन जगायला जे जे हवे ते ते सारे त्याच्याजवळ आहे; परंतु तो ते जगू शकत नाही. याला कारण काही अंशी भोवतालची परिस्थिती आणि काही अंशी बॅरिस्टरच्या मनोवृत्ती आहेत. बॅरिस्टरचे वडील वेड लागून बेपत्ता होणे, मोठा भाऊ नानाही वेडा होणे, दमयंतीसाठी ग्लोरियाला दूर ठेवणे, अनुवंशिक वेडामुळे दमयंतीशी विवाह न होणे, ही झाली भोवतालची परिस्थिती; परंतु केवळ या परिस्थितीने बॅरिस्टरचा दु:खान्त ओढवला आहे, असे वाटत नाही. बॅरिस्टरचा दु:खान्त होण्यास त्याच्या मनोवृत्तीही जबाबदार आहेत. दमयंतीशी ठरलेला विवाह मोडल्यावर बॅरिस्टर ग्लोरियाशी विवाह का करीत नाही, याचे उत्तर नाटकात दिलेले नाही; परंतु प्रेक्षक काही अंदाज करू शकतो. 'ग्लोरियावर मी अन्याय केला नाही ना?' असे तो पुन्हा पुन्हा भाऊरावाला विचारतो, याचा अर्थ अन्याय केल्याची बोच त्याच्या मनाला आहे. बॅरिस्टर वृत्तीनी उत्कट आहे. संसारातले काव्य त्याला मोहून टाकते. भाऊराव संसार करीत असतो; पण संसारातले काव्य समजू शकतो बॅरिस्टरच. बॅरिस्टर जीवनातल्या सौंदर्याचा पूजक ( romantic ) आहे. सर्वांनी सुंदर रसपूर्ण जीवन जगावे, असे त्याला वाटते. म्हणूनच तो भाऊरावांना आधुनिक राहण्याचा प्रेमळ आग्रह करतो. मावशीने केस वाढवावे, पुनर्विवाह करावा म्हणून तिचा पाठपुरावा करतो. या सौंदर्यपूजक बेभान मनोवृत्तीची दुसरी बाजू म्हणजे जे जे कुरूप आहे, रुक्ष–रसहीन आहे, त्याचे अस्तित्वच नाकारायचे म्हणूनच 'सोवळ्या' मावशीला तो दृष्टीपुढे येऊ देत नाही. मावशीवर प्रेम करूनही तिला डोळ्यांसमोर येऊ नको, म्हणणाऱ्या आणि ग्लोरियावर अन्याय केल्याची जाणीव असूनही तिच्याशी विवाह न करणाऱ्या, ग्लोरियाच्या वेडाला आपण कारणीभूत वाटून अस्वस्थ होणाऱ्या, तरीही तसे नाही असे स्वत:लाच पटवणाऱ्या बॅरिस्टरमध्ये एक साम्य आहे–व्यवहारापासून दूर पळणाऱ्या वृत्तीचे! परंतु व्यवहारापासून दूर पळण्याच्या त्याच्या वृत्तीचे सुस्पष्ट दर्शन नाटकात होत नाही. ते जर झाले असते तर ग्लोरियाशी विवाह न करण्याची संगती लागू शकली असती. बॅरिस्टरच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन अधिक होऊ शकले असते. तसे ते झालेले नाही.

याचे कारण या मुख्य व्यक्तिरेखेवरून लेखकाचे चित्त मधेच ढळले आहे. दुसऱ्या अंकात बॅरिस्टरऐवजी विधवांच्या प्रश्नालाच महत्त्व येते. मावशी केंद्रबिंदू होते. तिचे मनोविश्लेषण होऊ लागते. तिच्या दाबल्या गेलेल्या नैसर्गिक भावना–वासनांचे चित्रण येऊ लागते. बॅरिस्टर बाजूला पडतो. त्यामुळे संविधानकाचा तोलच जातो. नाटक कोणाचे? बॅरिस्टरचे की मावशीचे? नाटकाच्या नावाकडे दुर्लक्ष करून नाटक मावशीचे म्हणावे तर दुसऱ्या अंकातला अर्धा भागच मावशीने व्यापला आहे, बाकी सगळे नाटक बॅरिस्टरभोवतीच फिरते. मावशीच्या दबलेल्या भावना किंवा राधाक्काचे केशवपन यांचा परिणाम बॅरिस्टरच्या मनावर काय होतो. या गोष्टीला नाटकात महत्त्व यायला हवे होते. तसे ते आले असते तर मुख्य बॅरिस्टरच्या कथानकाशी ते एकरूप झाले असते आणि एक अतिशय सुंदर कलाकृती निर्माण झाली असती; परंतु मावशीच्या दाबलेल्या वासना, राधाक्काचे केशवपन यांचा बॅरिस्टरच्या मनावर होणारा परिणाम प्रभावीपणे व्यक्त होण्याऐवजी केशवपनाची बळी झालेली राधाक्का, बालगंधर्वांच्या आठवणी घोळवणारी–राधाक्काच्या मुलाला पदराखाली घेणारी मावशीच प्रभावी होतात. नाटकाच्या कथानकात आणखी क्षुद्र दोष आहेत. मावशी आपण दहाव्या वर्षी सोवळ्या झाल्याचे सांगते. ते चूक आहे. मुलगी बाळपणी विधवा झाली तरी ती वयात आल्यावरच तिचे केशवपन होत असे, त्याआधी नाही. तसेच बॅरिस्टरच्या वाड्यातला नेहमीचा न्हावी बॅरिस्टरला न जुमानता राधाक्काचे केशवपन करतो हेही पटत नाही.

हे नाटक दोन–अडीच तास प्रेक्षकाचा पूर्णपणे ताबा घेते, याचे कारण परिश्रमपूर्वक बसविलेला नेटका प्रयोग, हसू आणणारे संवाद आणि आसू आणणारे प्रसंग. याशिवाय लैंगिक विषयही थोडाफार चर्चिला आहे.

विजया मेहता यांच्यासारख्या समर्थ दिग्दर्शिका आणि अभिनेत्री लाभल्यामुळे नाटकाचा प्रयोग अतिशय नेटका होतो. प्रयोगात ढिसाळपणा कोठेही नाही. रंगमंचावर दिसणारी वाड्याची रचना, पात्रे, त्यांची केशभूषा, वेषभूषा या साऱ्यात कालाचे भान अचूक ठेवले आहे. सर्व पात्रांत चंद्रकांत

गोखले यांचा तात्या सुजाणपणे उभा राहिला आहे. बॅरिस्टरच्या मनाची आंदोलने दाखविण्यात श्री. विक्रम गोखले यशस्वी झाले आहेत. विजया मेहतांची भूमिका नेहमीसारखीच चित्तवेधक. विजया मेहतांविषयी असे कशाला लिहायचे हा प्रश्न आहे. त्यांच्या सर्वच भूमिका सहजसुंदर. 'संध्याछाया'-मधील मुलाच्या लग्नासाठी वेडी झालेली आई, 'अखेरचा सवाल'मधील डॉक्टर आई, 'जास्वंदी'तील अत्याधुनिक एकाकी प्रौढा, साऱ्याच भूमिका कमालीच्या समरसून केलेल्या. त्याच यशस्वी भूमिकेच्या मालिकेत आणखी एक भर पडली. त्यांच्या एखाद्या भूमिकेने पकड घेतली नाही तर तेच नोंदवावे लागेल. बाकी सर्व पात्रे आपापल्या भूमिका व्यवस्थितपणे निभावून नेतात.

पहिल्या अंकातील मावशी–भाऊराव संवाद आणि मावशीचे नवदांपत्याची चेष्टा करणे प्रेक्षकांना हसत ठेवते. उदा. शिकासंबंधी भाऊराव–राधाक्का आणि मावशी यांचे बोलणे, मावशीचे दहाव्या वर्षी झालेले केशवपन, राधाक्काचे जबरीने झालेले केशवपन हे काळजाचे ठाव घेणारे प्रसंग आहेत. राधाक्कांच्या अंगावरचे दूध बॅरिस्टरच्या डोळ्यात घालण्याचा प्रसंग अगदी अनावश्यक, ओढूनताणून आणलेला वाटतो. 'बॅरिस्टर आणि राधाक्का यांच्या एकमेकांबद्दलच्या नाजूक, मुग्ध परंतु कोणत्याही सीमा न ओलांडणाऱ्या उत्कट भावनांचे सूचन बॅरिस्टरने तिच्यासाठी फुलें पाठवताना होते तसे ते या प्रसंगात होत नाही.

बॅरिस्टरच्या रूपाने एक सुंदर नाट्यबीज लेखकाला गवसले; पण ते सुंदरपणे फुलले नाही. वाटते, इथे एक सुंदर इमारत उभी रहाणार होती; पण तिचा तोलच गेला. मग ठरीव ठशाचे विनोद आणि हमखास अश्रू आणणारे भडक प्रसंग यांचे धिरावे देऊन तिला जेमतेम उभे केले आहे.

—कु. विनया खडपेकर

इंग्रजी चित्रपट

# Paul And Michelle

## एका स्वप्नाचे तुकडे

सदानंद बोरसे

काही महिन्यांपूर्वी पुण्यात 'फ्रेंडस्' नावाचे एक अप्रतिम स्वप्न प्रदर्शित झाले होते. हा चित्रपट म्हणजे एक अफलातून कविताच होती. तो पाहताना धुक्यासारखा आपल्याभोवती कधी पसरला हे कळायचे सुद्धा नाही. धुके जसे दिसते पण हाती लागत नाही, तसा हा चित्रपट. वास्तव व कल्पना यांचे प्रदेश ज्या ठिकाणी एकमेकांत घुसरतात त्या ठिकाणचा जाणवणारा पण हाती न लागणारा तलमपणा या चित्रपटाच्या कथेत व हाताळणीत दाटलेला होता. अपघाताने एकत्र आलेले पॉल व मायकेल—सगळ्या जगापासून लांबचा त्यांचा निवास, त्यांच्या त्या रंगीत आयुष्यात फुललेल्या निरनिराळ्या छटा, त्यांची वेगवेगळ्या प्रसंगातील कधी दबलेली तर कधी उत्कट, कधी भिरभिरती तर कधी स्फोटक मानसिक आंदोलने, या सगळ्यातून 'फ्रेंडस्' फुलला आणि फक्त फुललाच. मायकेलचा निरोप घेऊन कामावर जाण्यासाठी निघालेला पॉल आणि त्याच्या कामाच्या ठिकाणी त्याला घेऊन जाण्यासाठी वाट पाहणारे त्याचे वडील एवढेच दाखवून दिग्दर्शकाने चित्रपट संपवला होता. यातून कोणतेही निष्कर्षाचे वा शोकांतिकेचे वा पोएटिक जस्टिसचे फळ दिग्दर्शकाने दिले नव्हते. त्यामुळें तर चित्रपटाने लागणारी हुरहूर अधिकच तीव्र व्हायची, उत्कटता अधिक तीक्ष्ण व्हायची.

आणि प्रत्येक सुंदर कवितेला शेवट असायलाच पाहिजे, असे नाही. त्या कवितेतून मिळालेला क्षणभराचा का होईना विलक्षण तीव्र अनुभव हेंच त्या कवितेचे यश. 'फ्रेंडस्'चे यशही अशा आत्यंतिक उत्कटतेत भरलेले होते.

आता लागलेला पॉल अँड मायकेल हा 'फ्रेंडस्'चा पुढचा भाग.

पॉलचे वडील त्याला घेऊन परततात आणि पॉल पुन्हा विद्यापीठात शिकू लागतो. सुमारे चार वर्षांनतर–हीच पॉल अँड मायकेलची सुरवात.

कॉलेजातल्या कुठल्याशा समारंभाला पॉलचे वडील प्रमुख पाहुणे आहेत. त्यांना निरोप देताना पॉल त्याना निक्षून सांगतो, 'मी मायकेलला शोधून काढणारच!' आणि तो त्या मोहिमेवर निघतो. योगायोगाने त्याला मायकेल भेटतो, त्या दोघांची चार वर्षांची छबकडी सिल्व्हिया भेटते. मायकेल या काळात वणवण भटकून शेवटी गॅरी नावाच्या माणसाबरोबर राहात असते. पॉल दोघांना आपल्या हॉस्टेलमध्ये राहण्यासाठी आणतो. मग तिघांचे पोट जाळण्यासाठी नाना उद्योग. कारण मायकेलबाबत पॉलचे आपल्या वडिलांशी असलेले कडाक्याचे मतभेद. पॉल दिवसा कॉलेज, संध्याकाळी बाजारामध्ये मटणाच्या वाहतुकीचे काम या रगाड्यात पिळला जात असतो; तर मायकेल ही घरकाम, रात्रीचे हॉटेलातील काम यामुळे थकून जात असते. एकदा रात्री कामावरून परतल्यावर मायकेल घरासमोरील एका हॉटेलात पॉल आणि त्याच्या मैत्रिणीला गप्पा मारताना पाहते. येथपासून तर एकदम फिल्मीपणा सुरू होतो. मग मायकेलने पॉलवर संशय घेणे, रागावलेल्या पॉलला समजावण्यासाठी तिने त्याच्यापाठोपाठ घराबाहेर पडणे, तिच्यापाठोपाठ सिल्व्हिया घराबाहेर पडणे, मग सिल्व्हियाची दोघांनी केलेली शोधाशोध, त्यातून पुन्हा जुळलेली मने व मग सिल्व्हियाही सापडणे हा सर्व प्रकार जाणकार सुरू झाल्याझाल्या ओळखतात व बरोबर तो संपल्यावर जागे होऊन पुढचा सिनेमा पाहू लागतात.

तो सिनेमा संपतोच.

शेवटी 'तू नीट अभ्यास कर! आम्ही काय, इतके दिवस राहिलो तशा आणखी काही दिवस वेगळ्या राहू. नतर पुन्हा आपली भेट होईलच. कारण प्रेम अमर आहे, प्रेमी अमर आहेत वगैरे वगैरे.' असे म्हणून मायकेल आणि सिल्व्हिया अनुक्रमे गुडबाय पॉल आणि गुडबाईज पपा; पण सिल्व्हिया नॉट फॉरएव्हर असे म्हणून निघून जातात. या ठिकाणी चित्रपट संपतो.

. फक्त या चित्रपटाबद्दलच म्हणजे—

सीन बरी (पॉल) आणि ॲनिसी ॲल्व्हिना (मायकेल) यांची अप्रतिम कामे. हीच जोडी फ्रेंडस्‌मध्ये होती. दोघांची रस्त्यात झालेली पुनर्भेट, गॅरीबद्दल पहिल्या भेटीपासून पॉलला वाटणारा कडवटपणा, सिल्व्हियाला हस-विण्यासाठी पॉलने केलेला भन्नाट विनोदी चेहरा, शेवटी गुडबाय करताना दोघांच्या चेहऱ्यांवरील ताटातुटीचे दुःख, तितकीच भविष्यातील भेटीबद्दलची आशा हे सारे त्या दोघांनी समरसून दाखवले आहे. या दोघांबरोबरच चित्रपटभर वावरलेली किंवा बागडलेली सिल्व्हिया म्हणजे सिरा स्टाउट ही तीन-चार वर्षांची छबकडी; पण 'धिस् इज युवर पपा!' असे पॉलबरोबरच्या पहिल्या भेटीत मायकेलने सांगितल्यावर किंवा पॉल आणि मायकेलचे भांडण झाल्या-वर तिने दिलेले लुक्स, तिचे निरागस हास्य, गॅरीबरोबर शर्यत खेळणे, शेवटचे 'गुडबाय, पपा!' विसरू म्हटले तरी शक्य नाही! केअर डुलाचे गॅरीचे कामही सुरेख.

चित्रपटाच्या बाकीच्या बाबींचा मी फ्रेंड-सूच्या तुलनेत विचार करणार आहे. या चित्रपटाचा एक स्वतंत्र चित्रपट म्हणून विचार केला तर तो एक चांगला चित्रपट ठरतो. (अर्थातच फिल्मी योगायोगांनी भरलेली सुरुवात, शेवटचा काही भाग, असे काही मुद्दे सोडून.) पण त्याचा असा स्वतंत्र विचार करता येतो का? नाही. कारण फ्रेंडस्‌मध्ये निर्माण झालेली दोघांची नाती, तेव्हा असलेल्या नाजूक रेशमी बंधांच्या आता क्वचित जाणवणाऱ्या निर-गाठी, हा या चित्रपटाचा पाया आहे. त्यासाठी फ्रेंडस्‌मधील काही संदर्भदृश्ये या चित्रपटातही दाखविली आहेत. म्हणूनच त्याचा फ्रेंडस्‌बरोबर विचार करणे अपरि-हार्य आहे. आणखी एक कारण म्हणजे फ्रेंड-सूचा जो ठसा प्रेक्षकाच्या मनावर उमटलेला असतो, तो आणखी खोल करणे सोडाच पण राखणेही या चित्रपटाला जमलेले नाही; उलट तो थोडासा पुसून काढण्याचे काम या चित्रपटाने केले आहे.

प्रथम कथेचा विचार करू.

अतर्क्य वा न पटणारा भाग फ्रेंडस्‌मध्येही सुरुवातीपासूनच होता. उदाहरणार्थ— पॉल व मायकेलची ओळख व नंतर दोघांनी पळून जाणं; पण ही अतर्क्यता असह्य वाटत नव्हती. उलट पुढे जे काल्पनिक जग फुल-णार असते, त्याची काहीशी पार्श्वभूमीच या प्रसंगाने तयार केली. पॉल ॲन्ड मायकेलमध्ये मात्र सुरुवातीलाच पॉलला मायकेलचा लागलेला शोध हा योगायोगाच्याही पली-कडचा आहे. कारण तो सुमारे पाच वेळा त्याला योगायोगाने लागतो, पुन्हा हुकतो, पुन्हा लागतो. नंतरही गॅरीला मध्ये आणून प्रेमाचा त्रिकोण बनविण्याचा आणि कथेच्या प्रसन्न मूडला उगाचच ताण देण्याचा एक केविलवाणा प्रयत्न केला आहे. गॅरीची व्यक्तिरेखाही त्याने मायकेल व सिल्व्हिालया दिलेला आसरा आणि पॉलला त्याच्याबद्दल वाटणारा थोडासा मत्सर सोडल्यास संपूर्ण अस्पष्ट व अधांतरी राहिली आहे. 'तुम्हाला अजाण वयात वाटलेला मोह आणि माझ्या-सारख्या मॅच्युअर्ड माणसाने केलेले प्रेम यात फार फरक असतो!' हे तो मायकेलला समजावून सांगतो. तेव्हा आणि तो न्यूयॉ-र्कला जाण्यासाठी म्हणून तिचा निरोप घ्यायला येतो तेव्हा— अशा प्रसंगात ती व्यक्तिरेखा प्रेक्षकासमोर थोडासा आकार घेण्याचा प्रयत्न करते. हीच गोष्ट पॉल आणि मायकेलच्या व्यक्तिरेखांबाबतही घडली आहे. चार वर्षांमुळे दोघांच्या स्वभा-वामध्ये, मानसिक स्थितीमध्ये आणि त्यामुळे एकमेकांबरोबरच्या वागणुकीमध्ये झालेला बदल अथवा राहिलेले साम्य, पूर्वीच्या आठ-वणींची आणि आताच्या वस्तुस्थितीची होणारी टक्कर अथवा जुळणारे सूर या साऱ्यांच्या चित्रणाला एकापुढे एक घडणाऱ्या प्रसंगांच्या घिसडघाईत कुठे वावच मिळा-लेला नाही; त्यामुळे मायकेल व पॉल यांनी आपल्या जुन्या घरकुलाला दिलेली भेट, दोघांचे हॉस्टेलमधील वास्तव्य, दोघांचे कष्ट हे सगळे वास्तवाला अधिक जवळचे होते; पण तरीही फ्रेंडस्‌चा विचार मनात येताच ते सारे कृत्रिम वाटू लागते. हीच गोष्ट माय-केलला आलेल्या संतापाची. रात्री ती पॉलला एका मुलीबरोबर हॉटेलात पाहते व संतापते. नंतर तिच्या संशयामुळे पॉलही चिडून बाहेर पडतो आणि मायकेल त्याला समजाविण्या-साठी बाहेर पडते, हे फिल्मी असूनही फारसे खटकले नाही; पण त्यानंतरचा सिल्व्हियाच्या हरवण्याचा आणि सापड-ण्याचा फार्स अतिशय त्रासदायक व संपूर्ण चित्रपटाला खाली खेचणारा होता. शेवटा-बद्दल तर माझी अतिशय तक्रार आहे. पॉल ॲन्ड मायकेलने फ्रेंडस्‌च्या शेवटाची हुरहूर तर संपवलीच आणि त्या अपूर्णतेतील उत्कटताही पॉल ॲन्ड मायकेलला गवसली नाही. उलट या चित्रात शेवटी दाखविलेली त्यांची ताटातूट म्हणजे पॉल—मायकेल शृंखळीमधील एखाद्या 'पॉल ॲन्ड मायकेल मीट अगेन्'ची नांदी वाटली.

पॉल ॲन्ड मायकेलची कथा व दिग्दर्शन दोन्ही लुइस गिल्बर्ट यांची. (फ्रेंडस्‌चीही कथा व दिग्दर्शन त्यांचेच.) कथालेखक म्हणून त्यांनी फ्रेंडस्‌पुढे ताणण्याची चूक केलीच. अर्थात ती कथा चित्रपटासाठी घेणे ही दिग्दर्शक म्हणून केलेली चूक ओघाने आलीच. एवढी एकमेव चूक वगळता दिग्दर्शक म्हणून त्यांची कामगिरी उत्तम. संपूर्ण कथेला अतिशय हळुवार ट्रीटमेंट देणे त्यांना शक्य झाले नाही; त्यामुळे काही प्रसंगांमध्ये भडकपणा आलेला आहे. उदाहरणार्थ— दोघांनी पॉलने निवडलेल्या एका हॉटेलात एकत्र घालवलेले काही क्षण, शेवटचा संशय, भांडण वगैरे भाग. फ्रेंडस्‌मध्ये त्यांनी हळुवारपणाला अतिशय मिस्किल संवादांची वा खेळकर प्रसंगांची भेट दिली आहे. पॉल ॲन्ड मायकेलमध्ये मिष्किल संवाद आहेत; पण फ्रेंडस्‌च्या मानाने फार तुरळक आणि प्रसंग काही अपवाद वगळता फ्रेंडस्‌च्या तुलनेत ओव्हर डोज वाटावेत इतके विनोदी. पॉल व मायकेल आपल्या जुन्या घरकुलात आल्यानंतर जुन्या आठवणींनी हरखून जाऊन आवेगाने एकमेकांना मिठी मारतात आणि आता ते एकमेकांचे चुंबन घेणार तोच आतून सिल्व्हियाची हाक येते, 'मम्मा, आय् वॉन्ट ए ग्लास ऑफ वॉटर!' असे काही प्रसंग फ्रेंडस्‌च्या जातीचे; तर मायकेलला टिबिआ –फ्रॅक्चरची पेशंट म्हणून नेऊन मेडिकल कॉलेजातील शिकाऊ मित्रांनी तिच्यावर केलेला गर्भपाताचा प्रयोग हा ओव्हर-डोजच्या वळणाचा. सिल्व्हियाला बिछान्यात झोपवताना आपण बाजारातील मारलेले जनावरच ठवीत आहोत, असा पॉलला झालेला भास, फ्रेंडस्‌मध्ये स्वच्छंद उधळणारे शुभ्र घोडे या चित्रपटात एका स्वाराच्या दिमतीला असणे किंवा टबमध्ये साबणाचे

फुगे सोडताना आता सिल्व्हिया बरोबर असणे अशा काही दुव्यांमधून त्यांची चमक दिसून आली; पण संपूर्ण चित्रपटाचा विचार केल्यास दिग्दर्शक म्हणून ही त्यांची उतरती पायरीच होती. कदाचित फ्रेंड्स् हे त्यांच्या कामगिरीचं शिखर ठरल्याचा हा परिणाम असेल.

संगीत आणि छायाचित्रण याबाबतीतही 'एक खालची पायरी' हाच अभिप्राय द्यावा लागेल. संगीत क्लाउड रिनॉइन आणि छायाचित्रण मायकेल कोनोबिअर यांचं.

हा चित्रपट म्हणजे स्वप्नाचे तुकडे जुळविण्याचा केलेला प्रयत्न आहे. फ्रेंड्स् पाहताना ते स्वप्न प्रत्यक्षात येणे शक्य नाही, हे माहीत असूनही प्रत्येकजण ते स्वप्न स्वत: आपल्या कल्पनेत जगतो. पॉल अ‍ॅन्ड मायकेल-मध्ये दोघानाही पुन्हा एकदा वास्तवात आणण्याचा प्रयत्न करताना फ्रेंड्स्च्या स्वप्नाची खापरे मात्र पदरात आली. अर्थात तीही कमी मोलाची आहेत, असे नव्हे; पण त्याचं मोल वाढलं ते त्या स्वप्नाच्या अमूल्यतेमुळे. *

# एअरपोर्ट–१९७५

## विकत घेतलेला कंटाळा

'एअरपोर्ट' या नावाचा एक चित्रपट यापूर्वी प्रदर्शित झाला होता. नवा विषय व त्यातील डीन मार्टिन बर्ट लॅंचेस्टर आणि जॅकेलिन बिसेट याच्या सुंदर भूमिका यांमुळे तो अतिशय गाजलाही होता.

'एअरपोर्ट–१९७५' हा त्याचाच आणखी एक अवतार म्हणावा लागेल–आर्थर हेलीच्या 'एअरपोर्ट' या कादंबरीवरून घेतलेला.

सुमारे दीडशे प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या एका विमानाला आकाशातच दुसऱ्या विमानाची धडक बसते. त्याचा मुख्य वैमानिक जबर जखमी होतो आणि त्याचे मदतनीस ठार होतात. कॉकपिटला भगदाड पडते. अशा दुर्धर प्रसंगात नान्सी नावाची विमानातील हवाईसुंदरी ते विमान चालविते. नंतर रस्क्यू हेलिकॉप्टरमधून आलेला वैमानिक विमानाचा ताबा घेऊन विमान वाचवितो.

अशा साहसकथा (वा संकटकथा म्हणा हवे तर) यशस्वी झाल्या तर त्यामागे दोन प्रमुख कारणे असतात–एक, त्यातून दिसणारा वेगळेपणा म्हणजे भयंकरपणा वा थ्रिल. त्यामुळे आपल्या सुरक्षितपणाच्या जाणिवेने प्रेक्षकाला ती भयानकता वा ते दु:ख पाहण्यास बरे वाटते किंवा दोन, या साहसात वा संकटात घडणारे मानवी मनाच्या विविध पैलूंचे दर्शन. पुण्यात येऊन गेलेले 'दि टॉवरिंग इन्फर्नो' आणि 'दि पॅसिडॉन अ‍ॅडव्हेन्चर' ही अशा चित्रपटांची उत्कृष्ट उदाहरणे.

'एअरपोर्ट–७५'ला जातानाही मनात अशाच काही कल्पना धरून गेलो होतो; पण प्रत्यक्षात दिग्दर्शक जॅक स्माइट यांना दोन्हीं-पैकी कोणतीच गोष्ट न साधल्याने निराशाच पदरात पडली. 'थ्रिल'च्या बाबतीत दोन विमानाची धडक आणि वैमानिकाचा हेलिकॉप्टरमधून मोडक्या विमानात प्रवेश हे दोनच प्रसंग खुर्चीतून उठू न देणारे (पण खिळवून ठेवणारे वगैरे नाही.) बाकी म्हणजे थांबलेल्या विमानाभोवती आकाशाचा सेट फिरविण्याचा खेळ चाललेला. विमानात असलेल्या निरनिराळ्या व्यक्तिरेखाच्या चित्रणात नान्सीच्या प्रसंगावधानाला व धाडसालाच जास्तीत जास्त वाव मिळालेला; पण त्यातही तिचे इंजिनाची बटणे फिरगळणेच, फार वेळ. खरे म्हणजे नमुनेदार व्यक्ती चित्रपटात सापडलेल्या आहेत. उदाहरणार्थ–नसत्या चौकश्या करणारा एक मध्यमवयीन गृहस्थ, विमानप्रवासाने (केवळ विमानप्रवासानेच नव्हे तर जगातील कोणत्याही गोष्टीने) घाबरून जाणारा म्हातारा, प्रवासातही मुलाचा अभ्यास घेणारी मुलाची आई, मृत्यू समोर दिसत असतानाही आपल्या दागिन्यांबद्दल दु:ख करणारी श्रीमंत पण म्हातारी राजकन्या, नादुरुस्त किडनीवर उपचार करून घेण्यासाठी निघालेली छोटी मुलगी (तिच्या नाक उडविण्यावर आपण बेहद्द खूष.), जीवनातील सुखांची आसक्ती असलेल्या पण धर्माला वाहून घेतल्याने बांधल्या गेलेल्या नन्स्, संपूर्ण प्रवासात अपघाताचीही तमा न बाळगता झोपी गेलेला एक माणूस, प्रवाशांना वाचविण्यासाठी निघालेल्या वैमानिकाला तेवढ्यात अडवून त्याची मुलाखत घेण्यासाठी धडपडणारा टी. व्ही चा वार्ताहर अशा खूप व्यक्ती मिळूनही या भल्या मोठ्या सख्येमुळेच कोणालाच पुरेसा वाव मिळू शकला नाही.

अशा चित्रपटांमध्ये छायाचित्रणाच्या कौशल्याला अतिशय वाव असतो; पण त्या बाबतीतही चित्रपट चांगलाच कमी पडला आहे. याचे एक कारण म्हणजे आकाशातून उडत जाणारे विमान हा एकच शॉट जवळजवळ निम्मा वेळ दाखविला आहे. तो सेटच्या साहाय्याने घेतल्याचे चक्क कळतेच. छायाचित्रणातील इतका कच्चेपणा हिंदी चित्रपटांतही अभावानेच आढळतो.

कॅरन ब्लॅकचे नान्सीचे काम सुरेख. बाकीच्या अभिनेत्यांना (विशेषत: चॅरिटन् हेस्टन्) निव्वळ फुजविले आहे.

एकूण संपूर्ण चित्रपट म्हणजे एक आपणहून कंटाळा विकत घेण्याचा प्रकार. □